

# भारतात 'गजवा-ए- हिंद' चा फतवा

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ३ मार्च २०२४

आधुनिक केसरी

**भारतात धर्माच्या नावाखाली व्यक्तीच्या विरोधात फतवे काढले जात आहे. इस्लाम राष्ट्रात शरीया कायद्यानुसार फतवे काढले जातात. पण भारतात शरीया लागू नाही, घटनेनुसार अश्या फतव्यांना कवडीचेही स्थान नाही. उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथील दारूल उलूम देवबंद या इस्लामिक मदरशाने 'गजवा- ए -हिंद' मान्यतेला पाठिंबा देणारा फतवा काढला आहे. हा' फतवा' भारतीय सार्वभौमत्वाला, आणि राष्ट्रीय एकतेला धोकादायक आहे. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयागाने' दारूल उलूम देवबंद" मदरशावर जिल्हा प्रशासन व पोलिस यंत्रणेस कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यावर काँग्रेससह इंडी आघाडीतील पक्षाचे नेते मूग गिळून बसले आहेत!**

इंग्रज व काँग्रेसच्या नीतीमुळे भारताचे धर्माच्या आधारावर विभाजन झाले. यात दहा लाखाच्यावर लोकांचा बळी गेला. मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी मुस्लिग लिगचे महमदअली जीना यांनी केली होती. डॉ. आंबेडकरांनी धर्माच्या आधारावर विभाजन मान्य नव्हते,मग शेवटचा मुस्लिम भारत सोडून जाणार



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

नाही, तोपर्यंत भारत सरकारने विभाजन मान्य करू नये, असे म्हंटले होते. तरी मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाजाला भारतात राहणे सुरक्षित वाटले तेथे राहणे पंसत केले. भारतीय घटना धर्मावर आधारित नाही, घटनते सर्वच धर्मांना स्वातंत्र्य दिले आहे. भारतात मुस्लिमांची लोकसंख्या १७.२ वरुन २०२३ मध्ये १९.७ टक्के झाल्याचे,असे सांगितले होते.देशात आठ धर्म ८३ छोटे धर्म,अनेक पंथ आहेत. तर चार हजारांच्यावर जाती २५ हजार पोटजाती आहेत. देशात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. याचे जगाला आश्चर्य वाटते. कारण घटनेने सर्वांना समान अधिकार, हक्क दिले आहेत. त्यामुळे देशात धर्माच्या आधारावर भेदभाव केले जात नाही. त्यामुळे हिंदू राष्ट्राची मागणी ही सुध्दा कालबाह्य झाली आहे. भारतात घटनेवर आधारित कायदे केले जातात! देशातील अनेक धर्मात चुकीच्या रुढी, प्रथा परंपरा चालत होत्या! महिलांना समान हक्क देण्याची भूमिका घटनाकारांनी घेतली. हिंदु धर्मात बालविवाह, शिक्षणाचा,संपत्तीचा अधिकार, अत्याचार छळ बाबतीत कायदे केले गेले. तेंव्हा कट्टर हिंदू संघटनांना विरोध केला होता.इस्लाम धर्मातही चुकीच्या रुढी, परंपरा, प्रथा आहेत. जगात सुमारे ५७ ची घटना इस्लाम धर्मावर आहेत. यात इस्लामिक सहयोग संघटना (ओ.आय सी.) आहे. ती ईतर राष्ट्रावर धार्मिक दवाब आणत असते. मागे भाजपाच्या नेत्या नपूर शर्माच्या कथित वक्तव्य केले.त्यावरुन भारतात कट्टरपंथीयांनी तांडण घातला. तीला जीवे मारण्याची धमकी दिली गेली.

ओयसीने या प्रकरणात भारतावर दवाब आणला, भाजपाने सरकारने त्या दबाबाखाली नपूर यांना पक्षातून काढून टाकले. आजही तिच्या जीवाला धोका आहे. ती भारतात उघडपणे फिरू शकत नाही, इतकी धार्मिक दहशद आहे. यावरुन देशात हिंदू महिला सुरक्षित राहू शकत नाही. याचे उदाहरण पहा! पश्चिम बंगालमध्ये संदेशखालील तृणमूल काँग्रेसचा नेते शाहनजहान हा मासे पकड्याणाचा धंदा करत होता, तो राजकारणात आला आणि करोडपती झाला.राज्यातील धान्य घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी ईडी पथकावर त्याची चौकशीसाठी गेले तेंव्हा या पथकावर हल्ला केला गेला.या शहानजहान व त्याचे साथीदारांनी दहशत व गुंडगिरी इतकी की,ते महिलांचे लैगिंक शोषण करावयाचे!त्यांची मजुरी हिस्सा घ्यावयाचे, त्यांच्या मालकीच्या जागा या टोळक्यांनी बळकावून घेतल्या! प. बंगालमध्ये निवडणूक व हिंदुची धार्मिक मिरवणूक त्यावेळी हिंसा व दगडफेक सर्रासपणे होत आलेली आहे,याचे कारण राज्यात तुष्टीकरण नीती जबाबदार आहे. या राज्यात पं. बंगालमध्ये हिंदू कुटुंब सुरक्षित नाही. जेंव्हा घटना उजेडात येते,तेंव्हा तो फरार होतो, तो राज्य पोलिसांना सापडत नाही. न्यायालयाच्या दणक्यानंतर मात्र पोलिसांना सापडतो,या नराधम नेत्याला बेड्या न घालता, तो पोलिसाबरोबर ऐटीत चालत होता,यावरुन पोलिस प्रशासन किती लाचार आहे, हे दिसून आले! राज्याची मुख्यमंत्री महिला असून मुस्लिम व्होटसाठी ती जर महिलाच्या इज्जतीशी खेळत आहे, राज्य सरकारने अटकेचे नाटक केले आहे. पश्चिम बंगालच्या महिलांचे लैगिंक शोषण झालेले असताना काँग्रेस पक्ष व गांधी परिवाराची दातखिळी का बसली ? ते मणीपूरची घटनेवर काँग्रेस पक्ष मोदींना लक्ष्य करतोय. मग पश्चिम बंगालची महिला नाही काय? देशातील इंडी आघाडीतील नेते सनातन धर्म भाषा संपविण्याची भाषा करतात,तरी ते मौन पाळतात! लाचार कोठले! अशा हिंदुव्देषी नेत्यांची पक्षातून हकालपट्टी का केलेली नाही.जगातील सर्वच राष्ट्रे इस्लामिक राष्ट्र व्हावे, असे कट्टरपंथियाचे मनसूबे आहेत.दुर्देवाने कांही मुस्लिम संघटना व नेत्यांत मानसिकता अजूनही तीच आहे. देशात जर घटनेप्रमाणे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा व कायदे करत असताना धर्ममार्तंडाकडून विरोध केला जातोय! याला सामान्य मुस्लिम बांधवाचा विरोध आहे.देशात इस्लाम धर्माच्या नावावर टोळ्या निर्माण होत आहे! याचे मनसुबे भारतानेही शरियतप्रमाणे कायदे केले पाहिजेत, हेच आहेत! त्यातून तीन तलाक, नागरिक सुधारणा कायदा, समान नागरी कायदा. काश्मीरचे ३७० कलम हटविणे, मुलींचे विवाहाचे वय वाढविणे,या कायद्यांना मुस्लिम नेते करतात! काँग्रेस व इतर विरोधी पक्ष त्यांना प्रोत्साहन देत आला आहे. यातुन दवाब आणण्यासाठी ही मंडळी 'इस्लाम खतरे मैं" सीर तनसे जुदा"चे नारे दिले जात आहेत! याला राजकीय पाठबळ मिळत असल्याने कट्टरपंथीय मुस्लिम संघटना डोके वर काढत आहेत. केंद्रात काँग्रेस सत्तेत असताना भारतात अनेक शहरात बॉम्बस्फोटाच्या अनेक घटना घडल्या. काँग्रेसने धार्मिक दहशदवाद्याला पोसत आला. त्याचे परिणाम होते. नुकतेच कर्नाटकमधील बंगलोरच्या रामेश्वरम् कैफेत आयईडी.स्फोट झाला. काँग्रेसचे सरकार असताना हेस्फोट काय कसे होतात! आधी राज्य सरकार सिलेंडरचा स्फोट म्हणुन घटनेवर पडदा टाकत होते. या काँग्रेस सरकारने हिंदूवर अनेक कायदे लादले आहेत काँग्रेसने.

**भारतातील धार्मिक सहिष्णुता** : भारतीय विचारसरणीनुसार धार्मिक सहिष्णुता हा राष्ट्राच्या मध्यवर्ती गाभा आहे .भारतीय असण्यामागे सर्व धर्माचा आदर करणे अतिशय महत्वाचे आहे .तसेच सहिष्णुता हे धार्मिक व नागरी मुल्य आहे .इतर धर्माचा आदर करणे हा त्यांच्या धर्म समुदायाचा भाग आहे,असे मानतात !

**भारतीय संस्कृती श्रेष्ठच !** प्यु रिचर्स सेंटरच्या नवीन सर्वेक्षणानुसार भारतातील ९५ टक्के मुस्लिमांना भारतीय असल्याचा अभिमान आहे .भारतीय संस्कृतीविषयी कमालीची आस्था आहे .तर ८५ टक्के भारतीय संकृती इतरापेक्षा श्रेष्ठ आहे,या विधानाशी सहमत आहेत .



१९९१ मध्ये प्रार्थनास्थळाबदलाबाबत कायदा केला! त्या कायद्याचा आधार आज मुस्लिम पक्ष ज्ञानवापी व मथूराचे मशिदीबाबत घेत आहेत. कर्नाटकात काँग्रेस शिक्षण क्षेत्रात हिजाब चे समर्थन करत व मुस्लिमांचे लालूनचांलन, मोफत योजनांचे आमिष दाखवून राज्यात सत्तेत आला. आता हे सरकार हिंदुना दात दाखवित आहे. हे सरकार हिंदू मंदिरावर कर लावणारा कायदा आणत आहे.काँग्रेस पक्षात सनातन हिंदु विरोधी व डाव्या विचारसरणीच्या मानसिकतेच्या नेत्यांचे वर्चस्व वाढले आहे. त्यामुळे या पक्षाची प्रतिमा हिँदू व्देषी झाली, असुंसून त्यामुळे काँग्रेस पक्ष बुडत आहे, असे फक्षाचे नेते प्रमोद कृष्णन सतात सांगत होते! उलट आयोध्याच्या प्रभूरामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठेला गेल्याच्या कारधावरुन कृष्णन यांना पक्षातून निलंबित केले गेले. पक्षाने काँग्रेस अयोध्याच्या प्रभूरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर बहिष्कार टाकला.पक्षाचा नेता राहुल गांधी यांनी जय श्रीराम म्हंटल्याने पोट भरते काय? असा प्रश्न करुन हिदु धार्मियांचे भावना दुखविल्या आहेत! यांचे खरच यांचेत धाडस असेल तर इतरी धर्माबाबत असे विधान करुन दाखवावे, त्यांची जीभ हासडून काढतील! धर्म प्रत्येकाच्या आस्था व श्रध्देचा विषय आहे प्रभूरामांसाठी मुंबई ते आयोध्याला सायकलवर गेलेली शबनम शेख हिच्या विरोधात कठोर टिप्पणी केली गेली. तसेच रामप्रतिष्ठा सोहळ्याला गेले म्हणून अखिल भारतीय इमाम संघटनेचे प्रमुख डॉ. इमान उमेर शेख इलायाशी यांचे विरोधात फतवा काढला गेला. इतका हिदु व्देष का? मुस्लिम समाजाच्या ईद निमित्त इफ्तेहार पार्टी हिंदू बांधव जातात, त्यांचे विरोधात धर्म फतवा काढत नाही. कारण हिंदु धर्मात सहिष्णुता आहे, सर्व धर्माचा आदर करणे शिकवण आहे. बरेच हिंदूतील बरेच हाजीसया, दर्गा, बाबा, बडापहाड जाणात बकरा कुर्बानी देतात, नतमस्तक होतात त्यांना हिंदू धर्म काफीर समजत नाही.


दुसऱ्या ते राहुल गांधींचे हिंदुसाठी व्देषाचे मुस्लिम मतासाठी प्रेमाचे दुकान उघडले आहे. भारतात शरीया कायदा लागू होत नाही. त्यामुळे अश्या फतव्याला कवडीची किंमत नाही. म्हणून इलायाशींनी यांनी फतव्याला कचऱ्याची कुंडी दाखविली.आता तर राष्ट्र विरोधी फतवे काढण्यापर्यंत मजल गेली आहे, देशात अश्या धार्मिक फतवे काढणे, बहिष्कार टाकणे गैरकायदेशीर आहे,त्यावर बंदी घातली व कारवाई झाली पाहिजे

त्तरप्रदेशच्या दारुल उलून देवबंदने गजवा -ए- हिंद,म्हणजे राष्ट्राच्या विरोधात युध्द करून इस्लाम राष्ट्र बनविणे आहे. या गजवा-ए-हिंद या धोरणाचा फतवा काढला,तो भारतीय सार्वभौमत्वाला आव्हान देणारा आहे. तो घटनाबाह्य,आणि ते राष्ट्र विरोधी कृत्य आहे.दारुल उलूम देवबंद हेउत्तरप्रदेशातील इस्लामिक शिक्षण (तालीम ) देणारे जागातील हे दुसरे केंद्र आहे. अरबी शब्द असून त्याचा अर्थ "ज्ञान घर' असा होतो.तर देवबंद ही हानीफ पंथाची एक विचारधारा आहे.कुराण व शरियतचे कठोरपणे पालन करण्याचे शिक्षण दिले जाते. या दारुल- उलूमची देवबंदची स्थापना ३० मे १८६६ रोजी हाजी आबिद हुसेन व मौलाना कासीम नानौतवीनी केली.भारतात पहिला मदरसा कलकता येथे इस्ट इंडिया कंपनीचे पहिले गव्हर्नर वॉरेन हेस्टिंगव्दारा निर्माण केला..

मदश्यात जहादी शिक्षण?

भारतातअल्पसंख्याकाच्या २०१९ च्या सर्वेक्षणानुसार देशात २४ हजार १० मदरसे आहेत. त्यात ४८७८ मदरस मान्यता प्राप्त आहेत. उत्तर प्रदेशात आज देवबंदचे २० हजार मदरसे असून यात ८६० ला अनुदान दिले जाते. या मदसात मुलांना इस्लामचे शिक्षण देण्यास केद्र सरकारला मुळीच विरोध नाही. पण या मदश्याचे आधुनिकरण करावे, मुलांच्या एका हातात कुराण व दुसऱ्या हातात संगणक असावे! त्यांना हिंदी, इंग्रजी व विज्ञान या भाषेचे शिक्षण दिले जावे. या मदरश्यांना केद्र व राज्य शासन अनुदान देत आहे, पण कांही मौलवी राजकीय नेत्यांना हे मान्य नाही. या मदश्यात मुलाना धार्मिक कट्टरतेचे व जहादीचे बीज पेरत आहेत.

देशात आज सक्तीचे धर्मांतर करणे, हिंचासार करणे, हत्या करणे. राष्ट्रविरोधी कृत्य प्रमाण वाढत चालले आहे.जगात अनेक इस्लाम राष्ट्रात मस्जिदीत स्फोट होत आहेत,निष्पाप लोकांचा बळी घेतला जात आहे. आज इस्लाम राष्ट्र असलेल्या पाकचे काय हाल आहेत पहा! ! तो कंगाल झाला आहे. लोक उपासमारीने मरत आहेत.तरी पाकची कट्टतेची आखड गेलेली नाही. त्यांना राष्ट्रपेक्षा धर्म अधिक प्यारा आहे. परवा तर दुबईहून एक तरुणी पाकमध्ये आली होती.ती अंगावर अरबी शब्दांचे छापील कपडे घालून हाँटेलात गेली असता. तेथे मौलवींनी तिला घेरले व 'सीर तनसे जुदा" च्या घोषणा देत हातात शस्त्र घेवून तिची हत्या करण्याच्या तयारीत होते. तितक्यात महिला पोलिस तेथे पोहचली व तीने तिचे प्राण वाचविले! त्या कपड्यावर 'हलवा' अरबी शब्द लिहिले होते, हलवा याचा खुबसूरत, सुंदर असा होतो. त्याला शब्दाला अनपढ मौलवी व इतरांनी कुराणमधील आयाती समजत होते. जगात इस्लामिक कट्टरतेतून निष्पाप लोकंच्या हत्या केल्या जात आहेत. भारतात 'सीर तनसे जुदा' नावावर निष्पाप लोकांचे गळे गापले गेले. हैद्राबाद राज्या' अश्या घोषणा दिल्या! काँग्रेस नेत्यांची यावर प्रतिक्रिया नाही. उलट भाजपा सरकार मुस्लिमांना टार्गेट करत आहे, असे म्हणून मुस्लिमांना भडविण्याचा उद्योग करत आहे. मुस्लिम समाजात गरीबी, अधिक आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पण काँग्रेस सरकारने मुस्लिमांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी व या समाजाची शैक्षणिक, आर्थिक प्रगतीसाठी कधीच प्रयत्न केले नाहीत. त्यांना कट्टर धार्मिकतेत बांधून ठेवले,त्यांचेत व्देषाचे बीज पेरले.ते केवळ राजकीय स्वार्ध साधण्यासाठीच! आता काँग्रेस पक्षाचा तुष्टीकरणाचा चेहरा समोर येवू लागला आहे.देशात यापूर्वी मुस्लिमांना सिमी पी.एफ. आय, संघटनेने राष्ट्र विरोधी कारवाया केल्या.आता आय. एम. आय. एम.नेते व मुल्ला मौलवी हे धार्मिक भावना भडकवित आहेत. भाजपा हा राजकीय पक्ष आहे.तो हिंदूत्वादी आहे, याचा अर्थ मुस्लिम विरोधी मुळीच नाही. तो सर्व आदर करतो! हिंदु धर्माची हिच शिकवण आहे. हिंदु र्‍हदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे बाबतीचा प्रसंग आहे.त्यांचकडे व्यावसायिक महेमूद शेख नावाचे भेटण्यासाठी मातोश्रीवर गेले होते. त्याचवेळी नमाजची वेळ झाली, तेंव्हा बाळासाहेंबाच्या लक्षात आले, त्यांनी त्यांना मातोश्रीवर नमाज पढण्यासाठी जागा दिली.त्यामुळे हिंदु धर्म बाटला नाही! कोणी त्यांचे विरोधात फतवा काढला नाही. इस्लाम धर्मात तर इतर धर्मातील लोकांना 'काफीर' समजले जाते! काही कट्टर मौलवी कट्टरपथी धर्माच्या आधारावर संपविण्याचे भाषा करतात, पश्चिम बंगालमध्ये हिंदू धर्मावर अत्याचार वाढत चालले आहेत. पण सर्व प.बंगालच्या परिस्थितीवर भाष्य करत नाहीत! पाक, बांगला देश, अफगानीस्तान या इस्लाम राष्ट्रात अल्पसंख्याकावर धार्मिक अत्याचार वाढत चालले आहे.या राष्ट्रातील धार्मिक पीडीतत अल्पसंख्याकांना भारतीय नागरिकत्व देणारा (CAA) कायदा आहे. तो भारतीय मुस्लिमांचे नागरिकत्व काढणारा कायदा नाहीये! फण !असा अप्रचार काँग्रेस पक्षाने "मुस्लिम विरोधी' म्हणत या कायद्याबाबत गैरसमज पसविला.भारतात भाजपा,शिवसेना राजकीय पक्ष आहेत पण मुस्लिम समाज या पक्षाला अस्पृश्य मानतो दुसरीकडे काँग्रेस हा धर्मनिरपेक्षतेचा बुरखा घालून मुस्लिम समाजाची फसवणूक करत आहे.या पक्षाने समाजाचे कधीही भले नाही केले नाही. तो प्रिय वाटतो! याचे आश्चर्य वाटते. राज्याचे मुख्यमंत्री आशोक चव्हाण भाजता येताच! मुस्लिम नेते त्यांचेपासुन दूर झाले! आतात् यांना त्यांछी मानसिकता लक्षात आली असावी. भारताचा इतिहास पहाता, भारतावर अतिक्रमण मुस्लिम राजांनी इस्लाम धर्मासाठी सक्तीचे धर्मांतर व इतर धर्मियांची हत्या,अमानुष छळ करत आलेला आहे. आजही स्वातंत्र्यानंतर मुस्लिम लिग, रझाकार एम आय. एम या संघटना इस्लाम कट्टरतेचे समर्थक आहेत. राष्ट्रविरोधी एम आय, एम.चा चेहरा बदलला आहे.ती आय. एम आय एम. ही राजकीय संघटना असली तरी मानसिकता तीच आहे. भारतात दरवर्षी १२ लाख हिंदू मुस्लिम ख्रिचन धर्मांतर केले जाते. तर मुस्लिम केवळ ३२ जण हिंदू धर्म स्विकारतात. जमाते ए- इस्लामी या संघटनेने नवीन रूप म्हणजे सिमी इस्लामिक तरुणांची संघटना स्थापन केली. ही संघटना अतिरेकी व राष्ट्र विरोधी कारवाया करू लागल्याने २००१ मध्ये संघटनेवर बंदी घातली गेली. आता असोदोद्दीन औवेसी यांचे आय एम. आय. एम हा पक्ष कधी धर्माचा आधार कधी घटनेचा आधार घेत असतो.पॉपुलर फ्रंट आँफ इंडिया ( पी,एफ आय,) गजवा -ए.हिंद. म्हणजे २०४७ पर्यंत भारत इस्लाम राष्ट्र करण्याचे कारस्थान केले जात होते. ही संघटना १५ राज्यात कार्यरत होती. या देशात या संघटनेला दंगली, हिंचासार व हत्या करुन धुमाकूळ घातला होता. काश्मीरमध्ये फुटीर संघटनानी अतिरेक्यांच्या मदतीने तेच केले. त्यांच्यासाठी ३७० कलम कवच होते. ते कलमच भाजपा सरकारने रद्द केले! आज नवीन जम्मू- काश्मिर उभा राहत आहे.पीएफ आय व त्यांचे सलग्न असलेल्या आठ संघटनावर बंदी घातली गेली. दारूल -उलूम देवबंद यांचेकडून आजपर्यंत धार्मिक फतवे काढले जात होते. भारतीय संसदेने मंजूर केलेल्या कायद्याच्या विरोधात फतवे काढले गेले! आता 'गजवा- ए हिंद' म्हणजे इस्लामच्या प्रसारासाठी युध्द करणे, या युध्दात सहभागी झालेल्यांना लडाकू म्हणजे गाजा म्हंटले जाते. याचा अर्थ भारताविरुध्द युध्द करुन इस्लामिक राष्ट्रीची स्थापना करणे असाच हेतू आहे. त्या भूमिकेला पाठिंबा देणारा फतवा काढला गेला आहे. हे धाडस म्हणावे! देवबंदमध्ये मुलांना इस्लामच्या धर्माच्या शिक्षणाच्या नावाखाली कट्टरतेचे व राष्ट्र विरोधी शिक्षण देत आहे. त्यामुळे राष्ट्रीय बाल हक्क आयोगाने दारुल उलूम व देवबंद कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.देशात अतिरेकी जगभरातील शंभराच्या वर अतिरेकी संघटनावर केँद्र शासनाने बंदी घातली आहे. खर तर! केंद्र शासनाने अश्या राष्ट्र विरोधी शिक्षण देणाऱ्या मदरसावर आणि संघटनेला ठेचून काढले पाहिजे. अन्यथा 'आस्तीन साप'हे भारताला डचल्याशिवाय राहणार नाहीत हे लक्षात ठेवावे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

फडक्यांची यशोदा बाबारावांची पत्नी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे धाकटे बंधू बाळाराव उर्फ नारायणराव यांची येसूवहिनी बनून आली . त्यावेळी लवकर लग्ने होत असत. लग्न झाले तेव्हा येसूवहिनी केवळ दहा बारा वर्षांच्या असतील. पण समज खूप आलेली होती. त्यांना लिहिता वाचताही येत नव्हते. सावरकरांनीच आपल्या वहिनीला लिहावाचायाला शिकवले. पुढे बाबाराव शिकण्यासाठी नासिकला गेले. तेथे त्यांनी योगशास्त्राचा अभ्यास केला. त्यातून त्यांचे मन विरक्त होऊन संन्यास घेण्याचे त्यांनी ठरवले होते. त्याच सुमारास नासिकला प्लेगची साथ आली. त्यामुळे बाबाराव पुन्हा भगूरला आले. भगूरलाही प्लेगची साथ आली आणि त्या साथीत येसूबाईंचे सासरे आणि चुलतसासरे यांचा मृत्यू झाला. सावरकरांचे धाकटे बंधू नारायणराव यांनाही प्लेगची लागण झाली आणि त्यांची स्थिती अत्यंत गंभीर झाली. त्यावेळी बाबाराव आणि येसूवहिनी यांनी त्यांची शुश्रूषा करून त्यांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. पण सावरकर कुटुंबीयांची आर्थिक स्थिती आता खालावली होती. आता दोन्ही भावांचे शिक्षण नासिकला करण्याचे ठरवून सावरकर कुटुंबीय नासिकला आले. या ठिकाणी त्यांना अत्यंत हलाखीत दिवस काढावे लागले.

याच दरम्यान बाबाराव सावरकरांनी मित्रमेळा या ' अभिनव भारत ' क्रांतिकारी संघटनेशी संबंधित संस्थेचे संघटन केले. स्वातंत्र्य प्रचाराच्या कार्याच्या दृष्टीने त्यांनी नऊ पुस्तिकांचे प्रकाशन केले. त्यात स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्याही कविता होत्या. या पुस्तिकांच्या प्रकाशनासाठी आणि घर चालवण्यासाठी येसूवहिनींनी आपले सौभाग्यालंकार विकून वेळोवेळी पैसे उभे केले. पुढे याच पुस्तिकांच्या प्रकाशनावरून बाबारावांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. याच दरम्यान सावरकर शिक्षणासाठी इंग्लंडला गेलेले होते आणि तेथून ' इंडिया हाऊस ' मधून स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे ते हलवत होते. त्यांना जेव्हा ही बातमी कळली, तेव्हा त्यांनी आपल्या वहिनींच्या सांत्वन करण्याच्या उद्देशाने अप्रतिम अशी ' सांत्वन ' ही कविता लिहिली. या कवितेतल्या काही ओळी मी वर दिल्या आहेत. त्यातील पुढील काही ओळी बघा
अनेक फुले फुलती, फुलोनिया सुकोनी जाती कोणी त्यांची महती गणती,
ठेवली असे ?



## आनंदी पहाट

## सकारात्मक विचार व आचारांमुळे मनावर संस्कार होतात

आधुनिक केसरी

आजवर मनावर अनेकप्रकारे अनेकांनी भाष्य केले आहे. संतांनी देखील जगाला एकच गोष्ट सांगितली, ती म्हणजे मनाचे स्वास्थ्य टिकवा. ह्याचा अर्थ शरीराकडे दुर्लक्ष करा, असे अजिबात नाही. परंतू मन दिसत नसल्यामुळे त्याचा विचार आपल्याकडून कमी होत असतो. शरीर मात्र दिसत असते, त्यामुळेच ते सदैव सुंदर ठेवले जात असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शरीराचीच काळजी अधिक घेतली जाते. शरीराला पौष्टिक खाद्य देण्यातही आपण कधी मागे हटत नाही, खर्चाचा तर अजिबातच विचार करत नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खरे म्हणजे मानसिक स्वास्थ्यच अधिक महत्वाचे आणि मोलाचे असते. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने एकूणच जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कार्यकृतीत इतका विचार केलेला नसतो, हेही तितकेच खरे. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याचे, हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. ते घर कितीही छोटे असले तरीही फरक पडत नाही, पण आपले मन मात्र मोठेच असायला लागते. अर्थात, घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते.




आधुनिक केसरी

## अद्वैती सोहळा | संत कृपे ||

सांभाळावे मज | तुम्ही संत जन ||
पामराचे गान | ऐकावे जी ||१||
शिकोनिया झाला | अहंकारी जीव ||
करा माझी कीव | मार्ग दावा ||२||
अज्ञानासी काय | ठाव ज्ञान मुक्ती ||
भाव भोळी भक्ती | माझी एक ||३||
सत्य मिथ्या दैव | आकळेना काही ||
तुम्हा विन नाही | जाण मुढा ||४||
वारीत गावला | जीवीचा जिव्हाळा ||
अद्वैती सोहळा | संत कृपे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)


## अनाथाचा नाथ

मोगल, आदिलशाह, निजामशाह आणि कुतुबशाह हे सत्तेसाठी एकमेकांच्या जीवावर उठले होते. साम्राज्यासाठी झुंजत होते सुलतान आणि मरत होते मराठे.सुलतान सत्तेकरिता लढायचे आणि मरायचे मराठे. रडायचे मराठ्यांच्या विधवा बायकांनी अन पोरक्या पोरांनी. लढाया काही काळ थांबत त्या थांबल्या तरी रोजचे हाल चालूच राहत. गरीब शेतकरी आणि बलूतेदार यांचे जगणे हैराण झाले होते,नको झाले होते,मावळ्यांच्या अंगाला कपडा मिळत नव्हता, पिकवलेल्या अन्नावर त्यांचा हक्क उरत नव्हता तो हक्क फौजांचा.धान्यावर, बायकोवर, स्वतःवर त्यांचा हक्क उरला नव्हता ,अशी असह्य अवस्था सर्वांची झाली होती. याच अशा अत्यंत जुलमी अशा कालखंडात एक नाथाचा जन्म झाला.पैठणमध्ये तो जन्माला आला.सर्वांना एकत्र करून, सर्वांना विठ्ठल भक्तीचा आसरा त्यांने दिला.कथा, कीर्तन, पुराण, भागवत सांगता सांगता सुलतानांचा असहय जाच सर्वांपुढे मांडला. बादशाही जुलुमांचा अतिरेक झाला असता ब्राह्मणांचे सोवळे,ओवळे,क्षत्रियांची लाचारी, वैश्यांची लांडी, लबाडी कमी होत नव्हती. सामान्य जणांना कुणाचाही आधार उरला नव्हता. सर्व बाजूंनी अडवणूक होत होती. अशा विचित्र परिस्थितीत एकनाथांचा मोठा आधार जनसामान्यास झाला. नाथांनी दुःखीताना हाक मारली.नाथाभोवती व विठ्ठलाभोवती लोक जमू लागले. टाळ मृदुंग पुन्हा वाजू लागले.भजन कीर्तनात लोकांना समाधान, भक्ती, विरंगुळा आणिआनंद मिळत होता. धार्मिक, सामाजिक जुलूमाच्या काळात अशाप्रकारे नाथांनी आनंदाची पेरणी करण्यास सुरुवात केली.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बिना नीर फूले कमल,
दृश्य अलौकिक ज्ञान ।
सन्त याहि सुख जानहीं, भेदिक
परम सयान ।।४८।।(स्वर्वेद
प्रथम मण्डल प्रथम अध्याय)
०१/०१/४८
मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
पाण्याविनाच हे अष्टकमल
फुलतात, प्रफुल्लित होतात
आणि हे अलौकिक दृश्य प्राप्त
झाल्यावर योग्याच्या अंतरात एक
विशेष ज्ञानधारा प्रवाहित होऊ
लागते. अष्टकमल विकसित
भेदिक विवेकी संतच या परम
सुखाला जाणतात.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## परमेश्वराची खरी पूजा

आधुनिक केसरी

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ‘ मी साधन करतो ’ असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे. भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती,



आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ‘ रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ’ सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ‘ रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ’ असे आपण मनःपूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल. ‘ माझ्या देवाला हे आवडेल का ? ’ अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे निःसंशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही. **२९८. उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.**

## गुणरूपनिरसन



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

रूपांमध्ये बदल होतो पण नावामध्ये बदल होत नाही. नाम म्हणजे वस्तूंचे अंतरंग ते जाणीवमय व सुक्ष्म शक्तिमान असते. रूपांमध्ये बदल होतो पण नामामध्ये बदल होत नाही. जाणीवेतून जिवंतपणा आणि जीवंतपणातून मन प्रगट होते. वस्तूला अथवा प्राण्यांच्या शरीरातील जाणीव व्यापून रहाते.

रविवार, ३ मार्च २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १९२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 3 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-192 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# टीएमसी : अत्याचार, छळाचे दुसरे नाव

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ममता बॅनर्जींवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता : ममता बॅनर्जी यांच्या काळात पश्चिम बंगालची अधोगती झाली. प्रत्येक योजनेत याठिकाणी भ्रष्टाचार दिसतो. केंद्राच्या योजनांनाही टीएमसी सरकार स्वतःचे स्टिकर लावून खपवते. गरीबांचा अधिकार हिरावून घेण्यात या सरकारला काहीच कमीपणा वाटत नाही. अत्याचार आणि छळाचे दुसरे नावच आता टीएमसी असे घेतले जाते. टीएमसीसाठी बंगालचा विकास ही प्राथमिकता नसून भ्रष्टाचार, घराणेशाही आणि छळवाद हेच त्यांचे महत्त्वाचे काम राहिले आहे, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ममता बॅनर्जींवर हल्लाबोल केला.**

टीएमसीचा अर्थ 'तू, मी आणि करप्शन', पंतप्रधान मोदींचा ममता बॅनर्जींच्या सरकारवर टीका पश्चिम बंगालमध्ये सध्या राजकीय वातावरण तापलेले दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून संदेशखालीमधील शाहजहान शेख यांच्या अटकेच्या मागणीसाठी भाजपाने जोरदार निदर्शने केली. तर इंडिया आघाडीला डावलून ममता बॅनर्जी यांनी स्वबळावर लोकसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यामुळे काँग्रेसही ममता बॅनर्जी यांच्याविरोधात आक्रमक झाल्याचे पाहायला मिळते. भाजपासाठी पश्चिम बंगालमध्ये अधिकाधिक जागा निवडणून आणण्याचे आव्हान आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालच्या कृष्णा नगर येथे एक जाहीर सभा घेतली. या सभेत त्यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. तृणमूल काँग्रेस पक्षाचे इंग्रजीतील छोटे स्वरुप टीएमसी असे आहे. या नावाचा अर्थ सांगताना पंतप्रधान मोदी म्हणाले, तू, मी आणि करप्शन असा आहे.

टीएमसीसाठी बंगालचा विकास ही प्राथमिकता नसून भ्रष्टाचार, घराणेशाही आणि छळवाद हेच त्यांचे महत्त्वाचे काम राहिले आहे. बंगालच्या जनतेने गरीब राहावे, असा टीएमसीचा प्रयत्न आहे. जेणेकरून त्यांचा राजकारणाचा खेळ असाच सुरू राहिल. तृणमूल काँग्रेसमधून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलेल्या शाहजहान शेख नेत्यावरून भाजपाने टीएमसीवर आरोपांची राळ उठविली.



शाहजहान शेखवर लैंगिक अत्याचार आणि जमीन बळकावल्याचे आरोप ठेवण्यात आलेले आहेत. शाहजहान शेख ५५ दिवस लपून राहिल्यानंतर २९ फेब्रुवारी रोजी त्याला मीनाखान परिसरातून अटक करण्यात आली होती. त्यानंतर बशीरहाट न्यायालयाने त्याला १० दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

पंतप्रधान मोदी यांनी या प्रकरणावरुन तृणमूल काँग्रेस पक्षावर निशाणा साधला. ते म्हणाले, बंगालमधील गुन्हेगारांना कधी अटक करायचे, हे बंगालचे पोलीस ठरवू शकत नाहीत, इथे गुन्हेगार ठरवितात की त्यांच्याबरोबर काय होणार. मी संदेशखालीमधील महिलांचे अभिनंदन करू इच्छितो की, त्यांनी न्याय मिळविण्यासाठी रस्त्यावर येऊन निदर्शने केली. छळ, हिंसाचार आणि अत्याचाराविरोधात त्यांनी आवाज उचलल्यामुळेच शाहजहान शेखची अटक होऊ शकली.

# 'समृद्धी'ला शिंदे-फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे भगदाड

## नाना पटोले : दीड वर्षातच समृद्धी महामार्गाच्या कामाचे पितळ उघडे पडले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई ते नागपूर ७०० किलोमिटरच्या समृद्धी महामार्गाचा शिंदे-फडणवीस सरकारने मोठा गाजावाजा केला, जाहिरातबाजी करुन पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटनही केले. १२ तासात मुंबईहून नागपूरला पोहचणार असा दावा करणाऱ्या महामार्गाचेच १२ वाजले आहेत. समृद्धी महामार्ग पहिल्यापासूनच वादग्रस्त ठरला आहे. सातत्याने होत असलेल्या अपघाताचा प्रश्न असताना आता या महामार्गावरील एका पुलाला मोठा खड्डा पडला आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे समृद्धी महामार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह तर निर्माण झाले आहे. पुलावर पडलेला हा केवळ खड्डा नसून 'समृद्धी'ला शिंदे-फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे पडलेले हे भगदाड आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावजवळच्या पुलाला खड्डा पडल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अवघ्या १४ महिन्यातच पुलावर भला मोठा खड्डा पडल्याने या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यात व बांधकामात त्रुटी असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. नागपूर-मुंबई समृद्धी हा ५५ हजार कोटी रुपयांचा महामार्ग सुरुवातीपासूनच भ्रष्टाचाराचे कुरण ठरला आहे. महामार्गासाठी जमीन संपादन करताना मोठा भ्रष्टाचार झाला तसेच या महामार्गाच्या तांत्रिक बाबीमध्येही गडबड आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यासाठी तज्ज्ञांच्या विशेष पथकाला हजारो कोटी रुपये दिले पण अपघाताचे प्रमाण पाहता रस्ते बांधणी करताना फारशी काळजी घेतल्याचे दिसत नाही.

# आसारामची शिक्षा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामची प्रकृती खालावत असल्याने शिक्षेला स्थगिती द्या, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. वय आणि गुंतागुंतीचे आजार लक्षात घेऊन शिक्षा स्थगित करा अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली होती. आसारामने खोपोलीतील रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला स्वीकारला असल्याचे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी सांगितले. त्यानंतर न्या. संजीव खन्ना, न्या. दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने रोहतगी यांना या प्रकरणी राजस्थान उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले. न्या. खन्ना यांनी या खटल्यातील दोषारोप आणि शिक्षेविरुद्ध उच्च न्यायालयासमोरील अपीलाच्या सुनावणीला जाणीवपूर्वक विलंब करण्याच्या आसारामच्या प्रयत्नाकडेही लक्ष वेधले.

# वाघांच्या जतनाबाबत देशाची शान ठरलाय ताडोबा : रविना टंडन

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवारांचे नेतृत्व, गावकऱ्यांच्या सहकार्याने साकारले स्वप्न

आधुनिक केसरी न्यूज

चंद्रपूर : वाघांचं जतन करून त्यांची संख्या वाढविण्याबाबत संपूर्ण देशाला जो अभिमान वाटतो, त्याचे सर्वाधिक श्रेय ताडोबाचे आहे. राष्ट्रीय संपदा, माणसं आणि निसर्गाचा समतोल राखत ही जी निसर्ग रक्षणाची घोडदौड चालली आहे, त्याचे श्रेय वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे कुशल नेतृत्व, वनविभागातील कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि जंगलातील गावकऱ्यांचे सहकार्य यामुळे साकार होऊ शकले आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री व वन्यजीव सद्भावना दूत रविना टंडन यांनी शुक्रवारी चंद्रपूर येथे केले. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून आयोजित चंद्रपूरच्या चांदा क्लब मैदानावर तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा वनबलप्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक विरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण चव्हाण, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आदि मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना रविना टंडन अक्षरशः भावूक झाल्या. 'माझं ताडोबाशी फार जवळचं आणि भावनिक असं नातं आहे. मी अनेकदा इथे येते. ताडोबाच्या जंगलातील वाघ आणि त्यांचे परिवार ओळखता यावेत इतकी भटकंती मी ताडोबात केली आहे. ताडोबा हे प्रेमाचं जंगल आहे. इथे आलं की माणूस या जंगलाच्या मोहात पडतो,' अशा भावना व्यक्त करतानाच, पर्यावरण, जंगल आणि वाघांच्या संवर्धनासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार अतिशय स्तुत्य उपक्रम राबवित असल्याचे




गौरवोद्गारही त्यांनी काढले. आपल्या भाषणात रविना टंडन यांनी वनसंवर्धनाचं काम करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांपासून तर जिप्सी चालक, गाईड आणि गावकरी सर्वांना श्रेय बहाल करत, असंच काम करत राहण्याचं आवाहन केलं. एखाद्या वाघिणीने पिलाला जन्म दिल्याची बातमी जशी आनंद देऊन जाते, तसेच एखाद्या वाघाच्या मृत्यूची घटना तेवढीच वेदनादायी असते. पण एक मात्र खरं आहे की ताडोबाच्या जंगलाची जादू जगात कुठेही बघायला मिळत नाही. म्हणूनच या टायगर कॅपिटलची महती मी जगाला सांगणार आहे. जगाच्या पाठीवर जिथे जाईल तिथे ताडोबाचा झेंडा फडकावणार असल्याची ग्वाही देखील रविना टंडन यांनी यावेळी दिली.


# धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**धर्माचा अर्थ अनेक लोकांनी विविध प्रकारे सांगितलेला असला तरी धर्म म्हणजे जगण्याची रीत असा एक सर्वसमावेशक अर्थ आपण घ्यावयास हरकत नाही. आजच्या परिस्थितीत राजकीय पक्ष हे आधुनिक काळातील धर्मच आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात जगण्याची रीत म्हणा अथवा शोषणाची व्यवस्था म्हणा ही धर्माच्या अनुषंगाने होत होती, जी आज राजकीय पक्षांच्या अनुषंगाने ही व्यवस्था उभी राहू पाहत आहे. म्हणूनच धर्म काय किंवा राजकीय पक्ष काय हे एकमेकांचे पर्यायवाची शब्द आहेत की काय अशी एक दाट शंका मनात येऊन जाते.**



## क्षितिजापल्याड

हिंदू, इस्लाम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन या सर्व धर्मांची स्वतःची काही जगण्याची तत्त्वे आहेत, त्याला अनुसरून त्या त्या धर्माचे अनुयायी आपले वर्तन करत असतात. त्या धर्माच्या अनुषंगाने कोणी काही इतरेजणांनी टिप्पणी केली तर त्या विरोधात सर्वजण एकत्र येऊन टोकाचा विरोध करतात. आपल्यात सुधारणा व्हावे असे त्यातील काही लोकांना वाटते, परंतु बहुसंख्यांकांच्या रेट्यामुळे या सुधारणा संथ गतीने होत असतात. या प्रत्येक धर्मातही अनेक पंथोपपंथ आहेत आणि या अस्तित्वात असलेल्या पंथांचे एकमेकांशी फार काही जमत नाही. किंबहुना इतर धर्मियांपेक्षा ते आपल्या धर्मातील इतर पंथांचा दुस्वास करतात तद्वतच आजच्या आधुनिक काळात समाजवाद, लोकशाही, साम्यवाद, राजेशाही, हुकूमशाही ही सर्व विचारधारा देशांतर्गत अथवा संपूर्ण जगाचे कल्याण करण्याच्या निमित्ताने पुढे सरसावत असली तरी एक जीवन प्रणाली दुसऱ्याचा एवढा टोकाचा विरोध करते की दुसऱ्याचे अस्तित्व समूळ नष्ट करून त्याच्या जागी आपली विचारधारा बिंबवण्याचा कसोशीने प्रयत्न करते. बरे या सर्व विचारधारा केवळ आपल्या विरोधी विचारांना विरोध करतात आणि अंतर्गत बाबतीत फार सहनशीलतेने आणि सहानुभूतीने वागतात असे नव्हे. उदाहरणादाखल ज्या लोकशाही व्यवस्थेमध्ये आपण राहतो, नांदतो या व्यवस्थेमधील विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे शेवटचे ध्येय हे देशांतर्गत जनतेचे कल्याण साधने असे असले तरी आपल्या विरोधातील किंवा दुसऱ्या राजकीय पक्षातील व्यक्तींवर ज्या रीतीने टीका आणि टिप्पणी केली जाते ते पाहिले असता खरेच यांच्या मनात लोकशाही निकोप व्हावी असे काही आहे का? असा प्रश्न सामान्य माणसास पडतो. उदाहरणादाखल भारतातील काँग्रेस, भाजपा, शिवसेना, तृणमूल काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आप, अकाली दल, माकपा, भाकपा, वंचित बहुजन आघाडी किंवा त्या त्या प्रदेशातील इतर स्थानिक राजकीय पक्ष हे एकमेकांच्या विरोधात एवढ्या खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य करत असतात ते ऐकले म्हणजे हे सर्व लोक कोणती लोकशाही मजबूत करण्याच्या गोष्टी करत आहेत, याविषयी शंका येते. आपल्या विरोधकांचेही म्हणणे तेवढ्याच तन्मयतेने आणि सहानुभूतीने ऐकून घ्यावे अशी एकूण सांस्कृतिक पार्श्वभूमी करण्याची जबाबदारी ज्या सत्ताधारी वर्गावर आहे, तोच दडपशाहीचे धोरण अवलंबत असेल तर इतर राजकीय पक्ष, सामाजिक संघटना किंवा व्यक्तिगत पातळीवर कोणी व्यवस्थेतील दोष दाखवणे, उचित कार्यास प्रेरणा देणे आणि समाज विकसित होईल अशा स्वरूपाचे काही कार्य करणे यास बाधा पोहोचेल. एक प्रकारचा अतिरेकी कडवटपणा सर्वत्र फोफावत असल्याचे लक्षात येत आहे. आजच्या धकाधकीच्या आणि महागाईच्या काळात सामान्य माणसाला इतर कशाकडेही लक्ष द्यायला वेळ नाही किंवा आपला हा वेळ वाया जाऊ नये, सर्व समाजाने आपापली कामे करावीत आणि आपल्या प्रतिनिधींनी आपले हे राष्ट्र म्हणजेच आपले घर व्यवस्थितपणे चालवावे, यासाठी निवडणुकांच्या माध्यमातून प्रातिनिधिक स्वरूपात काही प्रतिनिधी आपण पाठवून देत असतो. या प्रतीनिधींना स्वतःचा राग, लोभ, मोह, इर्षा, द्वेष स्वार्थ, प्रतिष्ठा, सन्मान, अपमान अशा कोणत्याच गोष्टी असू



नयेत ही एक रास्त अपेक्षा अपेक्षित असते. परंतु धर्माचे ठेकेदार ज्या पद्धतीने मी म्हणेल तीच पूर्व दिशा, तीच उपासना पद्धती किंवा तसेच वर्तन धर्मानुयायांनी केले पाहिजे, असे दंडक विधान घालून देतात. अगदी त्याच रीतीने राजकीय पक्षातील पुढाऱ्यांनी मी म्हणेल तीच पूर्व दिशा असे आपल्या अनुयायांना बजावून ठेवले की काय असे वाटू लागले आहे. तुम्ही ज्या पक्षाचे, ज्या विचारांचे असाल तो विचार, तो पक्ष हे साधन आहे, साध्य नव्हे. तुम्ही एकदा सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर केवळ तुम्ही त्या पक्षाचे किंवा त्या विचाराचे असत नाहीत तर एकूण समाजाचे प्रतिनिधी म्हणून आपल्याकडे समाज पाहत असतो. भलेही तुम्हाला मतदान न करणारा मतदार देखील मतदान करणाऱ्या व्यक्ती एवढाच मानाचा असतो. दोघांमध्ये कोणत्याही प्रकारचे द्वैत साधने हे व्यवस्था म्हणून मारक ठरणारे असते. आज अमुक पक्षाचे सरकार अस्तित्वात आहे म्हणून आपल्या पक्षाच्या ध्येयधोरणांचा पुरस्कार करणाऱ्यांना संधी आणि विरोधकांना परिघाच्या बाहेर ढकलणे हे राष्ट्र म्हणून, समाज म्हणून हिताचे नाही. सर्वांचे सर्व काळासाठी सर्वांगीण सुख आपण देऊ शकलो नाही तरीही ते एक ध्येय समजून त्या पद्धतीने आपले वर्तन असले पाहिजे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करणे जसे बरोबर नाही तसेच सत्ताधाऱ्यांनी आपल्या सत्तेचा दुरुपयोग करून विरोधकांना सरळ करणे, त्यांची मुस्कटदाबी करणे, हेही समाजहिताचे नाही. एवढेच नाही तर देशांतर्गत अस्तित्वात असणाऱ्या विविध सामाजिक संघटना हे शरीरातील रक्ताभिसरण ज्या पद्धतीने सुरळीत राहण्यासाठी इन्सुलिनची आवश्यकता असते त्याच पद्धतीने सामाजिक संघटना काम करत असतात. व्यवस्थेमध्ये जे ब्लॉकेज तयार झालेले आहेत ते ब्लॉकेज दूर व्हावेत, रक्ताभिसरण सुरळीत चालू राहावे यासाठी सामाजिक संघटना नेहमीच तत्पर असतात. अशा सर्व सामाजिक संघटना कमी अधिक प्रमाणात समाज हिताच्या, देशहिताच्या गोष्टी करत असताना जाणते अजाणतेपणी जर त्यांच्याकडून काही दूर्वर्तन झाले तर तेवढ्यापुरते त्यांना शासन करून किंवा समज देऊन पुढे जाणे हे सत्ताधाऱ्यांचे काम असते. अशा विरोधकांच्या किंवा सामाजिक संघटनांच्या बाबतीत आपल्या मनात एक प्रकारचा द्वेष निर्माण होत असेल किंवा त्यांना संपवण्याचे षडयंत्र आपण रचत असू तर मात्र ही व्यवस्था म्हणून हिताचे ठरणार नाही. तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे निंदकाचे घर असावे शेजारी या उक्तीप्रमाणे आपले विरोधक सामाजिक संघटनांच्या रूपाने असणारे समाजातील दबाव गट हे सत्ताधाऱ्यांना एक प्रकारे सुधारण्याचा प्रयत्न करतात आणि व्यवस्था व्यवस्थित चालावी यासाठीचा हा प्रयत्न असतो. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत.)**

# तृणधान्यांचे महत्त्व विशद करणारे पुस्तक



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**शरीराची योग्यरित्या वाढ होण्यासाठी, शरीराला आवश्यक पोषक मूल्ये मिळावीत म्हणून आपण अन्न ग्रहण करतो. शरीराला ऊर्जा प्रदान करण्यासाठी अत्यंत आवश्यक असे हे माध्यम. आपण रोज जी कामे करतो, त्यासाठी जी धडपड़ करतो ती पोटभर अन्न मिळावे म्हणून. पण शरीराला आवश्यक असणारे पोषक तत्वे आपल्याला आपण खात असलेल्या अन्नातून मिळतात का ? याचा विचार करायला हवा. मिलेट अर्थात तृणधान्याचा आपल्या आहारात किती टक्के समावेश आहे ? गहू आणि तांदूळ या पलीकडे अनेक तृणधान्य आहेत, जी आपल्या शरीरासाठी फायदेशीर आहेत. या तृणधान्यांची नावेसुद्धा आजच्या पिढीला माहीत नाहीत. पाश्चात्य संस्कृतीतील खाद्यपदार्थ मुलांना लगेच आकर्षित करतात.**

आपल्या भारतीय संस्कृतीत सुद्धा असे अनेक मिलेट्स आहेत, जे पौष्टिक आहेत आणि त्याचा आपल्या आहारात समावेश करणं आवश्यक आहे. यूनाइटेड नेशन्सने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले होते. या निमित्ताने लेखक डॉ. पुष्कर वाघ यांनी तृणधान्यांचे शास्त्रीय तसेच पर्यावरणीय दृष्टिकोनातून असलेले महत्त्व अधोरेखित करण्यासाठी 'मिलेट मंत्र - आहारापासून औषधापर्यंत' या माहितीपूर्ण पुस्तकाचे लेखन केले आहे. या पुस्तकात एकूण १४ प्रकरणे असून प्रत्येक प्रकरणातून तृणधान्यांचे आयुर्वेदिक दृष्टीने असलेले महत्त्व, त्याचा इतिहास, पौराणिक तसेच ऐतिहासिक ग्रंथात तृणधान्यांचे असणारे संदर्भ, तृणधान्यांची शास्त्रीय नावे,ही पीके कोणत्या राज्यात तसेच कोणत्या ऋतुत प्रामुख्याने घेतली जातात, यांचा आपल्या आहारात समावेश केल्यास कोणती पोषक तत्वे प्राप्त होतात, तसेच शारीरिक व्याधींवर ते कसे मात करतात, याची अगदी तपशीलवार आणि विश्वसनीय माहिती या पुस्तकातून मांडली आहे. पूर्वीच्या पिढ्यातील लोक पाहिले तर ते निरोगी दिसून येतात कारण त्यांच्या आहारात मुख्यत : तृणधान्यांचा समावेश होता.ज्वारी, बाजरी , नाचणी, कोदो, राळे, भगर, राजगिरा, कुट्टू, वरी, हिरवी कंगणी, सावे अशा तृणधान्यांपासून बनवलेले पदार्थ पूर्वी खाल्ले जायचे. पण हल्ली गव्हाची चपाती आणि तांदळाची भाकरी या पलिकडे मिलेट्सची व्याप्ती आहे, याचा विसर पडला आहे. परंतु लेखकाने या पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले आहे. हल्ली शरीरातील प्रतिकारशक्ती कमी झालेली दिसून देते. आजारांचे प्रमाण वाढले आहे, यामागील कारण म्हणजे आपल्या आहारातील कमतरता. मुलांना तर जंक फूड , फास्ट फ़ूडचे आकर्षण आहे. त्यांमुळे ही पौष्टिक मूल्ये शरीरास मिळत नाहीत आणि अनेक व्याधी डोके वर काढतात. 'मिलेट मंत्र' या पुस्तकात आयुर्वेदीय महत्त्व लाभलेल्या मिलेट्सची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.प्रत्येक प्रकरणाची शीर्षके आकर्षक आहेत. लेखकाने फक्त तांत्रिक आणि शास्त्रीय माहिती न देता ती माहिती कथेच्या माध्यमातून रंजकपणे सांगितली आहे. त्यामुळे वाचताना रूची वाढत जाते आणि त्यामागील अर्थ, सार सहजपणे सामान्य वाचकांना आकलन करता येते. या पुस्तकाचे वैशिष्टय म्हणजे, ही तृणधान्य आपल्याला सहज ओळखता यावीत म्हणून पुस्तकात त्यांची चित्रेही दिली आहेत. तृणधान्यांचे गुणधर्म सांगताना लेखकाने , कोणती तृणधान्ये कोणत्या ऋतुत खावीत आणि त्याचे प्रमाण किती असावे, ते कोणत्या स्वरूपात खावीत , याचीही माहिती दिली आहे. सहसा एखादा आजार झाल्यावर आपण पथ्य पाळतो, पण हे आजार होऊ नयेत, म्हणून सतर्क राहून या मिलेट्सचा आपल्या आहारात समावेश केला तर आपण निरोगी आयुष्य जगू शकतो, हा महत्त्वाचा मंत्र या पुस्तकातून देण्यात आला आहे. भगर, वरी, राजगिरा ही मिलेट्स फक्त उपवासाला खाल्ली जातात. पण याची नेमकी सुरुवात झाली कशी? त्याचे आयुर्वेदीय गुण कोणते, त्याची उत्पत्ती आणि इतिहास याची विस्तारित माहिती देणारे हे पुस्तक आहे.मुख्य म्हणजे या मिलेट्सच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिची आणि त्यांच्या कार्याचीसुद्धा लेखकाने दखल घेतली आहे.

तृणधान्य पौष्टिक असली तरी दिवसातून किती तृणधान्य खाल्ले गेले पाहिजे, याचे प्रमाण लक्षात घेतले पाहिजे तसेच तृणधान्य खाण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी, हेसुद्धा पुस्तकात दिले आहे. प्रत्येक गृहिणी आणि आईना वाटत असते की सर्व पौष्टिक तत्वे आपल्या कुटुंबातील सदस्यांना विशेषतः मुलांना मिळावीत पण हे नको, ते नको




म्हणण्याच्या मुलांना ही तृणधान्य कशी खावू घालायची, याची मुळीच काळजी करु नका कारण या पुस्तकात लेखकाने मिलेट्सपासून तयार करता येणाऱ्या ५० पाककृतीसुद्धा दिल्या आहेत. त्यात नाष्टयाच्या पदार्थापासून ते उपवासाच्या पदार्थापासून अनेक पाककृती दिल्या आहेत, ज्याचे स्वरूप पाहून नक्कीच मुलेच काय ज्येष्ठ मंडळीही आकर्षित होतील. बाजरीचे आप्पे, नाचणीचा ढोकळा, कोदो मिलेट मोमोज, राळयाची कचोरी, भगर दुधीची इडली.. इ. काय तोंडाला पाणी सुटले ना ! अशा प्रकारे तृणधान्यांपासून असे चमचमीत पदार्थ बनवून पौष्टिक मूल्ये प्राप्त करू शकता. संतुलित आहाराबाबतीत जागरूक असणाऱ्या, गृहिणी तसेच आहारशास्त्राच्या अभ्यासकांसाठी हा 'मिलेट मंत्र' अत्यंत उपयुक्त आहेत. पिज़्ज़ा, बर्गर, मोमोज अशा जंक फूडच्या गर्दीत आपल्या पारंपरिक तृणधान्यांचे आयुर्वेदीय तसेच शास्त्रीय महती सांगणारे पुस्तक लिहून लेखक डॉ. पुष्कर वाघ यांनी तृणधान्यांची उपयुक्तता आणि औषधीय गुणधर्म यांची ओळख करून दिली आहे. निरोगी आणि सुदृढ़ आयुष्य जगण्यासाठी 'मिलेट मंत्र' या संजीवनीचा सदुपयोग करावा, हा मंत्र लेखकाने दिला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस महासचिवपदी चेतन गेडाम

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** शहरातील धडाडीचे कार्यकर्ते चेतन देवाजी गेडाम यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस चे महासचिव पदी नियुक्ती झाली.



चेतन देवाजी गेडाम यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेश महासचिवपदी तत्काळ प्रभावाने नियुक्ती झाली आहे. भारतीय युवक काँग्रेस प्रभारी कृष्णा अल्लावरू, युवक काँग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास बी.व्ही. आणि महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस ने चेतन गेडाम यांचा कार्याची दखल घेत महाराष्ट्रातील नागरिकांच्या ह्रदयात आणि मनात एकता आणि शांतीचा संदेश पसरवण्यासाठी क्षमतेनुसार काम कराल, असे त्यांच्या नियुक्ती बद्दल म्हंटले आहे. त्यांनी आपल्या नियुक्ती वर माजी खासदार नरेश पुगलिया, महाराष्ट्र प्रदेश युवक कांग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत, कुशल पुगलिया,रोशन लाल बीट्टू, घनश्याम मूलचंदानी, देवेंद्र आर्य यांना श्रेय दिला आहे.

चेतन गेडाम या अगोदर एनएसयुआय विधानसभा अध्यक्ष, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सहसचिव होते. आता त्यांची बढती होऊन महासचिव पदावर नियुक्ती झाली.

## दहावीच्या परीक्षा सुरळीत, तहसीलदारांची शाळेला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्रशाळा केंद्रावर दहावी एस एस सी ची परीक्षा सुरळीत सुरू झाली असून पहिल्याच दिवशी मा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांनी परिक्षा केंद्राला भेट देवून पाहणी केली. केंद्रांवर बैठा पथक, पोलिस बंदोबस्त,परिक्षार्थिना सर्व सुविधा सवलती उपलब्ध आहे की नाही याची पाहणी केली. तर होणाऱ्या लोकसभा निवडणूक संदर्भात निवडणुक बुथ मतदान केंद्र खोल्याची पाहणी करण्यात आली. सावंगीत तीन तर शेखपूर येथे एक एकुण चार मतदान केंद्र व्यवस्थाची पाहणी केली. बाजारसावंगी जिल्हा परिषद शाळा सह परिसरातील शांताराई विद्यालय, पद्मावती विद्यालय, महाराज सयाजीराव गायकवाड विद्यालय चे परिक्षार्थी विद्यार्थी परिक्षा देत आहे.

## सुभद्राबाई शेषेराव बुधवंत यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील पांगरी येथील भाजप चे कार्यकर्ते अशोकराव शेषराव बुधवंत (पाटील) यांच्या मातोश्री शुभद्राबाई शेषेराव बुधवंत (पाटील)वय ८० यांचे वृद्धापकाळाने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पाश्चात्य एक मुलगा, दोन मुली ,नातवंड असा मोठा परिवार आहे त्यांचा अंत्यविधी वैकुंठधाम पांगरी ता. जिंतूर येथे दिनांक 24 रोजी सकाळी नऊ वाजता करण्यात आला. त्यांच्या जाण्याने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.



# कोब्राला वाचवण्यात सर्पमित्राला यश

## साप व वन्यजीव वाचणे ही काळाची गरज

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** वारजे येथील रोझरी शाळेच्या मागे रात्री ९ वाजता साप निघाल्याचा फोन पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिशनच्या सर्पमित्र पैगंबर शेख यांना आला. ते त्वरित साप निघाल्याच्या ठिकाणी पोहोचले असता त्याठिकाणी भला मोठा नाग असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अतिशय चलाखीने व शिताफीने पैगंबर शेख यांनी त्या नागाला त्यांनी सोबत आणलेल्या कापडी पिशवीत रेस्क्यू करून साप तसेच आसपासच्या लोकांनाही त्यापासून सुरक्षित केले. नाग हा साप भारतातील चार विषारी सापांपैकी एक. या सापामध्ये न्युरोटॉक्सिन नावाचे विष असते. नाग चावल्यास त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो तसेच वेळीच इलाज न मिळाल्यास ह्रदय प्रक्रिया बंद पडून माणसाचा मृत्यू देखील होऊ शकतो सर्प दौंश झाल्यास जवळील सरकारी दवाखाना किंवा हॉस्पिटल मध्ये या वर मोफत उपचार केला जातो अशी माहिती सर्पमित्र पैगंबर शेख यांनी यावेळी दिली. तसेच असा साप आपल्याकडे निघाल्यास त्याला मारून न टाकता त्वरित सर्पमित्राला संपर्क साधा किंव्हा वन विभागाच्या हेल्प लाईन नं 1926 व आपण संपर्क करू शकता. वन्यजीवांचे रक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे अशीही प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली. नागाला रेस्क्यू केल्यानंतर त्वरित त्याला लोकवस्तीपासून लांब खडकवासला धरणाच्या मागे वन विभागच्या मोकळ्या जागेत सोडून देण्यात आले. यावेळी पैगंबर शेख यांच्यासोबत त्यांचे सहकारी निशांत रणधीर आणि अलीशा शेख देखील होती.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी, शासनाकडून अनुदान मंजुरी आदेश

## शेतकरी प्रत्यक्ष मिळणाऱ्या अनुदानाच्या प्रतीक्षेत

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** खरीप हंगाम-२०२३ करिता दुष्काळ जाहिर केलेल्या ४० तालुक्यांमधील खातेदारांना कृषि विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान वाटप करण्याकरिता शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या दरानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून एकुण रु.२४४३२२.७१ लक्ष (अक्षरी रुपये दोन हजार चारशे त्रेचाळीस कोटी बावीस लक्ष एकाहत्तर हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त म्हणून निवड झालेल्या तीन तालुक्यांतील दुष्काळाच्या खाईत अडकलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी निधीची तरतूद केली आहे. यामध्ये धाराशिव तालुक्यातील 92हजार 129 शेतकऱ्यांसाठी 11हजार 867.32(रक्कम लाखात) तर वाशी तालुक्यातील 37हजार 933 शेतकऱ्यांसाठी 4 हजार381.96(लाखात) व लोहारा तालुक्यातील 34हजार 197 शेतकऱ्यांसाठी 4हजार 601.50(रूपये लाखात) अशा एकूण 1लाख 64हजार 259 शेतकऱ्यांना 208कोटी दुष्काळी अनुदान राज्य शासनाकडून देण्यात येणार आहे.

# दहावीच्या परीक्षेसाठी १३ परीक्षा केंद्रांवर २ हजार ७२५ विद्यार्थी

## ६९ जणांची दांडी : गटशिक्षणाधिकारी व भरारी पथकांच्या परीक्षा केंद्रावर भेटी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यात दहावी बोर्ड परिक्षेसाठी १३ परीक्षा केंद्रावर २ हजार ७२५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी पहिल्या दिवशी मराठी या विषयाला २ हजार ६५६ विद्यार्थी उपस्थित होते तर ६९ विद्यार्थ्यांनी दांडी मारली. गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांच्या पथकांनी शहरातील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा शांततेत व सुरळीत असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. बीडीओ व नायब तहसीलदार यांचे भरारी पथक आणि शिक्षण व महसूल विभागाचे १४ बैठे पथक परीक्षा केंद्रांवर ठाण मांडून होते. लोहा तालुक्यातील कस्टडीयन लोहा येथे असून बिईओ सतीश व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी बोर्ड परीक्षा सुरू आहे. परीक्षा केंद्र निहाय कंसात विद्यार्थी उपस्थिती पुढील प्रमाणे- श्री संत गाडगे महाराज हायस्कूल लोहा (१९१), कै. विश्वनाथराव नळगे विद्यालय लोहा,(२१८), शिवछत्रपती विद्यालय लोहा, (१९५), श्री. संत बाळगीर महाराज हायस्कूल कापशी गुंफा, जि.प. हायस्कूल, माळाकोळी (११९), नारायण इन्टरनॅशनल स्कूल लोहा ( १८४), संजय गांधी विद्यालय, कलंबर (२७५), बळीराम पाटील मा. वि. पेनूर (२५२), शिवनिकेतन विद्यालय, सावरगाव(न.) (२८९), गणपतराव मोरे विद्यालय किवळा (२६९), सह्याद्री माध्यमिक विद्यालय लोहा (१६०) माध्यमिक आश्रम शाळा लिंबोटी, नेहरू नगर (१९४) असे विद्यार्थी पहिल्या दिवशी उपस्थित होते.



शिवछत्रपती विद्यालयात मुख्याध्यापक दामोधर वडजे हे केंद्र संचालक असून १८६ मराठी माध्यम व ९ उर्दू माध्यमाचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांनी भेट देवून समाधान व्यक्त केले. शिक्षण विस्तार अधिकारी पी. बी. गुट्टे, श्रीमती अंजली कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सरस्वती आंबलवाड, केंद्र प्रमुख डी. आर. शिंदे, सुरेश पांचाळ, तिडके आदींनी भेट दिली. केंद्र संचालक दामोधर वडजे, सहायक बी. एन. गवाले यांच्या परीक्षा व्यवस्थापना बद्दल समाधान व्यक्त केले.

परीरक्षक कार्यालयात बिईओ सतीश व्यवहारे यांना डी. आर. शिंदे, बाळू चव्हाण, एम. एस. भागानागरे, एस. व्ही. कांबळे, गायखर, हवगिराव, रवी रायफळे, आर. वाय. चव्हाण, श्रीमती महानंदा केदारे, चौडेकर, हेमा जोशी, श्रीमती पारसेवार आदी सहकार्य करीत आहेत. नायब तहसीलदार व बीडीओ यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथक आहेत. तर तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रावर बैठे पथक नियुक्त केले आहेत. त्यामध्ये दोन ग्रामसेवक, एक केंद्र प्रमुख, एक शिक्षक असा समावेश आहे. दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी २ हजार ७२६ विद्यार्थ्यां पैकी २ हजार ६५६ विद्यार्थी परिक्षेसाठी उपस्थित होते तर ६९ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

# शिर्डीचा खासदार राजकीय नेत्यांच्या तालावर ठेका धरणारा मौनी बाहुला नको

## लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. नितीन पोळ यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक हक्का मुळे शिर्डीत आरक्षण पडले मात्र मागील तिन्ही निवडणुकीतीलखासदार हे नेत्यांच्या तालावर ठेका धरणारे होते मात्र यंदाच्या निवडणुकीत तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या हक्काची जाणीव असणारा लोकप्रतिनिधी निवडून द्यावा, असे आवाहन लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. नितीन पोळ यांनी केले आहे.



ॲड. पोळ म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचीत जातीचे प्रतिनिधि निवडून जावे म्हणून आग्रह धरला होता महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दरम्यान पुणे येथे करार करण्यात आला आणि तेंव्हा पासुन विविध जातींना आरक्षण देण्यात आले त्यामुळे आरक्षित मतदारसंघ राखीव ठेवून प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. सण २००९ साली पुनर्रचनेत शिर्डी लोकसभा मतदार संघ अनुसूचीत जातीसाठी राखीव झाला.राजकीय दृष्ट्या सक्षम नेतृत्व असलेल्या या मतदार संघातून त्यापूर्वी स्व बाळासाहेब विखे,स्व शंकरराव काळे, प्रसाद तनपुरे, या साखर सम्राट नेत्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली त्याच बरोबर कोणत्याही प्रकारे आर्थिक पाठबळ नसताना स्व भिमराव बडदे यांना देखिल प्रस्थापितांना नाकारून जनतेने प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. २००९ साली पुनर्रचनेत शिर्डी लोकसभा मतदार संघ अनुसूचीत जाती साठी राखीव झाला त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी उमेदवारी केली. मात्र दगडा पेक्षा विटबरी असा विचार करून प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेत्यांनी राजकारणात नवख्या असलेल्या भाऊसाहेब वाकचौरे यांना शिवसेनेच्या तिकिटावर निवडून दिले पुढच्या निवडणुकीत भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी दिल्याने अवघ्या १७ दिवसात मोदी लाटेवर स्वार झालेल्या सदाशिव लोखंडे यांना शिवसेनेच्या तिकिटावर निवडून दिले. पुढे २०१४ मध्ये देखील सदाशिव लोखंडे यांना निवडून दिले मात्र वाकचौरे यांनी पाच व लोखंडे यांनी दहा वर्षे अनुसूचीत जातीचे प्रतिनिधित्व करण्या ऐवजी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या तालावर ठेका धरण्यात धन्यता मानली १५ वर्षे अनुसूचीत जातीचे प्रतिनिधित्व करत असताना या उमेदवारांना आपण अनुसूचीत जातीचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी निवडून गेलो याचा विसर पडला. एकाने पक्षाशी गद्दार होऊन सत्तेसाठी पक्ष सोडला तर दुसऱ्याने नेत्याशी व जनतेशी बेईमान होऊन पक्ष सोडला. अशा त्यांच्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना आहेत. मात्र त्याही पेक्षा ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढ्याने अनुसूचीत जातीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. व शोषित वंचित यांचे प्रश्न उपस्थित केले नाही. आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा ह्या उमेदवारांच्या नावाची चर्चा होत असली तरी यंदाच्या निवडणुकीत राजकीय नेत्यांच्या तालावर ठेका धरणारा नाही तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या व राज्य घटनेने दिलेल्या अधिकाराचा वापर करून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर परखड विचार करणारा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



# आतां जागा रे भाई जागा रे ।




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आत्तापर्यंत करोडो शब्द लिहिले गेले आहेत आणि लाखो ग्रंथ प्रकाशत झाले आहेत आणि होताहेत. हेच मानवाच्या उत्क्रांतीचे उत्तम आणि एकमेव द्योतक म्हणावे लागेल. एक ग्रंथ प्रकाशित होतांना त्यामागे काय काय घडामोडी घडत असतात, काय काय करावे लागते याचा आपण सखोल विचार केल्यानंतर त्या ग्रंथाचे मोल लक्षात येऊ शकते. त्यातल्या त्यात वर्तमान काळ आणि काही शतकांपूर्वीचा काळ यात महदंतर आहे. महानुभाव काळात सर्वज्ञ श्रीमान चक्रधर स्वामींचे तत्वज्ञान पाठांतराने लोकाभिमुख झाले. ते लिहून ठेवले गेले नाही. त्यामुळे त्यातील बरेच वाङ्मय विस्मरणात गेले असणार, परिणामी ते अनमोल लेखन आज आपल्याला वाचायला मिळत नाही.**

त्यानंतर महाराष्ट्रात अनेक स्थित्यंतरे झाली ज्यामध्ये अनेक विचारवंतांनी आपल्या वाणी आणि लेखणीने आपला भोवताल जागवला. लेखक, कवी, विचारवंत यांचे आपण नित्य नित्य अनंत ऋण व्यक्त करायला पाहिजे. या लोकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता लोक जागृती करून समाज मनाचा तळ ढवळण्याचे कार्य सातत्याने करत राहिले आणि आजही येनकेनप्रकारे ते चालूच आहे. त्यामुळे ते होते आणि आजही आहेत म्हणून आत्तापर्यंतच्या अनेक क्रांती घडत गेल्या, अन्यथा केवळ पदावर बसलेल्या बागुल बुवांनी हातासी चार-दोन हांजी हांजी करणारे स्तुतिपाठक ठेऊन इमानदार माणसांची पिळवणूक-छळवणूक केलेला राजेशाही इतिहास अजून लोक विसरले नाहीत. एवढेच काय, आजही विस्थापीठ-प्रस्थापित, गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ-कनिष्ठ संघर्ष संपलेला नाही. मानव जात आहे तोपर्यंत हा संघर्ष थांबेल का नाही? अशी सतत खंत वाटत राहते. असो. ईश्वरी न्याय, नीती आणि प्रत्येकाला कधी ना कधी मृत्यू भेटणार आहे म्हणून बरे आहे! अन्यथा दिवसाढवळ्या अक्षरशः माणसांनी माणसं खाल्ली असती! त्यासाठीच तर महान माणसांच्या विचार संगतीत काही काळ घालवला की; आपला वर्तमान कितीही आव्हानात्मक असला तरीही हलका, सहज सहनीय होऊन जातो. त्या महामानवांचे जीवन आणि लेखन काही काळ गाठीला असले की; अनेक गाठी खळखळ सुटत जातात आणि पुन्हा सुरु होतो नवा विचार आणि नवा अध्याय! त्यासाठी माणसातील माणूस लुप्त होऊ नये, सर्वत्र शांती, जिव्हाळा, आपुलकी, प्रेम, सौहार्द्र वाढावा यासाठी अनेक धुरिणांनी कार्य केले आहे म्हणूनच ते लोक आजही काळाच्या तडाख्यात वंदनीय, अनुकरणीय आहेत! एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे संत नामदेव, संत सावता, संत चोखोबा, संत जनाबाई, संत ज्ञानदेव, संत मुक्ताबाई आणि अन्य संतांनी तेराव्या शतकात लोकांच्या सर्वांगीण जागृतीसाठी एक लोक चळवळ उभी केली. धर्म माणसाला कधीही सोडायला तयार नसतो. नास्तिक लोक सुद्धा धर्मापुढे झुकल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. तो काळ मोठा खडतर होता. त्या कठीण काळात धर्म प्रसार आणि प्रचाराचा ठेका केवळ एका विशिष्ट समूहाकडे असतांना या लोकांनी आपली आपली मैफिल भरवायला सुरुवात केली. तिकडे महानुभाव आपला प्रचार-प्रसार करत असतांना त्यांनीही इथली वर्णव्यवस्थेची




चौकट मोडीत काढली होती. असा हा क्रांतिकारी इतिहास सतत स्मरणात ठेवतांना वारकऱ्यांचा समाजजागृतीचा कार्यक्रम सुरूच होता. त्यानंतर संत एकनाथ आणि अलीकडे सतराव्या शतकात तुकोबांसारखा लोककवी पुन्हा उभा राहिला. बिचारा कवी! अनेकांनी वाटेल तसा छळला. घरादाराने परीक्षा पाहिली. काळाने अनेक आघात केले. तरीही हा कवी कुणापुढे झुकला नाही. लोकांनी मारले तरीही त्यांना प्रतिकार केला नाही. बिचारा एकटाच जाऊन डोंगरावर भजन करत बसायचा. अभंग लिहित बसायचा. कठीण काळात अहोरात्र जागे राहून येणाऱ्या काळाला **कैसें असोनि ठाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणा ॥१॥ आतां जागा रे भाई जागा रे । चोर निजल्या नाडूनि भागा रे ॥ ध्रु.॥ आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं तें लुटवूं लोकां रे ॥२॥ तुका म्हणे एकांच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भये ॥३॥ (अभंग क्र.१२६४)** असे सावध करणारे वाङ्मय लिहून ठेवले. तुकोबाराय स्वतः जागले आणि सर्वकाळ जागल्याचे काम इमानदारीने केले. गाथा म्हणजेच बोधपर कथा! ज्याप्रमाणे बुद्ध धम्मातील कथांना जसे धम्म गाथा म्हणतात तसे केवळ तुकोबांच्या अभंगांना गाथा म्हटले जाते. तुकोबांचा प्रत्येक अभंग एक गाथा म्हणजे एक कथाच आहे. हा अभंग सरळ सरळ "जागा रे" म्हणून बोलतो आहे. माणसांनो, तुम्हाला ठाऊक म्हणजे माहित असूनही वेड घेऊन पेडगावाला का जाताहात? जीवनात दुःख, मृत्यू, वेदना अटळ आहेत. झोपेत राहू नका. तारुण्य, सत्ता, सुख, संपत्ती, श्रीमंती, ऐशोआराम, आनंदी जीवन हे जेवढे दिसते तेवढे सरळ नाही. वरील या सर्व विकारांची धुंदी एकदिवस वृद्धपण उतरवणार आहे. एकदिवस तुम्ही कुणीच नव्हतात. केवळ एक निरागस, गोंडस, हसरे बाळ होतात आणि एकदिवस तुम्ही कुणीही असणार नाही. तुमचे पद, मद, सत्ता, श्रीमंती, ऐशोआराम आदि सर्व जाऊन तुम्ही केवळ आणि केवळ एक वृद्ध व्यक्ती होणार आहात. त्यावेळी तुम्हाला तुमचा भूतकाळ आठवणार! मागचे एकेक पापकृत्य, दुष्कृत्य आठवणार. लोकांना दिलेला त्रास आत्ता तुम्हाला त्रास देणार! निद्रानाश, विव्हळणे, तळमळ, अस्वस्थता, अनंत शरीर वेदना! वृद्ध झालेले शरीर जर्जर होणार! अक्षरशः तुम्ही मृत्यूची भिक मागणार! पण मृत्यू तुम्हाला वाकुल्या दाखवणार! ज्याप्रमाणे तुम्ही भूतकाळात लोकांना छळले होते तसेच तुम्हाला तुमचा काळ छळणार! त्यासाठी भाईनो जागा! सावध व्हा! येणारा काळ जर आनंदाने व्यतीत करायचा असेल तर वर्तमानात सत्कर्माची बचत करा. गरजूंना मदत करा. तुमच्याकडे शक्ती आहे म्हणून कमजोर, असहाय लोकांना त्रास देऊ नका. त्याची सगळी सव्याज वसुली होणार आहे. भाईनो जागा! काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, अहंकार हे सहा शत्रू आपल्या भोवताल दबा धरून बसले आहेत. यांच्यापासून नित्य नित्य सावध असा. हे आपल्याला गिळायलाच बसलेत. त्यासाठी सावध रहा, भाईनो सावध! असे जागे करतांना तुकोबाराय शेवटच्या दोन कडव्यात आणखी सर्व काही संपले नाही असा आशावाद प्रकट करतात. भावांनो आता बस करा. आता थांबा! आता सावध व्हा. इथून पुढील गाठीसी असलेले आयुष तरी पापकर्मात घालवू नका. उरलेलं आयुष्य तरी नीट सांभाळून रहा. गाठीशी असलेले आयुष तरी चागल्या कार्यात गुंतवा. ते वाया जाऊ देवू नका. शेवटी तुकोबाराय, तुम्ही कोणत्यातरी एक विचार अथवा दैवतासी एकनिष्ठ रहा असे आवाहन करतात. त्यातल्या त्यात सर्वप्रथम स्वतःशी एकनिष्ठ रहा. आपल्या कर्मासी एकनिष्ठ रहा. तुमचे कर्मच तुम्हाला सुखी अथवा दुःखी करणार आहे. त्यासाठी तुकोबांच्या मते एक श्री क्षेत्र पंढरपूरचा काळ्या आईच्या लोकांचा काळा देव श्री विठ्ठल यांच्याशी एकनिष्ठ रहा. असे झाल्यास मग मात्र तुम्हाला कशाचीही भीती राहणार नाही. असे निर्भय जीवन जगायला लागा. येणारा कसलाही कठीण प्रसंग असला, तरी तुम्हाला त्याची भीती अथवा अपराधीपणाची भावना मनात तयार होणार नाही. सज्जनहो! तुकोबाराय नित्य त्यांच्या लेखणीने आणि वाणीने आपला सभोवताल जागा आणि समृद्ध करून गेले आणि आजही ते तुमच्या माझ्या सोबत अभंग रूपाने आहेत. जागृती करण्याची त्यांची ही परंपरा नंतर सर्वच धर्मातील प्रसारकांनी उचलेली आहे. त्यातही तुकोबाराय अग्रेसर आहेत! असे असतांना मी जेंव्हा पासून ही 'तुकाराम नीती' लिहितोय तेंव्हा पासून तुकोबाराय थोडे थोडे मलाही समजायला लागले आहेत. तुकोबांचा गाथा पारायण तर करावाच, परंतु त्याहीपुढे जाऊन त्यातील प्रत्येक अभंगांचे अर्थ व्यवस्थित समजून घ्यावे लागतील. असे झाल्यासच आपल्याला मूलतः तुकोबाराय आकलन होतील. आपल्याकडे साधने किती आहेत? आपण कोणत्या पदावर आहोत? संपत्ती किती आहे? हे प्रश्न जरी महत्वाचे असले तरी आपली वैचारिक अवस्था काय आहे? आपले, आपल्या भोवतालच्या आणि सोबतच्या लोकांसोबत संबंध कसे आहेत? हे ही तेवढेच महत्वाचे नाही का? त्यासाठी केवळ ग्रांथिक ज्ञान असून चालणार नाही तर माणसांना भावनिक, सामाजिक आणि विशेष म्हणजे उत्तर आयुष्यात आजच्या दुष्कार्मामुळे वारंवार पश्चाताप करण्याची वेळ येऊ नये असे वर्तन असावे. त्यासाठी सर्वच महापुरुषांच्या ग्रंथांचे सखोल वाचन करून त्यावर साधक-बाधक चिंतन करणे ही सार्वकालिक गरज होती, आहे आणि सतत राहणार आहे. चला तर मग, आपण जागे होऊ आणि आपल्या भोवतालची माणसे, परिसर सर्वार्थाने जागा करूया! असे झाल्यासच तुकोबांच्या एका एका अभंगाचे आणि त्यावरील या तुकाराम नीतीचे सार्थक होईल! त्यासाठीच हा शब्द प्रपंच! जय तुकोबाराय!

# आ. रोहित पवारांची ट्रोल आर्मी कशाचे द्योतक



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**शरदचंद्र पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षातुन पुतणे अजितदादा बाहेर पडल्यानंतर मोठ्या साहेबांचा वारसदार होण्याचे स्वप्न आ.रोहित पवारांना पडणे साहजिकच म्हणावे. मात्र स्वप्न साकार करण्याची घाई जेव्हा होते तेव्हा अहम भावाने, गर्विष्ठ मनाने युवा नेतृत्व मिसरूड फुटायच्या अगोदरच त्याचे पाय रसातळाच्या दिशेने वळु लागतात तसाच अनुभव आ.रोहित पवारांच्या बाबतीत येताना दिसतो. मोठे साहेब अर्थात काकांनी ब्राह्मणांचा द्वेष जाहिरपणेच केलेला इतिहास लपवुन राहिला नाही. तोच आदर्श रोहितदादांच्या अंगात भिनत असुन मागच्या काही दिवसापासुन त्यांच्या तोंडून बाहेर पडणारी वक्तव्ये व्यक्तिगत द्वेषाची, समाजा समाजात तेढ निर्माण करणारी नक्कीच वाटते. तीन मिनिटात महाराष्ट्रात ब्राह्मण संपवुन टाकण्याची भाषा त्यांचे सहकारी करतात.**

याचे मुळ मग कुठे? हा शोध घेतला तर जातीय द्वेषाच्या वटवृक्षाची लागवड गोविंद बागेतच झाल्याचे लक्षात येईल. सोशल मिडियाद्वारे द्वेषाचं आणि जातीय तेढ निर्माण करण्यासाठी रोहितदादाने स्थापन केलेली ट्रोल आर्मी स्वतःच्या राजकिय भविष्यासाठी चांगली नाही हे तितकंच खरं. युवा नेतृत्व जेव्हा कर्जत-जामखेडच्या बालाघाटावर उभा राहुन फुले-शाहु-आंबेडकरांचं नाव घेते तेव्हा तुमचं एकुण स्वरूप पहाता महापुरूषांची नावे तुमच्या तोंडी घेण्याचा नैतिक अधिकार तरी तुम्हाला आहे काय? हा सवाल आज सुज्ञ समाज करताना दिसतो.

महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री पद, देशाचं संरक्षण आणि कृषी मंत्री एव्हाना अनेक पदं भुषवणारे, कधी काँग्रेसमध्ये तर कधी वेगळा विचार जेव्हा काहीच जमलं नाही तर स्वतःचाच स्थापन केलेला पक्ष, मुख्यमंत्री पदासाठी वसंतदादाचा असलेला अनुभव. तरीही धुरंधर आणि मातब्बर म्हणुन शरदचंद्र पवार यांचं नाव महाराष्ट्राच्या राजकारणात घेतल्या जातं. एखादा माणुस कर्तृत्वाने मोठा झाल्यानंतर त्यांच्या उणीवा पाठीशी का घातल्या जातात? हे अजुन कळालं नसलं तरी प्रस्थापित राजकारणाचा तो एक भाग असावा. सत्तेच्या राजकारणात संपुर्ण आयुष्य गेल्यानंतर वयाने उतरंडीला राजकिय वनवास येतो. कदाचित आपल्या कर्माची फळं म्हणावी लागतील. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना करून पुन्हा अस्तित्व निर्माण करण्यात मोठ्या साहेबांना यश आले. पण कौटुंबिक राजकिय वाढत जाणारी स्पर्धा जर कदाचित कर्त्याला योग्य वेळी निर्णयक्षम करता आली नाही तर मग कितीही गावगाडा जमला तरी मोडण्याची वेळ येवु शकते. 2019 ला पार्थ पवारांचा लोकसभेत झालेला पराभव आणि रोहित पवारांना विधानसभेत कर्जत-जामखेडमधुन मिळवलेला विजय हीच कारणं खऱ्या अर्थाने कौटुंबिक अंतर्गत संघर्षाची ग्राह्य धरायला हरकत नाही. कदाचित पार्थ मावळमध्ये विजयी झाले असते तर राजकिय वनवास आजचा नशिबालाही आला नसता. तदनंतर अजितदादा पक्षातुन बाहेर पडले काय? महायुतीमध्ये जावुन उपमुख्यमंत्री झाले काय? एव्हाना राष्ट्रवादी पक्ष समुळ नष्ट करूनच संविधानदृष्ट्या स्वतःकडे दादांनी घेतला काय? शिल्लक राहिलेल्या राष्ट्रवादी पक्षात मोठे साहेब, मोठ्या ताई आणि छोटे दादा एवढ्यावरच खऱ्या अर्थाने शिल्लक



राष्ट्रवादीची मदार आहे. कौटुंबिक संघर्षाची ललकार 2019 लाच बाहेर पडल्यानंतर रोहित पवार जे अगदी सहज आमदार झाले. ज्यांना जमिनीवरचं राजकारण कधीच माहित नसावं. कारण सोन्याचा चमचा तोंडात घेवुन त्यांचा राजकिय जन्म झाला. पक्षांतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला. घर फुटलं आणि त्यातच आमदार असलेल्या रोहित पवारांची राजकिय महत्वाकांक्षा वाढल्या. काकाच्या बाजुने उभा राहिल्यानंतर खऱ्या अर्थाने मीच आता शिल्लक राष्ट्रवादीचा नेता होवु शकतो? एव्हाना सुप्रियाताईंना मागे टाकुन देखील पुढे जावु शकतो. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर काम करण्याची संधी मला मिळाली हाच आविर्भाव मनात ठेवुन छोट्या रोहित पवारांची खेळी सद्या सुरू आहे. महाविकास आघाडीचं सरकार आलं आणि गेलं त्यातही मंत्री होता आलं नाही. मध्यंतरी संघर्षयात्रा काढली. ज्यात सुप्रियाताई सहभागी झाल्या नाहीत. जितेंद्र आवाडांनी देखील शब्दफेक करून त्यांची जागा त्यांना एका प्रकरणात दाखवुन दिली. अर्थात बेदखल केलं होतं. महत्वाकांक्षा जर वाढल्या तर वेगवेगळे प्रयोग माणुस हाती घेतो. जसं की रोहित पवारांनी सोशल मिडियाच्या जमान्यात हाताखाली काम करणारे कार्यकर्ते म्हणा किंवा स्वतःच्या ॲग्रोसारख्या संस्था यातले कर्मचारी म्हणा, यांना चांगलेच कामाला लावल्याचे लक्षात येतं. तीन मिनिटात महाराष्ट्रातील ब्राह्मण संपवुन टाकु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना गाडून टाकू अशा धमक्यावजा सोशल मिडियावर पोस्ट टाकणारे कार्यकर्ते योगेश सावंतसारखे बारामतीचे निवासी निघतात, समाजातील दोन जातीमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी विषारी भाषेचा वापर ही टोळी करते आणि या टोळीत दहापेक्षा अधिक तरूण काम करतात, ज्याचा पुरेपुर वापर रोहित पवार करतात आणि रसद पुरवतात. कारण ट्रोल टोळी त्यांच्याच बगलबच्याची असल्याचे लक्षात येतं. खरं तर सामाजिकदृष्ट्या हा फार गुन्हा समजावा लागेल. या ठिकाणी एक गोष्ट नमुद करायला हवी की स्वतः शरदचंद्रजी पवार साहेब यांनी राजकारणात नेहमीच जाती पातीचं राजकारण केल्याचा इतिहास आहे. ज्यावर राज ठाकरेंनी अनेकदा जाहिर आरोप केले. स्व. गोपीनाथराव मुंडे यांचं राजकारण संपवण्यासाठी अनेक प्रयोग बीड जिल्ह्याच्या राजकारणात बारामतीकरांनी केलेलेच होते. ब्राह्मणांचा द्वेष स्वतः शरद पवारांनी अधुनमधुन केलेला आहे. पेशव्यांच्या हातुन सरदारांना पदव्या घेण्याची वेळ आली किंवा पेशव्यांची पगडी अशी साहेबांची अनेक वक्तव्ये द्वेषाची पिछाडलेली इतिहासजमा झालेली नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याबरोबर केवळ जातीय द्वेषातुन विषारी गरळ पवारांनी अनेकदा बाहेर टाकली. तोच वारसा रोहित पवार पुढे चालवण्यासाठी घोड्याचा लगाम हातात घेवुन बसल्यासारख दिसतेय. मोठ्या साहेबांच्या डोळ्यात फडणवीस सलतात त्याहुन अधिक रोहित पवार यांना तर फडणवीस नावाचा जणु काही काविळच झालाय.

त्यांना ट्रोल करण्यासाठी एक प्रकारची आर्मी रोहित पवारांसह जितेंद्र आवाडांनीच निर्माण करून चालवली असल्याचा आरोप त्यांचेच सहकारी उमेश पाटील यांनी काल जाहिर केला. गंमत बघा, ब्राह्मणांच्या नावाने शिव्या-शाप देणारे सोशल मिडियावर वेगवेगळे आरोप करत शिव्या घालणारे हे सारे तरूण रोहित पवारांच्या पक्षाचे कार्यकर्ते एव्हाना त्यांच्या विविध संस्थेत नोकरीला असलेले तरूण असुन जे जातीय तेढ निर्माण करणारी लिखाण करत वातावरण बिघडू पहातात. खरं तर ट्रोल आर्मी चालवणाऱ्या प्रमुखावरच खऱ्या अर्थाने पोलीसांनी कारवाई करायला हवी. ज्या योगेश सावंताला फेसबुक पोस्टवरून पकडले, त्याला सोडून देण्यासाठी रोहित पवारांचा फोन पोलीस यंत्रणेला जातो, तशा प्रकारचा आरोप विधान परिषद अधिवेशनात आ.प्रविण दरेकरांनीही केला. ही मंडळी जेव्हा महापुरूषांचा आदर्श सांगण्यासाठी फुले-शाहु-आंबेडकरांचे नाव तोंडी घेता, मग प्रश्न असा पडतो की खरंच यांना महापुरूषांचे नाव तोंडात घेण्याचा अधिकार तरी पोहोचु शकतो का? याचे आत्मपरीक्षण आमदार असलेल्या रोहित पवारांनी करायला हवं. व्यक्तिद्वेषाचं राजकारण आणि दोन समाजात तेढ निर्माण करण्यासाठी हाती घेतलेले वेगवेगळे प्रयोग खऱ्या अर्थाने स्वतःच्या राजकारणासाठी अत्यंत घातक ठरू शकतात. आज तुम्ही कर्जत-जामखेडचे आमदार आहात. उद्या तुम्हाला बारामती ॲग्रोत जावुन ऊसाचे गुऱ्हाळ गाळत बसावं लागण्याची वेळ येवु नये.

# बड्या राष्ट्रांच्या आडमुठ्या धोरणावर भारताचे शरसंधान



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**अबुधावी येथे झालेल्या चार दिवसांच्या जागतिक व्यापार करार परिषदेत भारताने शांती योजना प्रस्तुत केली आणि या योजनेस विकसनशील देशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा भारताचा नैतिक विजय होय. परंतु अनेक प्रश्नांवर महासत्तांनी घेतलेले अडमुठे धोरण विकास प्रक्रियेत अडचणी निर्माण करणारे ठरले आहे.१३ वी मंत्रिस्तरीय शिखर परिषद २६ ते २९ फेब्रुवारी दरम्यान यु.ए.ई. च्या अबुधाबी या राजधानीच्या शहरात संपन्न झाली. या परिषदेत जगातील ६८ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रत्येक दिवशी होत असलेल्या चर्चेत यातून काय निष्पन्न होईल, शेवटी काय घडेल, याकडे सगळ्या जगाचे लक्ष लागलेले होते. त्यामागे जिज्ञासा होती, उत्सुकता होती आणि काही निश्चित हाती लागेल का, या विषयी शंकाही होत्या. परंतु चार दिवसाचा काथ्याकुट झाल्यानंतर सुद्धा अमेरिकेसारख्या बड्या भांडवली राष्ट्राच्या अडमुठ्या धोरणामुळे भारताला त्याविरुद्ध जोरदार मोहिम हाती घ्यावी लागली.**

इंडोनेशिया, भारत, ब्राझिल या राष्ट्रांनी अमेरिकेला चांगलेच दणकावले आहे आणि या परिषदेच्या शेवटी भारताचे व्यापार व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी पत्रकार परिषदेत असे स्पष्टपणे सांगितले की, बडी राष्ट्रे डब्ल्यू. टी. ओ. ला आपल्या हातात ठेवू इच्छितात आणि तिला लोकाभिमुख विकसनशील देशाभिमुख करण्यात सहज अडथळे निर्माण करतात. तेव्हा त्यांनी जर असेच अडथळे निर्माण केले तर विकसनशील देशांना न्याय कसा मिळेल, त्यांच्या सामाजिक आर्थिक विकासाचे प्रकल्प कसे मार्गी लागतील हे असे अनेक प्रश्न उभे राहिले.

भारताने बड्या राष्ट्राविरुद्ध विकसनशील देशांची बाजू घेऊन त्यांच्या नैतिक भूमिका उचलून धरल्या आहेत. तीन दिवसांची परिषद विषय लांबल्यामुळे १ मार्च पर्यंत वाढविण्यात आली होती. चार दिवसांची प्रदीर्घ चर्चा करूनही जागतिक व्यापार व्यवस्थेची पुर्नरचना करण्यात परिषदेला ठोस यश आले नाही, ही शोकांतिका होय. १३ व्या मंत्रिस्तरीय जागतिक आर्थिक परिषदेच्या महासंचालिका इंगोझी ओंकोंवा एलिवेला यांनी प्रारंभीच असे म्हटले होते की, आम्हाला मोठ्या आशा आकांक्षा आहेत. आम्ही यातून निर्णायकपणे बाहेर पडू आणि काहीतरी चांगले घडेल अशी अपेक्षा आहे. त्यांचा आशावाद खरे तर सार्थच ठरला असता जर काही चमत्कारिक कृती घडून चांगले घडले असते. परंतु चार दिवस मोठ्या प्रमाणात चर्चा, विचार-विनिमय, बैठका व मंथन होऊनही त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. डोंगर पोखरून उंदीर काढावा त्या पद्धतीने या परिषदेचा अंतिम मसुदा तयार झाला. यापैकी ५६ परिच्छेदांवर बहुतेक राष्ट्रांनी सहमती व्यक्त केली. परंतु परिषदेच्या विचार मंथनात चार महत्त्वाचे विषय होते. पहिला म्हणजे, ई-कॉमर्सचा. दुसरा, कृषि व मच्छ उद्योगावरील सबसिडीचा. तिसरा विषय होता संगणक ए.आय. या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इतर सेवांचा. चौथा महत्त्वाचा मुद्दा होता तो विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक विका प्रकल्पाला गती देण्याचा. या सर्व मुद्यांवर भारताने जोरदार चढाई केली आणि आपली भूमिका ठामपणे मांडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व भारताचे वाणिज्य व उद्योग मंत्री श्री. गोयल तसेच भारताच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने केले. यावेळी झालेल्या विचार विनिमयातून आणि मंथनातून काही निश्चित ठोस हाती लागेल अशी अपेक्षा होती. परंतु अमेरिका, चीन सारख्या बड्या राष्ट्रांनी अडमुठी भूमिका घेतल्यामुळे त्यातून असे काही निष्पन्न होऊ शकले नाही. अमेरिकेची ताठर भूमिका खरे तर गेल्या तीन वर्षांपासून डब्ल्यू.टी.ओ. च्या लवादासाठी पूर्ण वेळ न्यायाधीश नेमण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले जात होते. परंतु अशा पद्धतीचे न्यायाधीश नेमण्यास अमेरिकेने विरोध केल्यामुळे अनेक प्रकरणे तशीच लोंबकळत पडली आहेत. आता त्या ऐवजी एक छोटेसे लवाद मंडळ काम करते. या लवाद मंडळाकडे अनेक प्रकरणे खोळंबून पडली आहेत. त्यातून काही अंतिम निष्कर्ष निघत नाही.



जर अमेरिकेने योग्य भूमिका घेतली असती आणि लवादासाठी न्यायाधीशाची नियुक्ती करण्यास हिरवा कंदील दाखवला असता तर पेच सुटला असता. परंतु महासत्तांच्या ओठात एक आणि पोटात काहीतरी वेगळेच असते त्यामुळे अमेरिकेने शेवटी करायचे तेच केले. ट्रम्प असो की बायडेन असो दोघेही एकाच माळेचे मणी आहेत. अमेरिकेने घेतलेल्या अडमुठ्या भूमिकेमुळे विकसनशील राष्ट्रांना शेवटी या भूमिकेच्या विरोधात ठामपणे उभे राहावे लागले.

व्यापार व शाश्वतता, गुंतवणूक सुलभीकरण आणि शाश्वत शेती तसेच रेमिटन्सचा परतावा, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण ई-कॉमर्स हे वादळी विषय समोर होते. या विषयांवर चर्चा झाली परंतु विकसनशील राष्ट्रांची भूमिका लक्षात न घेता, आपलेच घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न बड्या राष्ट्रांनी केला. त्यामुळे डब्ल्यू. टी. ओ. ची अवस्था सुधारेल त्यातून काहीतरी चांगले निष्पन्न होईल या आशेने जगातील विकसनशील राष्ट्रांचे डोळे अबुधाबीकडे लागले होते. परंतु या परिषदेने विकसनशील राष्ट्रांच्या पदरी निराशाच दिली आहे. इंडोनेशिया, मलेशिया, भारत, ब्राझिल आणि आफ्रिकन देशांनी एकजूट करून ठाम भूमिका घेतली आणि अमेरिकेच्या दादागिरीला प्रतिशह दिला. त्यामुळे भविष्यात चांगल्या ऐक्यबद्ध वाटचालीसाठी विकसनशील राष्ट्रे भारताच्या नेतृत्वाखाली वाटचाल करत आहेत. जी - २० ची शिखर परिषद आता पुढील वर्षी ब्राझिलमध्ये होत आहे. त्यामुळे ब्राझिल, इंडोनेशिया आणि भारत या तिनही राष्ट्रांनी एकत्र येऊन ज्या मागण्या केल्या त्याचे माप पदरात पाडण्यासाठी जबरदस्त लॉबिंग केले त्याचा फारसा फायदा झाला नाही. तरी अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्राविरुद्ध जनमत तयार करण्यात भारताला यश आले ही गोष्ट मान्य केली पाहिजे. तसेच चीनचा एक महत्त्वाचा प्रस्ताव भारत आणि मित्र राष्ट्रांनी नाकारला आहे.मच्छ करारामध्ये आपल्याच पोळीवर तूप ओढून घेण्याचा चीनचा प्रयत्न होता. तसेच मच्छ करार व लस करार याला सहमती प्राप्त करावी अशी भारताची भूमिका होती. परंतु चीनने दुटप्पी भूमिका घेतली. आपल्या स्वतःच्या स्वार्थी भूमिकेचा पुरस्कार केला त्यामुळे चीनच्या या स्वार्थी व तकलादू भूमिकेला भारतासह विकसनशील देशांनी जोरदार विरोध नोंदवला आणि चीनचे सारे प्रयत्न हाणून पाडले. हा सुद्धा भारताचा नैतिक विजय म्हटला पाहिजे.

डिसेंबर २०१९ पासून लवाद मंडळाकडे (ॲपिलिएट ब्यूरो) एकूण २० प्रकरणे प्रलंबित आहेत. याबाबत निवाडा अत्यंत आवश्यक आहे. पण तसे झालेले नाही. शिवाय जर लवादाचे न्यायाधीश नेमले असते तर या पद्धतीची यंत्रणा नव्याने उभी राहिली असती. परंतु लवाद मंडळ आज कार्यरत असले तरी त्याची अवस्था असून अडचण नसून खोळंबा अशी आहे. त्यामुळे या लवाद मंडळाकडे असलेली प्रलंबित प्रकरणे व त्याच्या कामकाजाची ढिलाई व विलंबाची पद्धत पाहता, विकसनशील राष्ट्रे या लवाद मंडळाच्या कारभारास कंटाळली आहेत.

**भारताची शांती योजनाः** या परिषदेत भारताने कृषि, अन्नधान्य साठवणुकीबाबत प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले. अन्नधान्याचा साठा व पुरवठा करण्याच्या बाबतीत सध्याचे जे नियम आहेत ते विकसनशील राष्ट्रांना संकटात टाकणारे आहेत. भारतामध्ये अतिरिक्त अन्नधान्याचे न्याय व निःशुल्क वितरण केले जाते. या बाबतीत बऱ्याच देशांच्या पोटात दुखते. तसेच, अन्नधान्याचा साठा (स्टॉप होल्डिंग) करण्याचा निर्णय या बाबतीत पूर्वीचे अडचणीचे नियम बदलावेत असा आग्रह होता. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. इकडे भारतामध्ये न्यूनतम समर्थन मूल्यावरून (एम.एस.पी.) डावे पक्ष शेतकऱ्यांची आंदोलने करून दबाव तयार करत असले तरी त्यामध्ये सरकारची भूमिका ही राष्ट्रीय व जागतिक स्तरावर शेतकऱ्यांच्या बाजूने आहे ही गोष्ट जगजाहीर झाली व डाव्यांचे पितळ उघडे पडले. जागतिक व्यापार परिषदेत शांतता योजना (पीस क्लॉज) अंमलात आणण्याबाबत भारताने घेतलेला पुढाकार अशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील सर्व देशांना हितकारक आहे आणि तो लाभप्रद आहे. परंतु बासमती तांदळाच्या निर्यातीवरून आयर्लंडच्या मंत्री महोदयांनी भारतावर टीका केली. तेव्हा तेथील सरकारने या मंत्र्यास परत बोलाविले. यावरून जगातल्या राजकारणात भारताची प्रतिष्ठा कशी उंचावत आहे ही गोष्ट सिद्ध होते. भारताच्या कोणत्याही रास्त भूमिकेस कोणीही अंधळा विरोध करू शकणार नाही ही गोष्ट सिद्ध झाली आहे. प्रामुख्याने, कृषि धान्य पुरवठा तसेच मासेमारीवरील सबसिडी या बाबतीत भारताने घेतलेली भूमिका चीनपेक्षाही उजळ ठरली आहे.

चीनने नेहमीप्रमाणे भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न केला परंतु जी-२० परिषदेत भारताने केलेले संघटन व आफ्रिकन देशाला दिलेले सदस्यत्व यामुळे भारताची बाजू भक्कम राहिली आहे. जगात शांतता नांदावयाची असेल तर व्यापार व्यवस्थेचे सुलभीकरण व विवेकीकरण झाले पाहिजे. जाचक अटी लावून एकतर्फी व्यापार शर्ती लादण्याचा प्रयत्न करणे धोकादायक ठरू शकते. ही बाब भारताने जगाच्या लक्षात आणून दिली. तसेच महत्त्वाचे म्हणजे सेवा क्षेत्राचे वाढते व्यापारी महत्त्व लक्षात घेऊन सेवा उद्योगांना सामर्थ्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्नही भारताने केला आहे. माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे विकसित व विकसनशील देशातील विकास दरी वाढण्याचा धोका आहे. हेही भारताने लक्षात आणून दिले.

चार दिवसांच्या या परिषदेत व्यापार हा जागतिक शांततेचा एक प्रमुख आधार आहे आणि १९९५ साली स्थापन झालेल्या या जागतिक व्यापार व्यवस्थेचे काळानुरुप नूतनीकरण होणे आवश्यक आहे. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात भारताने जागतिक व्यापार करारावर सह्या केल्या. राव यांच्यापासून ते मोदी पर्वापर्यंत भारताची वाटचाल पाहता, व्यापार क्षेत्रातील ही शांती योजना म्हणजे एक सकारात्मक फलित होय. समारोपः या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, अबुधाबी परिषदेत काहीतरी चांगले घडेल अशी अपेक्षा होती. तसे चित्र अध्यक्ष महासंचालक, इंगोझी ओंकोंवा एलिवेला (डायरेक्टर जनरल ऑफ डब्ल्यू.टी.ओ.) यांनी व्यक्त केले होते. परंतु निराशाच पदरी आली आणि डब्ल्यू.टी.ओ. परिषदेत फारसे काही हाती लागले नाही. परिषदेचे सूप तर वाजले परंतु त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. पण एवढे मात्र खरे की, भारताच्या नेतृत्वाखाली सर्व विकसनशील राष्ट्रांनी जोरदार मोहिम करून चीनच्या प्रयत्नाला हाणून पाडले आणि अमेरिकेच्या अडमुठेपणा विरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यामुळे पुढील दोन वर्षांनी होणाऱ्या परिषदेत भारत आणि विकसनशील राष्ट्रे जी भूमिका मांडत होती त्या भूमिकेत एका दृष्टीने काही योग्य सुधारणा करण्याची गरज लक्षात येईल. भारताची भूमिका काळाच्या पुढे असलेली आहे. पुढे होणाऱ्या दोन वर्षांनंतरच्या परिषदेत जे काही निर्णय होतील ते निर्णय या परिषदेतील भारताच्या भूमिकेच्या अनुषंगानेच होतील यात शंका नाही. जग बदलत आहे, बदलण्याची गरज आहे. डब्ल्यू. टी. ओ. च्या आरंभीच्या स्थापनेच्या वेळी मोठी स्वप्ने घेऊन जग उभे होते. परंतु रशिया युक्रेन युद्ध, हमास - इस्राईल युद्ध यामुळे दुर्बल झालेली पुरवठा साखळी, भू-राजनीतीचे राजकारण आणि अस्थिरतेचे ढग, चलन फुगवटा, मंदीचा फटका या पार्श्वभूमीवर काही सुधारणा होतील अशी अपेक्षा होती. परंतु जागतिक व्यापार करार संघटना यातून काही धडे शिकू शकली नाही हे कटू सत्य आहे. सध्याच्या बहुध्रुवी व्यवस्थेवर बडी राष्ट्र टीका करताना दिसतात. कारण त्यांना आपली मनमानी चालवावयाची आहे. 'मागच्याच ठेच पुढचा शहाणा' अशी म्हण आहे. परंतु किती ठेचा खाल्ल्या तरीदेखील जागतिक व्यापार करार संघटना धडे घ्यायला, शिकायला तयार नाही. त्यामुळे धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी अवस्था या संघटनेची झाली आहे. या संघटनेच्या धुरिणांनी मोठ्या आशा घेऊन परिषदेचा मसुदा तयार केला. १७ महत्त्वाच्या परिच्छेदांवर एकमत झाले असे वरवर वाटत असले तरी जे काही ठोस हाती मिळावयाचे होते ते मिळाले नाही. इंगोझी ओंकोंवा एलिवेला बाईंनी आता एवढेच करावे की, चल रे भोपळ्या टुणुक टुणुक म्हणून त्यांनी भोपळ्यामध्ये बसून पुन्हा पुढची वाटचाल करावी. बडी राष्ट्रे तिला भिती दाखवत आहेत आणि तिला गिळंकृत करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि छोटी राष्ट्र मात्र तिला तूप-रोटी देऊन तिच्याकडून चांगल्या आशा आकांक्षा सफल करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु इंगोझी ओंकोंवा एलिवेला बाईंच्या नेतृत्वाखाली डब्ल्यू. टी. ओ. काही कात टाकेल अशी अपेक्षा होती त्याचा भ्रमनिरास झालेला आहे. भविष्यात तरी धडे घेऊन डब्ल्यू. टी. ओ., वर्ल्ड बँक व आय.एम.एफ. सारख्या आंतरराष्ट्रीय संस्था सुधारल्या नाहीत तर जगाच्या पाठीवर एकानंतर एक मंदीच्या लाटा येतील, चलन फुगवटा होईल आणि अर्थकारण बिकट होईल याशिवाय आणखी दुसरे कोणते चित्र उभे राहणार? पण भारताची भूमिका याबाबतीत खरोखरच स्फुरणीय आणि रोखठोक ठरली आहे.

जेव्हा विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापक मार्सेलो ओलरेगा यांनी म्हटल्याप्रमाणे, या परिषदेतून काही शाश्वत ठोस करार हाती लागतील असे वाटत नाही. त्यांनी केलेले हे भाकित शंभर टक्के खरे ठरले आहे. या परिषदेने हवेत इमले बांधले आणि त्यातून काहीही निष्पन्न झालेले नाही. डब्ल्यू. टी. ओ. चा सर्व कारभार चल रे भोपळ्या टुणुक टुणुक असा चालू आहे व चालू राहील.

# हे चाळे रोखायलाच हवेत !



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**काळ जसा सरत गेला तसा देश आधुनिकीकरणाकडे मार्गक्रमण करू लागला. माणसाचे राहणीमान उंचावू लागले. पूर्वी कधीतरी लग्न समारंभात किंवा मोठ्या कार्यक्रमात दिसणारी सुटाबुटातील माणसे आता लोकल ट्रेनमध्येही दिसू लागली आहेत. पूर्वी खासगी गाड्या कमी असल्याने रस्ते ओस असायचे, आता शहरासारख्या ठिकाणी गाड्या एव्हढ्या वाढल्या आहेत कि रस्ते कमी पडू लागले आहेत. लँडलाईन, पीसीओ, पेजर जाऊन मोबाईल आले, आता त्यातही क्रांती होऊन सर्वांना परवडणारे स्मार्ट फोन प्रत्येकाकडे आले.**

घरोघरी स्मार्ट टीव्ही आले, फ्रिज आणि धुलाई यंत्र आले. शहरांमध्ये आता चाळींतूनही घरोघरी वातानुकूलित यंत्रे(एसी) बसवली जाऊ लागली आहेत. प्रत्येकाच्या हाती स्मार्ट फोन आला आणि त्यामध्ये अनलिमिटेड डाटा पॅकही आला. सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स तयार झाले त्यावर प्रतिदिन रेंगाळणाऱ्यांची संख्याही वाढली, शेजारपाजारचे ४-५ मित्र दुरावले आणि सामाजिक माध्यमांवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स जोडले गेले. दुरदर्शनचा काळ संपला, वेगवेगळे चॅनल्स आले, आता तर ओटीटी प्लॅटफॉर्म्स सुद्धा आले. युट्युबचा पसारा अवास्तव वाढला आणि या युट्युबवरील चित्रपट, मालिका, खेळांचे सामने, खाद्यपदार्थांच्या रेसिपी, इंटरनेटच्या साहायाने स्मार्ट टीव्हीवर मोठ्या स्क्रीनवर पाहण्याची सुविधा उपलब्ध झाली. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर नवनवीन चित्रपट आणि वेब सिरीज यांचे अक्षरशः पेव फुटले. एक काळ असा होता जेव्हा चित्रपटात प्रेमप्रसंग दाखवण्यासाठी दोन फुलांचा वापर केला जात असे, आता काळ इतका पुढे गेला आहे की चित्रपट परीक्षण मंडळाकडून 'अ प्रमाणपत्र' घेऊन शयनगृहातील प्रणयदृश्ये खुलेआमपणे पडद्यावर दाखवली जाऊ लागली आहेत. आयटम साँग , चुंबनदृश्ये, शिव्यांचा मुक्त वापर आणि भडक दृश्यांशिवाय हल्लीचे चित्रपट पूर्णत्वाला येतच नाहीत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सना सेन्सॉरचेही बंधन नसल्याने येथील प्रौढांसाठी बनवण्यात आलेल्या वेब सिरीज शाळेतील मुलेही आपल्या स्मार्ट फोन्सवर चवीने पाहू लागली आहेत. चित्रपटातील अभिनेत्रींचा तोकड्या कपड्यांतील वावर आताच्या तरुणींना स्टाईल स्टेटमेंट वाटू लागले आहे. त्यामुळे महाविद्यालयात आणि कार्यालयांत तोकडे कपडे घालून जाणाऱ्या अनेक तरुणी प्रतिदिन बस, रेल्वे आणि रहदारीच्या ठिकाणी दिसू लागल्या आहेत.



पौगंडावस्थेतच मुलांच्या हाती स्मार्ट फोन्स आल्याने त्यावर पॉर्न चित्रपट पाहणाऱ्या मुलांचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहे. पूर्वी कधीतरी निर्जन स्थळी दिसणारी प्रेमी युगुले आज गर्दीच्या, रहदारीच्या ठिकाणी सर्रासपणे दिसू लागली आहेत. ट्रेन, बस, पादचारी पूल, स्कायवॉक, बगीचे, तळी, नदी-समुद्र किनारे, बस आणि रेल्वे स्थानक यांवर यांचे चाळे सर्वांदेखत सुरु असतात. यामध्ये १५-१६ वर्षांच्या मुला-मुलींचाही सहभाग असतो. चित्रपट-मालिकांमध्ये दाखवण्यात येणारी भडक प्रणयदृश्ये, मुलांच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स, त्यांवरील इंटरनेटचा स्वैर वापर, पालकांनी मुलांना दिलेली अवास्तव मोकळीक आणि मुलांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव ही यामागील प्रमुख कारणे आहेत. सध्या सुरु असलेला 'व्हॅलेंटाईन वीक' म्हणजे यांच्यासाठी पर्वणीच आहे. रोजच्या रहदारीच्या वाटेवरील यांचे चाळे पाहून सभ्य माणसे त्यांच्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करताना आढळतात, पालक आपल्या लहान मुलांची नजर त्यांच्यावर पडणार नाही याची काळजी घेताना दिसतात; मात्र त्यांना हटकण्याचा किंवा जाब विचारण्याचा प्रयत्न करताना कुणीच दिसत नाहीत. एखादी संस्कृतीरक्षक संघटना यांच्यावर कधीतरी धडक कारवाई करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा समाजातील तथाकथित प्रेमाचे ठेकेदार जागे होतात आणि आणि या चाळ्यांना विरोध करणाऱ्यांना तालिबान्यांची उपमा देऊन यांच्यावर प्रसिद्धी माध्यमांतून गळे काढतात. पोलीसही या चाळ्यांकडे दुर्लक्ष करताना आढळतात. परिणामी या आधुनिक प्रेमवीरांचे धाडस दिवसागणिक वाढत चालले आहे. यामध्ये आपली मुले नाहीत, म्हणून आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत असू, तर अन्य कुठेतरी आपली मुलेसुद्धा हेच करत नसतील याची शाश्वती आपण देऊ शकतो का ? आपण भारतात राहतो. येथील संस्कृती असल्या स्वैराचाराला मुळीच मान्यता देत नाही. त्यामुळे संस्कृतीला काळिमा फासणारे कृत्य रोखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

## संवाद...

आधुनिक केसरी

असे म्हणतात की संवाद ही सुसंस्कृत लोकांची भाषा आहे. आणि तलवार ही रानटी लोकांची भाषा आहे. अगदी बरोबर आहे. कारण एकमेकांशी संवाद साधला तर गैरसमज दूर होतात. वाद होत नाही. मनातलं मळभ स्वच्छ होतं. आणि तेच जर संवाद न साधता समोरच्यावर तलवार उपसाल तर रक्ताचे पाट वाहतील .गैरसमज वाढत जातील .नात्यात मळभ तयार होईल. मनाला काटे टोचत राहतील .संशयाच्या भिंती तयार होतील. हे सगळं टाळायचं असेल तर संवाद साधला पाहिजे. शेजारीपाजारी, मित्र, नातेवाईक, मूलं,पती पत्नी ,भाऊ बहीण, इतर ओळखी ,अनोळखी लोकांसोबत सतत संवाद साधत राहा. कधीही एकटे वाटणार नाही. संवाद साधल्याने आपलेही मन मोकळे होते. बस, रेल्वेत शेजारी बसलेल्या सहप्रवाशासी संवाद साधला असता प्रवास सुखकर होतो. परंतु संवादाची भाषा प्रेमळ असावी. त्यात कुठलाही स्वार्थ नको. किंवा अरेरावी नको. आपल्या प्रेमळ सुखी कुटुंबात आपण सर्वांशीच नेहमी प्रेमळ संवाद साधला तर हृदयरोग आणि मानसिक रोग कमी होतील.

संस्कारधन

सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.38

हसऱ्या कुटुंबात लोक कमी आजारी पडतात. कारण आपल्या मनातील भावना ते कुटुंबातील माणसाजवळ व्यक्त करतात. शिवाय कुठल्याही लहान लहान गोष्टीत ते आनंद शोधत असतात. घरातील कामं मिळून करतात. त्याचवेळी त्यांचा एकमेकांशी संवाद होत असतो. परंतु संवाद होत असताना वाद होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. काम आनंदाने केली पाहिजे
नात्यातील गैरसमजाच्या भिंती, शंकांचे पूल पाडण्यासाठी गोड संवादाची शुद्ध बीज रोवली पाहिजे . फळ आपोआप रसाळ गोमटी येतील. फक्त निरर्थक गप्पा मारून काहीच फायदा होत नाही. "मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण". मन तेव्हाच प्रसन्न होईल जेव्हा आपण दुसऱ्यांशी गोड हळुवार संवाद करू...
चला तर मग संवादाशी दोस्ती करूया.....

## बोलका शंख

आधुनिक केसरी

एका साधूने तीन शंख एका मुलापुढे ठेवले.
यातला एक शंख तू घे, असं तो मुलाला म्हणाला.
त्यामुळे मला काय मिळेल, मुलाने विचारलं.
ते तू त्यांनाच विचार. शंखांना काय विचारणार, मुलाला प्रश्न पडला. त्याच्या खिशात एक रुपयाचं नाणं होतं. ते त्याने एका शंखात टाकलं. शंखातून एक रुपयाची दोन नाणी बाहेर आली.
मुलाचे डोळे विस्फारले. दुसऱ्या शंखात त्याने एक नाणं टाकलं. एक रुपयाची तीन नाणी त्यातून बाहेर आली. मुलाने तिसरा शंख उचलला. त्यामध्ये नाणं टाकणार होता आणि शंखाने विचारलं, किती रुपये हवेत तुला... मुलाने ताबडतोब सांगितलं हाच शंख मला हवा. साधूने पहिले दोन शंख समुद्रात फेकून दिले. बोलका शंख घेऊन मुलगा घरी आला.
शंखाची पूजा करून तो म्हणाला, मला एक लाख रुपये हवेत. शंख म्हणाला, त्या पैशाचं तू काय करणार... मी घर घेईन, मुलगा म्हणाला.
एक लाख रुपयात एक घर आलं की पैसे संपतील की, शंख म्हणाला. हं, असं कर मला दहा लाख रुपये दे, मुलाने दुसरी मागणी केली.
ते तरी किती दिवस पुरतील, शंखाने विचारलं.
दोन वर्षं जातील की, मुलगा म्हणाला.
पण त्यानंतर... शंखाने प्रश्न केला. खरंच की, दोन वर्षांनंतर काय करणार....मुलाने विचार केला. असं कर की माझी अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची कर, मुलगा म्हणाला. या मागणीत काही दम आहे, शंखाने त्यांचं कौतुक केलं आणि विचारलं, पण चीन, अमेरिका यांच्या अर्थव्यवस्था किती ट्रिलियन डॉलर्सच्या आहेत, याची चौकशी कर की. मुलगा म्हणाला, हो तेही खरंच. मी करतो चौकशी पण तूर्तास पाच ट्रिलियन डॉलर्स ची अर्थव्यवस्था तर होऊ दे. मी बोलका शंख आहे, देणारा नाही, शंखाने वस्तुस्थिती सांगितली. मुलाला धक्काच बसला, तू देणारा नाहीस ....त्याने आश्चर्याने विचारलं. देणारे पहिले दोन होते, मी बोलका शंख आहे, बोलका शंख उत्तरला. हसू नका, गेली दहा वर्षं भारतीय मतदार बोलक्या शंखाला निवडून देत आहेत. आता फक्त हसु नका, कृती करा आणि हाकलायची तयारी करा या बोलक्या शंखांना अन्यथा तुमच्या सर्वनाशास तुम्हीच जबाबदार असणार आहात, त्यासाठी कुठलाही साधु तुम्हाला सांगायला येणार नाही.

## मिलिंद गवळी झाले भावुक

आधुनिक केसरी



गेल्या कित्येक वर्षांपासून 'आई कुठे काय करते' मालिकेद्वारे अनिरुद्धच्या भूमिकेत प्रेक्षकांचं मनोरंजन करत असलेले मिलिंद गवळी नेहमी चर्चेत असतात. अभिनयाव्यतिरिक्त त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे ते कायम चर्चेचा विषय असतात. दैनंदिन जीवनातील गोष्टींशिवाय बऱ्याच विषयांवर ते परखड लिहित असतात. आज मिलिंद गवळी यांनी आईच्या आठवणीत एक भावुक पोस्ट लिहिली आहे. तसेच आईचे काही व्हिडीओ त्यांनी शेअर केले आहेत. अभिनेते मिलिंद गवळी यांच्या आईला जाऊन आज पंधरा वर्षे पूर्ण झाली आहेत. २ मार्च २००९ साली त्यांच्या आईचं निधन झालं. याचनिमित्ताने मिलिंद गवळी यांनी आईच्या सुंदर आठवणींना उजाळा दिला आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' ही म्हण मी लहानपणापासून ऐकत आलो आहे आणि ती म्हण अगदी खरी आहे. अजून एक अशीच म्हण आहे 'मातृदेवो भवः' ती पण म्हण खरी आहे. आज बरोबर पंधरा वर्षे झाली माझ्या आईला जाऊन, २ मार्च २००९ . या पंधरा वर्षात अनेक वेळेला मी कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात गेलो किंवा तुळजापूरला आई भवानीच्या मंदिरात गेलो किंवा वणी सप्तशृंगी मंदिरात गेलो किंवा एकवीरा देवीच्या मंदिरात गेलो की त्या मूर्तीमध्ये मला माझ्या आईचा भास होतं. आज शरीराने ती आमच्यात नाहीये पण तिने हे देवीचे रूप धारण केलंय असंच मला वाटतं. जी कोणी माऊली मला भाकरी खाऊ घालते तिच्या रूपात पण मला माझी आई दिसते.

## सूर निरागस हो...

आधुनिक केसरी

**हल्ली ना कस जगावं तेच कळत नाही . कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात की, पेला अर्धा भरला आहे असं सुद्धा म्हणता येत , पेला अर्धा संपला आहे असं सुद्धा म्हणता येत , तुम्हीच सांगा कस जगायचं ? पेला अर्धा भरला आहे म्हणायचं की पेला अर्धा सरला आहे म्हणायचं आपणच ठरवू या कस जगायचं ???**


प्रा. शाम हेडाऊ
9834301568

पण ना हल्ली ज्याचा पेला भरला आहे तो ही रडतोय , आणि ज्याचा सरला आहे तो ही रडतोय. सगळीकडे कसे नाराजीचे सूर , नैराश्याचे सूरच ऐकायला मिळत आहेत . लहानांना त्यांच्या शाळा आणि वेगवेगळ्या क्लासेस पासून फुरसत नाही . तरुणाईला मोबाईलच्या डेटा पासून फुरसत नाही. तरुणाईच्या आई वडिलांना त्यांच्या नोकरी व्यवसायापासून फुरसत नाही , आणि वृद्धांना आपल्या चिंतेपासून फुरसत नाही . सगळे कसे आपापल्या कामात गुंतलेले . त्यामुळे कोणालाच कोणासाठी हवा तो वेळच नाही . कट्ट्यावरच्या गप्पा , पडावरच्या गप्पा , मैदानावरच्या गप्पा, कौटुंबिक गप्पा या हल्ली होतांना दिसतच नाही . सगळ्यांना बोलायचं खूप आहे , पण मन हलकं करावं , रित करावं असं हक्काचं अस आपलं माणूसच भेटत नाही . संवादाची माध्यम वाढलीत खरी पण मनाचा , मनाशी , मनापासून होणारा संवाद मात्र हरवत चाललाय हे तेवढंच खरं. म्हणून तर मानसोपचार तज्ज्ञांची गरज वाढायला लागलीय , समुपदेशन ही आता या काळाची गरज व्हायला लागलीय . आधी घरातल्या घरातच रडून , भांडून , ओरडून , चिडून मन मोकळं होऊन जायचं. मैदानावरची भांडणं ही तिथेच पूर्ण व्हायची नि लगेच दुसरी मॅच सुरूही व्हायची . कॉलेज ची भांडण मित्रच निपटवून टाकायची , लगेच चहा व्हायचा भांडणाऱ्यासोबतच. काळ बदलला तस तंत्रज्ञान बदललं, तंत्रज्ञानासारखीच माणसही बदलली .



नातीही आता " नॉन स्टीकी , निर्लेप " झाली. टच स्क्रीन मोबाइल प्रमाणे नातीही आता फक्त टचेबल उरायला लागलीत . आणि म्हणूनच आता लोकांमध्ये भरभरून जगण्याची अशी उर्मी राहिली नाही . जो तो आपला धावतोय फक्त बस . पण या धावण्यात , जगण्यात नैराश्याचे सुरच आता जास्त ऐकायला मिळतात . द्वेष भावना वाढायला लागलीय , मत्सर वाढायला लागला, हेवेदावे वाढलेत.... स्पर्धा वाढली , पैसा वाढला , श्रीमंती वाढली पण मन मात्र कोती होत चाललीय . सिमेंट काँक्रीट ची जंगल वाढलेत ना तशी माणसही आता सिमेंट काँक्रीट सारखीच व्हायला लागलीत. आधीची आपुलकी , आधीच प्रेम , आधीचा जिव्हाळा ,आधीचा साधेपणा आता उरला नाही. बोलणंही महाग झालय हल्ली . माणसं एकमेकांशी बोलतच नाहीत आताशा. आणि यातून वाढत चाललंय ते नैराश्य बस. आपसातील स्पर्धेतून एकमेकांच्या जीवावर उठलीत माणसं. प्रेमातूनही जीव घ्यायला लागलीत माणसं . तिरस्काराची भावना वाढायला लागलीय . जगण्यातला सुरच हरपत चाललाय .

आपल्या आयुष्यातील आपले सूर तरी पूर्वीसारखेच निरागस होतील का ?? आपण आपल्या पासून ही सुरवात करू शकू का ?? आपण ठरवायचं का की नाही रडत बसायचं आपण कोणत्याही छोट्या मोठ्या कारणांनी .तर , जगायचं छान मन भरून आनंदानी. द्यायचा हात मदतीला कुणाच्यातरी . राहायचं एकमेकांच्या सोबत अडीअडचणीला उभं . निभवायची मैत्री निस्वार्थ . जमेल ?? सूर निरागस हो म्हणत आपणच सुरवात करू या ना . पाहू जगण्यातील गंमत बदलते का ? प्रयत्न करायला काय हरकत आहे ?? पहा, विचार करा ... बस फक्त " सुर निरागस हो SSSSS ....अस सकाळी उठल्या उठल्या म्हणा नी दिवसभर गुणगुणत राहा ... पहा काही बदल होतो का ... सूर निरागस हो ....

## जागतिक वन्यजीव दिन


आधुनिक केसरी

**आज ३ मार्च, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिना मागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.**

याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एककिडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर या आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे. वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे, वन्यजीवांची शिकार त्यांची तस्करी अशा अनेक कारणाने वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे. हस्तिदंतासाठी आजवर १ लाख आफ्रिकन हत्ती शिकार झाले आहेत. खवले मांजर हा जगातील सर्वाधिक मारला जाणारा सस्तन प्राणी ठरला आहे. मागील दहा वर्षात गेंड्याच्या शिकारीत कैक पटीने वाढ झाली आहे. वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वानी ध्यानात घेतली पाहिजे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. विशेष म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या तरुण आहे. म्हणून वन्यजीव संरक्षण व संवर्धन करण्यात तरुणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. तरुणांना वन आणि वन्यजीवांचे महत्व समजावून सांगावे त्यासाठी शाळा कॉलेजमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करावे. तरुणांच्या हातात केवळ त्या त्या देशाचे भविष्यच नसून जगभरातील सर्व वन्यजीवांच भविष्य त्यांच्याच हाती आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

श्याम बसप्पा ठाणेदार
९९२२५४६२९५

आधुनिक केसरी




सौ. सविता खंडगावकर , नांदेड
संपर्क क्र. 7218340512




1 कप ज्वारीचे पीठ, 1/2 कप गव्हाचे पीठ, १/२ कप ह. डाळीचे पीठ,
1-2 टिस्पून. हिरवी मिरची,6-7 लसूण पाकळ्या, 1/4 कप चिरलेली कोथिंबीर
1/4 टिस्पून . हळद 1/4 टिस्पून . जिरे. मीठ चवीनुसार तेल आवश्यकत्तेनुसार

**कृती :** हिरवी मिरची आणि लसूण पेस्ट बनवा .
एक ताटात ज्वारीचे पीठ, गव्हाचे पीठ, ह. डाळीचे पीठ घ्या त्यात मिरची आणि लसूण पेस्ट, हळद, जिरे , गरम मसाला, कोथिंबीर आणि मीठ घाला नंतर सर्व एकत्र करून त्यात थोड़े थोड़े पानी घालून हाताने चांगले मळुन घ्या मळलेल्या पीठाचे लहान लहान गोळे करून घ्या. प्लास्टिक चा कागद किंवा सुती जाड कपडा घेऊन त्याला थोडे पाणी लाऊन त्याचाय्वर तो पिठाचा गोळा ठेऊन बोटांच्या मदतीने थापून गोल आकार द्या, पण त्याच्या कडा तुटल्या जाणार नाही याची दक्षता घ्या . एका बोटाने मध्यभागी लहानशे छिद्रे पाडून घ्या. एका फ्रायपॅन किंवा तवा घेऊन तो गरम झाल्यावर, त्यावर थोडे तेल पसरून घ्या. नंतर त्या कपड्याचे दोन्ही टोक पकडून ती धपाट तव्यावर अलगत सोडा. हे करत असतांना धपाट तुटणार नाही याची काळजी घ्या. आता थोडे चमच्याने धपाटयाच्या छिद्रांमध्ये थोडे आणि सभोवताली तेल सोडा आणि मधम आचेवर धपाट एका बाजूने भाजू द्या, व काही वेळानी पालटून दुसरी बाजू भाजू द्या. तयार झालेल्या गरम गरम धपाटयाचा आस्वाद घ्या.

# स्त्री-पुरुष समानता नव्हे परस्परपूरकता



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**"घरकुल असते दोघांचे दोघांनी असते सावरायचे, एकाने पसरवले तरी दुसऱ्याने असते आवरायचे, स्त्री आणि पुरुष ही दोन संसाररूपी रथाची चाके आहेत. असे आपण नेहमीच ऐकतो, वाचतो. कुटुंबातील स्त्री-पुरुषांमध्ये समन्वय असेल तर ते कुटुंब अधिक सुखी- समाधानी जीवन जगते. आज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, साहित्यिक अशा सर्वच क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहे .स्त्री -पुरुष समानतेबरोबर परस्परपूरकतेचा विचारही समाजात बऱ्यापैकी रुजतो आहे.**

आजच्या आधुनिक काळाबरोबरच भारतीय इतिहासात डोकावून पाहताना अशी अनेक उदाहरणं आपल्या नजरेसमोर येतात की ज्यांच्या परस्परपूरकते मुळे त्यांचे नाव व कार्य इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले. यामध्ये राजमाता जिजाऊ यांचे नाव प्रथमतः घ्यावे लागेल. पती शहाजीराजांचे स्वराज्य निर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी शिवबांना घडवले. दोघांचे निर्णय नेहमीच परस्पर पूरक असल्यामुळेच स्वराज्याचा वटवृक्ष उभा राहिला. छ.शिवाजी महाराजांनी सुद्धा आपल्या आऊसाहेब जिजाऊ सारखाच पत्नी व पुढे सुनबाईंना सुद्धा राज्याकारभारात लक्ष देण्याबरोबरच न्याय निवाडा करण्याचा अधिकार ही दिला होता. शिवरायांनी सुनबाई येसूबाईसाहेबांना जिजाऊंच्या निधनानंतर 'शिक्के कट्यार' सुपूर्द करून कुलमुखत्यार' पदाची मोठी जबाबदारी दिली होती.तसेच छ.शंभूराजांनी सुद्धा येसूबाई साहेबांवर "स्त्री सखी राज्ञी जयती" असे काव्यं लिहून त्यांचा सन्मान केला. स्वराज्यातील महत्त्वाच्या निर्णयात ते येसूबाईंशी सल्ला मसलत करत हे केवळ परस्पर पूरक विचारांमुळेच शक्य झाले.पुढे महाराणी ताराबाईंनी सुद्धा मराठ्यांचे साम्राज्य अबाधित ठेवण्यात प्रयत्नांची पराकाष्टा केली. हे सर्व त्यांच्या पित्यांनी केलेले संस्कार व पतीने दिलेली परस्पर पूरक वागणूक यामुळे शक्य झाले.तसेच क्रांतीज्योती सावित्री व ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक व साहित्यिक कार्य परस्परपूरक विचारांमुळेच शक्य झाले. भारतातील पहिल्या महिला डॉ. आनंदी गोपाळराव जोशी यांना सुद्धा त्यांच्या पतीने समाजातील वाईट रूढी, प्रथांना झुगारून डॉक्टर केले. ज्याकाळी स्त्रीने शिक्षण घेणे हाच खूप मोठा समाज मान्य गुन्हा होता.

अहिल्याबाई होळकर,झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी दुर्गावती, राणी कर्णवती, अरुणा असफ अली, कॅप्टन लक्ष्मी सहगल, स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, राज्यपाल सरोजिनी नायडू, राजदूत विजयालक्ष्मी पंडित, आणि त्याही पुढील काळात पहिल्या महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी, अंतराळ वीर कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, बिझनेस विमेन इंदिरां न्युयी, ऑलम्पिक मध्ये भारताचे नाव उज्ज्वल करणारी कर्णम मल्लेश्वरी, मेरी कोम, इंग्लिश खाडी पोहणारी आरती शहा, भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, एव्हरेस्ट शिखर सर करणारी बच्चेंद्री पाल, अनेक पदे भूषविणाऱ्या सुषमा स्वराज,उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश फातिमा बीबी,इ. स्त्रियांनी आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतच कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. हे सर्व अर्थातच त्यांच्या बरोबरच त्यांच्या परिवारातील परस्परपूरक विचारांमुळेच शक्य झाले.

प्रत्येक स्त्रीमध्ये काही ना काही वेगळे गुण, कला निश्चित असते. फक्त तिला गरज असते ती प्रेरणेची आणि परस्पर पूरक विचारांची.उलट जर स्त्री-पुरुषांमध्ये विचारांचा समन्वय नसेल तर अगदी शुल्लक कारणांवरूनही त्यांच्यामध्ये वाद होऊ शकतात.पूर्वीच्या काळाच्या तुलनेत आज स्त्री-पुरुषांमध्ये प्रत्येक क्षेत्रात समानता आलेली दिसते. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. किंबहुना काही क्षेत्रात तर स्त्रिया पुरुषांच्याही पुढे पाऊल टाकताना दिसतात परंतु असे असले तरी काही मोजक्याच स्त्रियांच्या जीवनात त्यांचे विश्व निर्माण करण्याची संधी त्यांना मिळते. अजूनही अशा बऱ्याच स्त्रिया आहेत ज्यांना ना स्वातंत्र्य मिळते...ना शिक्षण.. नाही समानतेची वागणूक. जिथे समानताच मिळत नाही तिथे परस्परपुरकता असणे तर खूप दूरची गोष्ट. बुद्धिमान मत मांडणाऱ्या महिला सर्वांनाच आवडतात पण त्या आपल्या घरात मात्र कोणालाच नको असतात. असेच आपल्याला बऱ्याचदा पाहायला मिळते.काही स्त्रियांना अजूनही आपल्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळत नाही. त्यांचे विश्व या कवितेच्या ओळी सारखेच असते.

**"मुके- मुके शब्द तिचे, कोंडलेला श्वास आहे...**
**स्वप्नाना कुठे तिच्या ,मोकळया आकाश आहे..."**

परंतू खऱ्या अर्थानं देशाचा, समाजाचा, कुटुंबाचा विकास करायचा असेल तर स्त्री -पुरुषांमध्ये फक्त समानता असून चालणार नाही तर परस्परपुरकता असणे तितकेच महत्वाचे आहे. अजूनही बऱ्याच स्त्रिया स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकत नाहीत. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नाहीत. बऱ्याच कमावत्या स्त्रियांनाही आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य नाही. हे होण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे ते परस्पर पूरकता.

कवयित्री संगीता नागदिवे आपल्या संसार दोघांचा या कवितेत लिहितात.

**"संसार आपल्या दोघांचा**
**फुलवू प्रेमाच्या नात्याने**
**प्रफुल्लित ठेवू घर मंदिर**
**एकमेकांच्या साथीने"**

एकमेकांच्या साथीने म्हणजेच परस्पर पूरक विचारांनी असेच कवयित्रीला या ठिकाणी सांगायचे आहे.परस्परपुरकता असणे म्हणजे काय? हे सर्वप्रथम मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. परस्परपूरक असणे म्हणजेच एकमेकांना समजून घेणे. एकमेकांच्या भावनांचा विचार करणे. वेळोवेळी एकमेकांचे कौतुक करणे, प्रेरणा देणे. एकमेकांसाठी प्रसंगी त्यागही करणे. कोणतीही टोकाची भूमिका न घेता सामंजस्याने प्रश्न सोडवणे. एकमेकांप्रती सहकार्याची भावना असणे. एकमेकांना संधी देणे, छंद आवडी जोपासणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एकमेकांप्रती विश्वास व आदर असणे.अशाप्रकारे आपणास परस्परपूरकता म्हणजे काय ते सांगता येईल. ज्या कुटुंबामध्ये परस्पर पूरकता असते ते कुटुंब अधिक सुखी असते कारण...

**"नको कुणी वरचढ**
**नको कुणास दुबळेपणा**
**परस्परपूरक दोन जीव**
**हाच सुखी संसाराचा कणा"**

आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहेत. याचे जसे चांगले परिणाम घडत आहेत तसेच काही वाईटही परिणाम घडत आहेत. काही वेळेला स्त्री-पुरुष समानतेचा गैरवापर झालेला दिसतो. आज स्वातंत्र्याच्या नावाखाली बऱ्याच ठिकाणी स्वैराचार सुरू झालेला दिसतो ही अत्यंत घृणास्पद बाब आहे.स्वैराचारामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त होत आहेत.आज बऱ्याच स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनल्या आहेत. त्यांना नोकरीसाठी घराबाहेर पडावे लागते अशावेळी घर व संसार अशा दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळत असताना त्यांची तारेवरची कसरत होते. कुटुंबातून पतीचे किंवा इतर कुटुंबियांचे सहकार्य त्यांना लाभले तर त्या हे कार्य अधिक चांगल्या प्रकारे पार पाडू शकतात. काही वेळेला त्यांना सहकार्य मिळाले नाही तर कुटुंबात वाद विकोपाला जाऊ शकतो.त्यामधून अनेक जोडपे मांडलेला संसाराचा डाव मोडून घटस्फोटाच्या निर्णयापर्यंत येतात. यामुळे मुलांच्या मनावर खोलवर वाईट परिणाम झालेले दिसून येतात. आई- वडिलांच्या घटस्फोटानंतर मुलांना कोणत्यातरी एकाचेच प्रेम मिळते व एकाच्या प्रेमापासून मुले वंचित राहतात.

एखादी स्त्री नोकरी करत असेल तरीही तिला मुलं, पती, सासू-सासरे इ. सर्वांविषयी असणाऱ्या तिच्या जबाबदाऱ्या नाकारून चालणार नसते. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतच तिला तिचे विश्व निर्माण करावे लागते. काही स्त्रिया मात्र आपण कमावत्या आहोत त्यामुळे पती, मुले व घरातील जेष्ठ व्यक्तींशी असणारी त्यांची कर्तव्य नाकारून सर्वांनाच अपमानास्पद वागणूक देतात. अशावेळी नातेसंबंधात परस्परपुरकता राहत नाही. नात्यांचे रेशीम बंध सैल होऊ लागतात. अशावेळी एकमेकांना समजून घेऊन प्रश्न सोडवले जाऊ शकतात.कारण...

**"असो विचार जुळते**
**नको टोकाचे पाऊल**
**संभाव्य संकटांची**
**ओळखावी ती चाहूल"**

नुकतीच भारताने चांद्रयान-३ मोहीम यशस्वी रित्या पार पाडली. या यशात अनेक संशोधक स्त्रियांचा सिंहाचा वाटा होता. आपल्या सर्व संसारिक जबाबदाऱ्या पार पाडून त्यांनी हे यश मिळवले आहे. अर्थात या सर्वांचे श्रेय त्यांच्या कुटुंबीयांनाही द्यावेच लागेल. कारण त्यांच्या कुटूंबात केवळ स्त्री -पुरुष समानता नसून परस्परपूरकता आहे.

याचेच दुसरे उदाहरण म्हणजेच रणरागिनी वर्षा पाटील -मकदूम या होत. मागील काही महिन्यांपूर्वी आपल्या अवघ्या दहा महिन्याच्या बाळाला सोडून भारतीय सैन्य दलात सेवेत रुजू झालेल्या वर्षा पाटील यांचा व्हिडिओ आपण सर्वांनीच पाहिला एवढ्या छोट्या बाळाला सोडून सीमेवर जाणे खरे तर खूप मोठे धाडस पण पती-पत्नीमध्ये असणारी परस्पर पूरकता,कुटुंबाची साथ यामुळेच हे सर्व शक्य होऊ शकतो. "रणरागिनी वर्षा पाटील" या कवितेत त्यांच्या पतीच्या भावना या ओळींमधून मी व्यक्त केल्या आहेत.जणू आपल्या पत्नीला निरोप देताना म्हणत आहेत...

**"तुझ्या कुटुंबाची तुला,**
**असे साथ गं मोलाची**
**नको करूस काळजी,**



**तुझ्या तान्हुल्या पिल्लाची**
**पहाता पहाता हा काळ,**
**असा पुढे गं जाईलं**
**मोठा होऊन तुझा बाळ,**
**उभा सीमेवर राहिलं "**

याशिवाय ही अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे आपल्याला देता येतील ज्यांच्या परस्पर पूरक सहजीवनामुळे त्यांनी स्वतःबरोबरच देशाचाही विकास केलेला दिसून येतो. अशीच परस्पर पूरकता सर्व कुटुंबात निर्माण झाली तर प्रत्येक स्त्री आपल्या आपल्या क्षेत्रात स्वतःचा अमिट ठसा उमटवल्याशिवाय राहणार नाही. मातृत्व हे स्त्रियांना मिळालेले वरदान आहे. या वरदानाला कोणत्याही स्त्रीने नाकारू नये. परंतु हेच मातृत्व स्त्रियांच्या यशात अडचणही ठरू नये. मातृत्वाची जबाबदारी पार पाडल्यानंतर तिला तिचे ध्येय साध्य करता यावे. तशी साथ तिला तिच्या कुटुंबाकडून मिळावी. याचेच उत्तम उदाहरण म्हणजेच "मेरी कोम" होय.२०१२च्या ऑलम्पिक स्पर्धेत आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडून "मेरी कोम" यांनी बॉक्सिंग खेळात ऑलम्पिक मध्ये भारत देशाला कांस्य पदक मिळवून दिले.

स्त्री- पुरुष परस्परपूरकता विचार मांडताना समाजात स्त्रीने कसे वागावे व पुरुषाने कसे वागावे याचे काही नियम समाजात रुजलेले दिसतात. त्यात थोडा जरी वेगळेपणा आढळला तरी ते सुशिक्षित लोकांच्या देखील मनाला खटकल्याशिवाय राहत नाही.

उदा. जरी पती-पत्नी दोघेही नोकरी करणारे असतील तरी स्वयंपाक, मुलांची जबाबदारी, घराची स्वच्छता,भांडी-धुणी इ. कामे ही स्त्रियांनीच केली पाहिजेत. किराणा सामान, भाजीपाला आणणे, मुलांच्या शाळा ट्युशन चे ऍडमिशन,घरातले कोणतेही महत्त्वाचे निर्णय कामे पुरुषांनीच केली पाहिजेत असा एक नियम समाजात निर्माण झालेला आहे. दोघेही सारखेच कमावते असतील. किंवा काही प्रमाणात कमी -जास्त कमावते असतील तरीही कोणतेच काम पुरुषाचे किंवा स्त्रियांचे नसून संसार दोघांचाही आहे या भावनेतून एकमेकांना सहकार्य केले तर तो संसार परस्परपूरक होतो. पण पती जर पत्नीला एखाद्या कामात मदत करत असेल तर हे इतरांना खटकल्याशिवाय राहत नाही. पतीने केलेल्या सहकार्याच्या जाणिवेने पत्नीही सुखावून जाते. सुप्रसिद्ध कवयित्री प्रा.मीनल येवले आपल्या एका कवितेत लिहितात...

**"माझा अवकाश पेलून धरताना**
**तू झालास आकाशभर**
**सारे सुखदुःख कुरवाळून घेतलेस**
**आपल्या मिठीत**
**श्वासांना दिलीस नवसंजीवनी**
**माझ्या वाटेतला ऊन वारा**
**सामावत राहिलास आपल्या दिठीत"**

कवयित्रीला जीवनसाथीने दिलेल्या साथमुळेच त्या त्यांचे ध्येय गाठू शकल्या. हे दोघेही एकमेकांना परस्परपूरक असल्याशिवाय शक्य नाही.पत्नीने ही आपल्या पतीला जीवनात अशी साथ द्यावी तिचे वर्तन एवढे परस्परपूरक असावे की त्याने तिला हळुवार म्हणावे,

**"क्षणभर आरशापुढे उभी तू राहा!**
**स्वतःलाच स्माईल प्लीज म्हणून तर पहा!**
**सासू-सासरे, मूलं ,पती सर्वांसाठी राबतेस...**
**तुझ्या छंद आवडी मात्र,**
**ओठाआड दाबतेस**
**छंद आवडी तुझ्याही**
**कधी फुलवून तर पहा!**
**क्षणभर आरशा पुढे उभी तू रहा!"**

या जगात असे अनेक जोडपे आहेत ज्यांच्यात परस्परपूरकता असल्यामुळे ते जीवनात यशस्वी तर झालेच आहेत पण समाधानीही आहेत. यशस्वी होण्याबरोबरच संसारात सुख , समाधान लाभणे हेही तितकेच मोलाचे आहे. पती-पत्नीमध्ये परस्पर पूरक विचार असतील पतीचे सहकार्य लाभण्याने पत्नी स्वतःचे ध्येय गाठू शकली तर तिच्या ओठावर सदैव आपल्या पतीसाठी हेच शब्द येतील...

**"साथ तुझी लाभता रे**
**पंख फुटले जगण्याला**
**क्षण फुलले रे माझे**
**अर्थ आला जीवनाला..."**

प्रत्येक स्त्रीला जन्मापासून पिता,भाऊ विवाहानंतर पती,सासरे, व पुढे मुलगा त्याही पुढे नातू अशा सर्वांच्या बंधनात रहावे लागते. काही स्त्रियांना विवाह नंतर जर पतीचे सहकार्य लाभले तर त्या आपली बरीचशी स्वप्न पूर्ण करू शकतात. परस्पर पूरक विचारांमुळे पती-पत्नी दोघांचाही संसार सुखाचा होतो. अशा सुखी संसारात पत्नीच्या मनात आपल्या पतीविषयी याच भावना येतील...

**दिलेस सखया, पंख नवे तूमाझ्या स्वप्नांना...**
**नाही विसरला सप्तपदीच्या सात वचनांना...**
**एका पंखाने उणी मी होते, इवली रे चिमणी...**
**तुझ्या पंखांचे बळ लाभता झेप घेते गगनी**
**तुझ्यामुळे रे अर्थ लाभला, रित्या जीवनाला...**
**नाही विसरला सप्तपदीच्या सात वचनाला...**

अशा प्रकारे समाजात फक्त स्त्री-पुरुष समानता असून चालणार नाही. तर परस्परपूरकता असणे हे तेवढेच आवश्यक आहे. असे मला वाटते. घरात आपल्या मुलाचे लग्न करताना त्याच्या आई-वडिलांनी येणाऱ्या सुनेला आपल्या मुलाकडून व आपल्याकडून परस्परपूरक वागणूक मिळावी असाच प्रयत्न केला पाहिजे. किंवा तसेच संस्कार प्रत्येक मुला-मुलींवर व्हायला हवेत. आपल्या मुलीलाही विवाहानंतर तिने पतीला समजून घेत संसार करावा, दोघांचे वर्तन सदैव परस्परपूरक असावे अशीच शिकवण द्यायला हवी. तरच खऱ्या अर्थाने घटस्फोटांचे वाढणारे प्रमाण कमी होऊन सर्व कुटुंब सुखी होतील व सर्वच जोडपी परस्पर पूरक असा सुखाचा संसार करताना दिसतील यात तिळमात्र ही शंका नाही.

# खरंच आपण प्रामाणिक आहोत ?

आधुनिक केसरी

लेखाचे शीर्षक वाचून काहींना आश्चर्य वाटले तर त्यात नवल नाही आणि काहींना शीर्षक वाचून आनंद झाल्याशिवाय राहणार नाही.फक्त गरज आहे ती प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारण्याची - खरंच का हो मी प्रामाणिक आहे का?

आणि केवळ प्रश्न विचारुन चालणार नाही तर प्रत्येकाने आत्मपरीक्षण करायचे आहे. भारताचा नागरिक या नात्याने आपण निःपक्षपाती पणे आत्मपरीक्षण करावे आणि आपण किती प्रामाणिक आहोत? हे ही तपासून पहावे. व्हॉट्सअप युनिव्हर्सिटीमध्ये व फेसबुकच्या कॉलेजमध्ये शिकलेले काही महाभाग सोशल मीडियावर विविध क्षेत्राबद्दल आपापले ज्ञान पाजळताना दिसतात.विना तर्कवितर्कांचे हे ज्ञान एवढ्या उच्च कोटीचे असते की ते वाचून किंवा ऐकून शेवटी वैतागून म्हणावे लागते की,'कहना क्या चाहते हो?'

सध्या भ्रष्टाचार व प्रामाणिकपणा बद्दल सोशल मीडियावर भरभरून लिहिले जात आहे. कोणाच्या काळात किती भ्रष्टाचार झाला?देशाला कोणी किती लुबाडले?हे सांगताना राजकीय नेते अजिबात थकत नाहीत.आम्ही सत्तेत आल्यावर सगळा देश कसा भ्रष्टाचारमुक्त झाला,लोक कसे प्रामाणिकपणाकडे वळले हे ढोल बडवून सांगितले जात आहे.परंतु, भारतातील भ्रष्टाचाराची वस्तुस्थिती फार वेगळी आहे आणि बहुतांश लोकांना प्रामाणिकपणा मुळीच आवडत नाही हे ही तितकेच खरे आहे.कारण भ्रष्टाचार ही आपल्या देशाला व समाजाला लागलेली किड आहे.आणि प्रामाणिकपणा कशा सोबत खातात?हे बऱ्याच लोकांना नीट माहीत नाही.देशावर सत्ता कोणाचीही असो काही मातब्बर राजकारणी लोक आपले दूर्गूण सोडून देत नाहीत! त्यामुळे भ्रष्टाचार हा संपता संपत नाही. आज घडीला भारतात किती राजकारणी लोक व नेते शुध्द व धुतल्या तांदळासारखे आहेत? आपल्या मतदार संघात जनतेची किती विकास कामे पार पडली? किती लोकांना चांगला व मनाजोगा कायमस्वरूपी रोजगार मिळाला?असा आत्मशोध कोणतेही राजकीय लोक कधी सवडीने घेत नाहीत.

उद्योगपती,कारखानदार,व्यापारी, नोकरदार आणि कॉन्ट्रॅक्टर यांचा कारभार स्वच्छ व प्रामाणिकपणाने ठासून भरलेला असतो असे ही काही नसते.आपलं पोट व आपल्या घरच्यांचे पोट ज्या उद्योग वा नोकरीने भरते तो उद्योग वा नोकरी प्रामाणिकपणे न करणे म्हणजे सुध्दा एक प्रकारचा भ्रष्टाचार समजला जातो.किती उद्योगपती,व्यापारी,कारखानदार व दुकानदार वेळोवेळी जीएसटी भरतात? किती नोकरदार दरवर्षी प्रामाणिकपणे आयकर भरणा करतात? किती नोकरदार नोकरीच्या वेळा अचूक पाळतात. आपण आपली नोकरी खरंच प्रामाणिक पणे करतो का?याचे आत्मपरीक्षण नोकरदारांनी केलेच पाहिजे.दर महिन्याच्या एका विशिष्ट तारखेला पगार नोकरदारांच्या खात्यावर जमा झाल्याचा मेसेज येतो.हा मेसेज वाचून चेहरा कसा आनंदाने खुलतो तसाच चेहरा दररोज नोकरी करुन घरी परतताना खुललेला असावा.

प्रामाणिकपणात ही शक्ती दडलेली असते हे कोणीही नाकारू शकत नाही.इतरही क्षेत्रात सगळं अलबेल आहे असे म्हणता येणार नाही. क्रिकेट व इतर खेळांमध्ये राजकारणाने प्रवेश केला आहे. आणि म्हणून अप्रामाणिकता खेळांमध्ये वाढली आहे. सेवानिवृतीनंतर एकमेकांवर आरोप करणारे खेळाडू प्रत्यक्ष खेळताना प्रामाणिक असतात का?अशी शंका येते. या जगात सगळेच वाईट असतात असे समजण्याचे कारण नाही. परंतु,भ्रष्टाचार न करणारे व प्रामाणिक लोक संख्येने फार कमी आहेत.अशा प्रामाणिक लोकांची संख्या वाढली पाहिजे.कितीही आमिष दाखविले तरी आपले प्रामाणिकतेचे तत्व न सोडणारे काही लोक आहेत.शेतकरी,मजूर, कामगार आणि देशाचे सैनिक हे प्रामुख्याने प्रामाणिक आहेत.ते आपले कर्तव्य कटाक्षाने बजावतात.हे लोक सोडले तर बाकीच्यांचे काय? इतरांच्या कार्याचे मूल्यमापन आपण नेहमी करत असतो.कधी काळी आपल्या कार्याचे मूल्यमापन आपणच केले आणि आपल्या कर्तव्यातील चूका दुरुस्त केल्या तर विलक्षण मानसिक आनंद मिळतो. आपले मूल्यमापन आपणच करताना,आपला प्रामाणिकपणा आपणच तपासताना कधी स्वतःला विचारा - खरंच मी प्रामाणिक आहे का?

बबन दामोदर गुळवे
मो.९७३०९३९७३२

# आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते 80 लाखांच्या कामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत 80 लक्ष रुपयांच्या निधीतून शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील सिमेंट काँक्रीटच्या रोडचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर कामाचे आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले. यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वैभव बोनगीरवार, सेवा निवृत्त प्राचार्य रविंद्र मेहेदंळे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी प्रणाली डहाटे, प्राचार्य आर. बी वानखेडे, बंडोपंत बोढेकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास केल्या जात आहे. दरम्यान येथील सिमेंट काँक्रीट रोडच्या बांधकामाची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडे करण्यात आली होती. सदर कामासाठी जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत 80 लक्ष रुपयांचा निधी देण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न केले होते. अखेर सदर कामासाठी 80 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या भुमीपूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना आकार देण्याचे काम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातुन केल्या जात आहे. येथुन निघणारा विद्यार्थी हा कौशल्य प्राप्त करुन निघतो. याचा त्याला रोजगार उपलब्धीसाठी उपयोग होतो. अश्या संस्था बळकट झाल्या पाहिजे. येथे सोई सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून शक्य ते सर्व सहकार्य करण्याची आमची भूमिका असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला प्राध्यापक आणि विद्यार्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आज पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे- २०२४ अंतर्गत दि.(३) मार्च रोजी पाच वर्षाच्या आतील बाळाला पोलिओ डोस पाजण्याचे आवाहन आरोग्य विभाग जिल्हा रूग्णालय नांदेडच्या वतीने करण्यात येत आहे.
अगोदर कितीही डोस दिले असले तरीही, बाळ नुकतेच जन्मलेले असले तरीही. जर बाळ आजारी असेल तर वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्याने पोलिओ डोस द्यावा. दोन थेंब प्रत्येक वेळी पोलिओ वर विजय दरवेळी या घोषवाक्याप्रमाणे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. बाळाच्या संपूर्ण सुरक्षिततेची खात्री करून घ्यावी व पोलिओचा डोस प्रत्येक वेळी द्यावी तरच पोलिओ वर मात करण्यासाठी देशाला मदत होईल असे क्लिप ही समाजमाध्यमांवर व्हायरल होतांना दिसत आहेत.पोलिओ दिवस राज्यातील सर्व जिल्हा व म.न.पा. मध्ये साजरा केला जाणार असून अधिक माहितीसाठी आशा,ए एन एम, अंगणवाडी कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.तसेच लोहा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.अब्दुल बारी डॉ .दीपक मोटे पाटील,डॉ.शीतल पानझडे, डॉ.भालके,डॉ. प्रशांत जाधव, डॉ.कुलदीपके, डॉ. सोनकांबळे,डॉ. बस्वराज लोहारे, डॉ. गजानन पवार,डॉ.दिनेश राठोड,डॉ. देशमुख यांनी पल्स पोलिओ मोहीमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# फुलंब्री शहरात हजरत जमाल शहा बाबा यांचा उरुस व संदल मिरवणूक उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंबी :** शहरात दिनांक 28 फेब्रुवारी रोजी हजरत जमाल शहा बाबा यांच्या उरुसा च्या निमित्ताने शहरातुन संदल मिरवणूक काढण्यात आली. यानिमित्ताने ढोल ताशे वाजवत व बैड बाजा वाजवत फुलंब्री शहरातील विविध भागातून मिरवणूक काढण्यात आली. नंतर रात्री संदल चढविण्यात आले. ही संदल मिरवणूक फुलंब्री परिवर्तन आघाडीचे अध्यक्ष तथा जेष्ठ नेते नफीस पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली व पत्रकार इम्रान खान यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली होती. नंतर दिनांक 29 फेब्रुवारी रोजी फटाक्यांची आतषबाजी करून कव्वाली सुरू करण्यात आली होती. व 1 मार्च रोजी पुन्हा कव्वालीचा जंगी मुकाबला करण्यात होता. यात जमाल शहा बाबा यांच्या उरुसा च्या निमित्ताने फुलंब्री शहर व तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हे सर्व कार्यक्रम उरुस उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. उरुस उत्सव समितीचे अध्यक्ष अजय गंगावणे व माजी नगरसेवक जफर चिश्ती यांच्या सहभागाने सर्व कार्यक्रम पार पडले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांनीही जमाल शहा बाबा यांच्या उरुसात चादर चढविण्यात आले.





# फुलंब्री येथे तालुकास्तरीय वैद्यकीय शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे आज दिनांक 2/3/2024 रोजी तालुकास्तरीय वैद्यकीय तपासणी तसेच अलीम को मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोजमाप शिबिराचे आयोजन घाटी रुग्णालय फुलंब्री या ठिकाणी करण्यात आले होते. त्याप्रसंगी फुलंब्री तालुक्याचे सन्माननीय गटशिक्षणाधिकारी आदरणीय धसवाडीकर मॅडम तसेच ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी महाजन साहेब व तालुका वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर खंडारे साहेब याप्रसंगी उपस्थित होते तसेच NRHM तज्ञ टीम व समग्र शिक्षा टीम यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. तालुकास्तरीय तपासणी शिबिरासाठी एकूण 83 दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. या शिबिरामध्ये एकूण 47 अति तीव्र असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार साहित्य वितरित करण्यात येणार आहेत.
सन्माननीय गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कॅम्प आयोजन करण्यात आलेले होते.

# मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा

## अखिल भारतीय जिवा सेनेच्या वतीने मुख्यमंत्र्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** विभागीय आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना पाठवलेल्या निवेदनात अखिल भारतीय जिवा सेना मराठवाडा विभाग यांच्या वतीने सन २०१३-२४ मधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची मागणी करण्यात आली आहे. मराठवाडयात मागील वर्षो सन २०२३ ते २०१४ या वर्षात भयानक दुष्काळ पडलेला होता. यावर्षी ऑगस्ट महिन्यात काही गावांना टँकरने पाणी पुरवठा गरजेचे झाले आहे. तर काही ठिकाणी टँकर चालू करावे लागत आहे. पूर्वीही पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न भयानक होता व आजही आहे. तसेच, शेती ही निसर्गावर आधारीत आहे. यावर्षी पाऊस खुपच कमी पडल्यामुळे शेतकरी वर्गाचा बि-बियाणे, खते, यांचा मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. परंतु पिक मात्र कोणत्याच प्रकारे शेतकऱ्यांच्या हाती लागले नाही. शेतीची नांगरणी, खते, बि बियाणे, शेतमजूर, त्यांची मजूरी, याचा खर्च सुध्दा निघाला नाही. तसेच, खरीप हंगामाचेही तेच झाले. त्यामुळे खुप मोठया प्रमाणात कर्ज झाले. या कर्जामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च पिक कर्जाचा खर्च, मुला-मुलींचे लग्न याच पिकांवर अवलंबून असते. शेताच पिकच नसल्यामुळे शेतकरी मोठया प्रमाणात हतबल झाला आहे.
आपल्या महाराष्ट्रात आणि भारतात ७०% लोकांचा व्यवसाय हा शेती हाच आहे. आणि पाऊस न पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती कोणत्याच प्रकारचे पिक लागले नाही. म्हणून सरकारने मराठवाडयात सन २०२२-२३-२०२४ मध्ये दुष्काळ जाहीर केला. परंतू, कोणत्याच प्रकारचे कर्ज माफ झाले नाही. तेव्हा शासनाने शेतक-यांचे कर्ज माफी करुन मराठवाडयातील सर्व शेतकऱ्यांना बि- बियाणांसाठी, खतासाठी, मजुरीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, याप्रकरणी ०८ दिवसाच्या आत निर्णय न घेतल्यास अखिल भारतीय जिवा सेना लोकशाही मागनि आंदोलन करेल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी. असे निवेदन विभागिय आयुक्त यांना देऊन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या पर्यंत ही मागणी पाठवून न्याय मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे . या निवेदनावर प्रा. राजकुमार गाजरे, नितीन मोहिते, मुंजाभाऊ भाले, दिनेश महाले, पंढरीनाथ ठोंबरे पाटील, रामेश्वर सवणे, योगेश रोजेकर, विनोदभाऊ मोहीते, किशोरभाऊ चव्हाण, साहेबराव शेळके, गणेश वैद्य, राजूशेठ छडीदार, राजेंद्र छडेदार यांच्या सह्या आहेत.



# व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने आज पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत योजना कार्ड वाटप

## आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते उद्या होणार उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** येथे उद्या रविवार दिनांक ३ मार्च रोजी धाराशिव शहरातील सांजा रोडवरील बीएसएनएल ऑफिस समोरील आर्यन फंक्शन हॉलमध्ये सकाळी ९ वाजता पत्रकारांचा अपघात व आयुष्यमान भारत योजना कार्ड वाटप होणारं आहे.
धाराशिव जिल्ह्यातील पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत कार्ड योजना वाटप करण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडियानेNगेल्या वर्षापासून प्रारंभ केला आहे. गतवर्षी या योजने अंतर्गत जिल्ह्यातील २५० पत्रकारांचा अपघात विमा उतरविण्यात आला होता. त्याची मुदत संपली असून यावर्षी या अपघात विमा बरोबरच आयुष्यमान भारत कार्डचे देखील वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून आमदार कैलास पाटील व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धिविनायक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर व व्हाईस ऑफ मीडियाच्या दिव्या भोसले आदी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम धाराशिव शहरातील सांजा रोडवरील बीएसएनएल ऑफिस समोरील आर्यन फंक्शन हॉलमध्ये सकाळी ९ वाजता होणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन वाईस ऑफ मिडियाच्यावतीने करण्यात आले आहे.

# अनंतराव पवार महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध पारंपरिक दिनांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** जिल्हा शिक्षण मंडळाचे अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट येथे दि. २१ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत विविध पारंपारिक दिनाचे आयोजन प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले. महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने कॅप डे आणि क्लिनिंग डे, ब्लॅक अँड व्हाईट आणि रीडिंग डे, मिस्समॅच डे, बॉलीवूड थीम डे, ट्वीनिंग डे, सारी आणि सलवार डे या पारंपरिक दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

कॅप डे या पारंपरिक दिनाचे औचित्य साधून प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांनी कॅप डे बरोबरच स्वच्छता दिन साजरा करावा अशी सूचना दिली. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रा. दत्तात्रय फटांगडे संत गाडगेबाबा यांचे विविध उदाहरणे देऊन स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. ब्लॅक अँड व्हाईट आणि रीडिंग डे साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी ब्लॅक अँड व्हाईट पोशाख परिधान केला होता. तसेच महाविद्यालयातील ग्रंथालयात वाचन दिन साजरा केला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध ग्रंथांचे वाचन केले. यावेळी सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. दत्तात्रय फटांगडे यांनी वाचनाचे महत्त्व विषद केले. वाचनाने माणूस जुना राहत नाही तो नवा होतो ह्या संकल्पनेसह विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा दिली. प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांनी यानिमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात आल्यावर ग्रंथालयात जाऊन वाचन केलेच पाहिजे. तसेच वाचनाने आपल्या ज्ञानात वाढ होऊन आपण व्यवस्थित जीवन जगू शकतो असे प्रतिपादन या निमित्ताने केले. तसेच मिस्समॅच डे, बॉलीवूड थीम डे, ट्वीनिंग डे, सारी आणि सलवार डे या पारंपरिक दिन विद्यार्थ्यांनी आनंदाने साजरे केले. ह्या सर्वच कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक सहभागी झाले. हे विविध दिन यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दत्तात्रय फटांगडे, प्रा. हेमंत उबाळे, डॉ. गणेश लोणकर, डॉ.किसन पालके, प्रा. अविनाश हुंबरे, प्रा. श्रीकांत देशमुख, डॉ. अभय पाटील, प्रा. सिद्धू नवतूरे, डॉ. मेघा पाटील, डॉ. प्रकाश पांगारे, प्रा. वैभव साळवे, प्रा. दिलीप सोनवणे, श्री. राजेंद्र शेळके, श्री. हेमंत वाईकर आदींनी परिश्रम घेतले.



# वैद्यकीय तपासणी, अलिमको मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य मोजमाप शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** घाटी रुग्णालय फुलंब्री या ठिकाणी तालुकास्तरीय वैद्यकीय शिबिराची सुरूवात महात्मा गांधी यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून शिबिर ची उदघाटन प्रसंगी फुलंब्री तालुक्याचे तालुका वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर खंडारे, डॉक्टर निती मस्के, डॉक्टर ताटे, NRHM तज्ञ टीम व समग्र शिक्षा अभियान टीम यांनी अभिवादन करून तालुकास्तरीय वैद्यकीय तपासणी शिबिर घेण्यात आले होते. तपासणी शिबिरासाठी एकूण 83 दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते शिबिरार्थी साठी अल्पोपाहार ची व्यवस्था करण्यात आली होती. या शिबिरामध्ये एकूण 47 अति तीव्र असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार साहित्य वितरित करण्यात येणार आहे. आसे गटशिक्षणाधिकारी धसवाडीकर मॅडम यानी म्हटले व याच्याच मार्गदर्शनाखाली सदर कॅम्प आयोजन करण्यात आलेले होते.हया शिबिर साठी तालुक्यातील दिव्यांग विधारथी पालकांकडून चांगल प्रतिसाद मिळाला असून कॅम्प यशस्वी करण्यासाठी फुलंब्री तालुक्यातील समग्र शिक्षा अभियान टिमने परिश्रम घेतले.

# आर्टीची स्थापना : लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने मिठाई वाटप करून निर्णयाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील मातंग समाजाचा शैक्षणिक, सामाजिक विकास व्हावा, यासाठी बार्टीच्या धरतीवर अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्था स्थापन व्हावी या मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनाचे महाराष्ट्र युवा आघाडी प्रमुख अ‍ॅड. दत्तराज गायकवाड यांनी बार्टी संचालक कार्यालय पुणे येथे दि. १३ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२३ एकूण २६ दिवस बेमुदत धरणे आंदोलन केले होते. या आंदोलनात सुदर्शन मसुरे, प्रा. समर्थकुमार कांबळे, तुकाराम कांबळे, परमेश्वर बिजले, अनिलकुमार सुर्यवंशी, मच्छिंद्र कांबळे, माधव केदासे यांचेही सहकार्य होते. त्यावेळी बार्टीचे तत्कालीन संचालक धम्मज्योती गजभीये यांनी आर्टीची स्थापना करण्यात येईल असे आश्वासित केले होते. म्हणून धरणे आंदोलन दि. ११ मार्च २०२३ रोजी स्थगित केले होते. तसेच विद्यमान संचालक सुनिलकुमार वारे यांनीही या संदर्भात सकारात्मक भुमिका घेतली होती. त्याचप्रमाणे सकल मातंग समाजाच्या वतीने मुंबई येथील जबाब दो आंदोलनातही हीच प्रमुख मागणी होती. या मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनासह महाराष्ट्रातील अनेक मातंग संघटनांनी आक्रमक आंदोलने केली होती. म्हणून आज दि. २७/०२/२०२४ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र सरकारने अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा केली आहे. परंतु ही घोषणा लोकसभा निवडणुकीमध्ये मते मिळविण्यासाठी केलेले आश्वासन ठरू नये. त्याचप्रमाणे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबीत एस. सी. आरक्षण वर्गीकरणाची मागणी व क्रांतीगुरु लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या मंजूर शिफारशींची अंमलबजावणी येत्या काळात करण्यात यावी असे आवाहन लोकस्वराज्य आंदोलनाचे सचिव नामदेव गायकवाड, मराठवाडा अध्यक्ष प्रा. बी. आर. पारसकर, जिल्हा अध्यक्ष अतुल खंडगावकर, जिल्हा सचिव हनुमंत नामाकार, जेष्ठ सामाजिक कार्यकते दशरथ मानवतकर, वाय. वाय. सुर्यवंशी, दत्ता पवार, जेजेराव मोरे, प्रकाश नन्नोरे, माधव नामेवार इत्यादींनी केले आहे.

# चंद्रपूरच्या 'भारतमाता' शब्दाची गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

## गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा वन विभाग एकामागून एक यशाचे टप्पे गाठत आहे. आतापर्यंत वनविभागाने चार लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड केले. आता 65724 रोपट्यांपासून 'भारतमाता' या शब्दांची निर्मिती करून वनविभागाने गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून वन विभागाने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

चंद्रपूर येथे वनविभागाच्या वतीने 1 ते 3 मार्च या कालावधीत 'ताडोबा महोत्सव 2024' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत वेगवेगळ्या प्रजातींच्या रोपट्यांपासून 'भारतमाता' हा शब्द लिहून वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा संकल्प वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला होता. हा संकल्प आज (शनिवारी) चंद्रपुरातील रामबाग येथे प्रत्यक्षात साकारण्यात आला. 26 प्रजातींच्या तब्बल 65724 रोपट्यांनी 'भारतमाता' या शब्दाची निर्मिती केली आणि गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्राप्त केले.

यावेळी बोलताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'आतापर्यंत वन विभागाने चार लिमका रेकॉर्ड केले. आता मात्र प्रथमच राज्याच्या वनविभागाने गिनेस बुक ऑफ वर्ड रेकॉर्ड केला आहे. यासाठी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व वन अधिकारी, वन कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. चंद्रपुरात 65724 रोपट्यांनी लिहिलेल्या 'ग्रीन भारतमातेचा' संकल्प संपूर्ण जगभरात पोहचला असून ही आमच्यासाठी केवळ एक फोटो फ्रेम नसून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा महामार्ग आहे.' कार्यक्रमाला वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव) तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिप गुप्ता, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड टीमचे स्वप्नील डांगरीकर, वनअधिकारी प्रशांत खाडे, मिलिंद वेर्लेकर आदी उपस्थित होते.

ग्रीन भारतमातेच्या शब्दातील सर्व रोपट्यांचे चंद्रपूर येथे गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या नावाचे वनविभागाने एक चांगले उद्यान त्वरीत साकारावे. तसेच आज मिळालेले प्रमाणपत्र हे तेथे दर्शनी भागात लावावे. विशेष म्हणजे ही रोपटे सुध्दा नवनिर्मित उद्यानामध्ये 'भारतमाता' याच शब्दाप्रमाणे लावावीत, अशा सुचनाही त्यांनी केल्या. यापुढेही राज्याचा वनविभाग असाच अग्रेसर राहणार असून या विभागाच्या प्रगतीमध्ये कोणतीही अडचण येऊ देणार नाही. वनविभागासोबत नागरिकांनी असेच आशिर्वाद आणि शुभेच्छा कायम ठेवाव्यात, असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

# विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या मागणीला यश

## कृषी सेवा परीक्षेतील उमेदवारांना नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा मधून उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनाकडे केली होती. या उमेदवारांना अनेक दिवसांपासून नियुक्ती न दिल्याने ते आझाद मैदानात बेमुदत आंदोलनाला बसले होते. या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश तात्काळ द्यावेत, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली केली होती. श्री. वडेट्टीवार यांच्या मागणीला यश आले असून निवड झालेल्या उमेदवारांनी श्री. वडेट्टीवार यांचे आभार मानले आहेत. कृषी सेवा परीक्षेतील शिफारस केलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या रखडल्याने या उमेदवारांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले होते. वडेट्टीवार यांनी केलेल्या मागणीमुळे नियुक्तीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित झाला आहे. यामुळे उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. नियुक्त्या रखडल्यामुळे अनेक जिल्ह्यात कृषी अधिकारी पदाच्या जागा रिक्त होत्या. यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत होती. शेतकरी संकटात आहे. या परिस्थितीत नियुक्त्या वेळीच करणे अपेक्षित होते, अशी प्रतिक्रिया देत निवड झालेल्या उमेदवारांचे श्री. वडेट्टीवार यांनी अभिनंदन केले आहे.

# मुनगंटीवार यांच्यामुळे ताडोबा पाहायचा योग

## ज्युलिया मॉर्ले : चंद्रपूरच्या 'ताडोबा महोत्सवात' विश्वसुंदरींनी दिला व्याघ्र संवर्धनाचा संदेश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'मिस वर्ल्ड'स्पर्धेच्या संस्थापक ज्युलिया मॉर्ले यांच्यासह जगातील विविध देशातून आलेल्या विश्वसुंदरी स्पर्धेच्या अंतिम फेरीतील सौंदर्यवती चंद्रपुरातील ताडोबाच्या चांगल्याच मोहात पडल्या. चंद्रपुरातील व्याघ्र संवर्धनाचा मूलमंत्र आपापल्या देशात घेऊन जाण्याचा निर्धार करीत पुन्हा एकदा ताडोबाला भेट देण्याची इच्छाही व्यक्त केली.
राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढकारातून तीन दिवसीय 'ताडोबा महोत्सव 2024'चे आयोजन करण्यात आले आहे.
कार्यक्रमाला वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह वन्यजीव सद्भावना दूत प्रसिद्ध सिनेअभिनेत्री रविना टंडन, विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक विरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण चव्हाण, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आदी उपस्थित होते. ज्युलिया मॉर्ले म्हणाल्या, 'ताडोबा व्याघ्र प्रकल्पात अतिशय सुदंर वाघ आहेत. वाघांना वाचविले तरच आपण आपले पर्यावरण आणि सृष्टीचे भविष्य सुरक्षित करू शकतो.' वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आमंत्रित केल्याबद्दल मॉर्ले यांनी आभार मानले.
जमील अजमल सैद्दी म्हणाले, 'वनमंत्री आणि चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे ताडोबा पाहण्याचे सौभाग्य लाभले. ताडोबा एक वरदान आहे. त्यामुळे प्रत्येक वृक्षाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. वन हेच जीवन आहे, असे मानून आपले भविष्य सुरक्षित करा. 2015 मधील 'मिस इंडीया' नवीनी देशमुख म्हणाल्या, 'वाघ हे दुर्गामातेचे वाहन आहे. वाघ धैर्याचे प्रतिक आहे. पर्यावरणाच्या संवर्धनाकडे आपले दुर्लक्ष झाले म्हणून प्रदूषण वाढले आहे. त्यामुळे पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.' विश्वसुंदरी स्पर्धेतील कॅरोलिना व्हेरिस्का म्हणाल्या, 'वाघांचे संरक्षण या प्रकल्पाबद्दल ऐकून खूप आनंद झाला. येथे कुटुंबासह वाघ बघण्याचा योग आला. वाघ हा सृष्टीच्या जीवनचक्राचा महत्वाचा भाग आहे. सन 2021 आणि 2022 मधील मिस इंडिया सिनी शेट्टी म्हणाल्या, चंद्रपुरात येऊन आज अतिशय आनंद झाला. वाघांचे संरक्षण या प्रकल्पासाठी काम करण्याची संधी मिळाली. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प अतिशय सुंदर पर्यटन स्थळ आहे.' ऑस्ट्रेलियाच्या क्रिस्टिन लाइज यांनी 'सेव्ह द टायगर प्रोजेक्ट' ही अतिशय महत्वाची आणि तेवढीच सुंदर संकल्पना असल्याचे म्हटले. इंग्लडच्या जेसिका म्हणाल्या, 'येथे येऊन स्वतःला भाग्यशाली समजत आहे. या कार्यक्रमाचा आम्ही एक भाग बनू शकलो, याचा आनंद आहे. स्पेनच्या पोला म्हणाल्या, वाघ हे धैर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतिक आहे. जैवविविधतेसाठी वाघ महत्वाचा घटक असून अशा उपक्रमातून पर्यावरणाचे संरक्षण होईल.'



**पटनायक यांचा सॅण्ड आर्ट शो :** प्रसिद्ध वाळू शिल्पकार सुदर्शन पटनायक आणि त्यांच्या चमूने सॅण्ड आर्ट शो मधून 'वाघ वाचवा' असा संदेश दिला. यावेळी त्यांनी वाळूचे अतिशय उत्कृष्ट शिल्प साकारले. उपस्थितांनीही त्यांच्या कलाकृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
**पुस्तकांचे प्रकाशन :** वनमंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जैवविविधता मॅप ऑफ ताडोबा कॉफी टेबल बुक, ताडोबा डायरीज, प्रमुख गवत प्रजाती, सी.एस.आर. बुकलेट, ट्रिज ऑफ मेळघाट, महाराष्ट्रातील वने आणि वनवार्ता या न्यूज लेटरचे प्रकाशन करण्यात आले.

# टाकळी राजेराय येथे आज कुस्तीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे टाकळी राजेराय येथे कुस्ती आखाडाचे आयोजन करण्यात आले आहे. कुस्ती मैदान येथे दि.३मार्च रविवार रोजी अकरा वाजता कुस्त्यांना सुरुवात होईल.कुस्त्या संदर्भात टाकळी राजेराय नामांकित गाव असुण आनेक नामांकित पैलवान या गावांनी दिले आहे. पुढे भविष्यात अनेकानेक पैलवान निर्माण व्हावे, शरिर बलवान राहवे.तरुण युवक कुस्तीकडे आकर्षीत व्हावे यासाठी प्रतिवर्षी कुस्ती आखाडाचे आयोजन करण्यात येते. वस्ताद मच्छिंद्र वर्दे, इक्बाल पटेल व सहकारी यात विशेष सहभाग घेतात. कुस्ती प्रेमी पैलवान बाबा पटेल महाराष्ट्र पोलीस हेही कुस्ती संदर्भात सक्रिय सहभाग नोंदवतात. त्यामुळे कुस्ती स्पर्धा प्रतिवर्षी चालु ठेवतात यासाठी पंचक्रोशीतील पैलवान यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन कुस्ती प्रेमीकडून करण्यात आले आहे.

# एटीएम फोडले, २१ लाख लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** एटीएम मशीन बाहेर असलेल्या 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यावर चोरट्यांनी काळा स्प्रे मारून गॅस कटरने एटीएम मशीन फोडून सुमारे २१ लाखांची रोकड लंपास केली. ही घटना शहरातील दाते कॉलेज चौकात शुक्रवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. हरियाणातील सराईत टोळीने हे कृत्य केल्याची शंका पोलिसांनी व्यक्त केली.
पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील दाते कॉलेज चौकात स्टेट बँक ऑफ इंडियाची एटीएम मशीन आहे. या एटीएम मशीनची देखरेख आणि मेन्टनस विवेक भालेराव या कर्मचाऱ्याकडे असून, तो महिन्यातून एकदा भेट देत होता. तीन दिवसापूर्वीच २७ फेब्रुवारीला या एटीएममध्ये कॅश टाकण्यात आली होती. अशातच शुक्रवारी पहाटे अज्ञात चोरट्यांनी या एटीएम बाहेर असलेल्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यावर काळा स्प्रे मारून आत प्रवेश केला. त्यानंतर गॅस कटरच्या सहायाने एटीएम मशीन फोडून जवळपास २१ लाखांची रोख लंपास केली. ही बाब दुपारी परिसरातील नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर याबाबतची माहिती मिळताच देखरेख करणाऱ्या कंपनीचा कर्मचारी विवेक भालेराव याने त्या ठिकाणी येऊन पाहणी केली. याबाबतची माहिती अवधुतवाडी पोलिसांना देण्यात आली घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वैजने, पोलीस निरीक्षक ज्ञानोबा देवकते, सहायक पोलीस निरीक्षक रामकृष्ण भाकडे, धैर्यशील घाडगे, एलसीबीतील विवेक देखमुख यांच्यासह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# आपली मुले रील्स स्टार करायची की रिअल स्टार हे पालकांनी ठरवावे

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** प्रत्येक पालकांच्या हातात मोबाईल,हॉल मध्ये टीव्हीवर असल्यामुळे मुलां मुलीं नाही रिल्स पाहण्याचा मोह आवरत नाही त्यामुळे आपले मुले रिल्स स्टार करायची की रियल स्टार हे पालकांनी ठरवावे असे प्रतिपादन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने दिनांक 29 फेब्रुवारी रोजी आयोजीत करण्यात आलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमा प्रसंगी प्रा यशवंत गोसावी यांनी सांगितले. जिंतूर शहरातील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने 19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी यात शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या समारोप प्रसंगी जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून तहसीलदार राजेश सरोदे हे होते तर उदघाटक म्हणून पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ गणपत वाघमारे, डॉ. दुर्गादास कान्हडकर, सत्यनारायण शर्मा, रमेश दरगड,विजय चोरडिया, शेख शकील, मंचक देशमुख, डॉ. योगेश तुरे हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना गोसावी यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महिला मुलींचा आदर केला जात असे शिवाय शेतकऱ्यांसाठी त्याकाळी लोककल्याणकारी निर्णय घेतले होते परंतु सध्या राजकीय लोकांच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आली आहे म्हणून पालकांनी आपल्या पाल्याला उच्च शिक्षणासाठी व समाजात वावरताना छत्रपती महाराजांचा आदर्श डोळ्या समोर ठेवला पाहिजे असे प्रतिपादन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष काकडे यांनी केले यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.



**छत्रपती लेझीम चषक बक्षीस वितरण :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणूक शालेय विद्यार्थ्यांसाठी लेझीम चषकाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्राथमिक व माध्यमिक गट करण्यात आले होते यामध्ये माध्यमिक गटातून जवाहर विद्यालयास प्रथम एकलव्य बाल विद्या मंदिर द्वितीय तर कस्तुरबा गांधी विद्यालयास तृतीय पारितोषिक मिळाले तर प्राथमिक गटातील किशनराव चव्हाण विद्यालय प्रथम ऑर्किड इंग्लिश स्कूल द्वितीय तर सुभाषचंद्र राठी बालक मंदिर शाळेला तृतीय पारितोषिक देण्यात आले पारितोषिकात प्रथम रोख 4394 सन्मानचिन्ह व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तर द्वितीय 3394 रुपये रोख सन्मानचिन्ह प्रमाणपत्र तर तृतीय 2394 रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



# घोडेगावला सत्यमेव जयते, फार्मर कप-2023 चा राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथील आई जिजाऊ महिला शेतकरी गटाला सत्यमेव जयते फार्मर कप-२०२३ चा संयुक्त द्वितीय पुरस्कार मिळाला असुण सर्वत्र गटाचे कौतुक अभिनंदन स्वागत होत आहे. तर जिजाऊ महिला शेतकरी गट घोडेगाव व्दितीय क्रमांक आल्याबद्दल त्यांचे गावाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा उप अध्यक्ष तथा पर्यावरण लोककल्याण व वन संरक्षण संस्था खुलताबाद तालूका अध्यक्ष प्रा.संदिप भाऊसाहेब पा.जाधव,आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव विजय बंडू पा.जाधव, माजी उपसरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष दादासाहेब पा.जाधव, ज्ञानेश्वर पा.जाधव, गावातील जेष्ठ नागरिक कडूबा पा.जाधव,अण्णा पा.जाधव,माजी उप सरपंच मच्छिंद्र पा.जाधव,गणेश पा.आधाणे,या वेळे सरपंच,उप सरपंच , ग्रामपंचायत सदस्य, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय दिव्य स्मृती भवनचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** 29 फेब्रुवारी 2024 गुरुवार रोजी प्रजापती ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय दिवस स्मृती भवनाच्या उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून ब्रह्माकुमारीजच्या संयुक्त मुख्य प्रशासिका राज योगिनी ब्रह्माकुमारी संतोष दिदी जी उपस्थित होत्या. त्यांच्या कर-कमलाद्वारे फीतकापून दिव्य स्मृती भवनचे उद्घाटन करण्यात आले त्यानंतर दीदीजीच्या शुभहस्ते शिव ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आदरणीय दीदी जींनी दिव्य स्मृतीचा अर्थ सांगितला. पुढे त्या म्हणाल्या जशी आपली स्मृती असते तसेच आपली समर्थी असते आपली स्मृती आपले विचार हेच जीवन परिवर्तनाचा आधार आहे. ज्याप्रमाणे लंकेमध्ये जाण्याआधी हनुमंताला जामवंतांनी स्मरण करून दिले हनुमंताची स्मृति जागृत करवली आणि हनुमंतामध्ये शक्तीचा दिव्य संचार झाला व हनुमंताने मा सितेचा शोध लावला अशाच प्रकारे परमात्मा येऊन आपली स्मृती जागवण्याचं कार्य करीत आहे. आपण सुद्धा या भवन मध्ये येऊन राज योगाचा अभ्यास करून आपल्या विचारांच परिवर्तन करावे आपले स्मृती जागृत करावी असे आवाहन सर्वश्रोत्यांना त्यांनी केले.

या कार्यक्रमासाठी बुरानपुर झोन इन्चार्ज आदरणीय मंगला दीदीजी सुद्धा उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार माननीय श्री कृष्णराव इंगळे, सौ अपर्णाताई कुटे माजी नगराध्यक्षा डॉक्टर सौ स्वातीताई वाकेकर, सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉक्टर दलाल साहेब उपस्थित होते या सोबतच ब्रह्माकुमारीज सेवा केंद्राच्या वेगवेगळ्या ठिकाणावरून आलेल्या 21 दिदिंचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात सुरुवातीला सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत सन्मान करण्यात आला त्यानंतर कुमारी प्रणाली कुमारी शिवानी कुमारी पूजा कुमारी जयश्री कुमारी सृष्टी कुमारी अश्विनी यांनी आपले स्वागत व इतर नृत्यगीत सादर केलेत. त्यानंतर बुलढाणा सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगिनी उर्मिलादीदींनी शब्दसुमनांनी सर्वांचे स्वागत केले . मान्यवरांमध्ये माजी आमदार श्री कृष्णराव इंगळे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे आपण सुद्धा गेल्या 35 वर्षापासून हीच सेवा करत आहात जळगाव मध्ये सुरुवातीला तीन खोल्यांचा सेंटर होते आणि ते आज एवढे भव्य दिव्य तीन मजली झाले हे आपल्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. मी माउंट आबुला जाऊन आलो माझ्यामध्ये एक उमंग उत्साह संचारला जीवन जगण्याची नवी दिशा मला मिळाली आपण सर्वांनी सुद्धा या दीदींकडून ज्ञान घेऊन आपली आध्यात्मिक प्रगती करावी असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर इतर मान्यवरांनी सुद्धा विचार व्यक्त केले व सर्वांनी या भवनमध्ये यावे व मनःशांती प्राप्त करावी अशा शुभ भावना शुभकामना व्यक्त केल्या त्यानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांना राजयोगिनी ब्रह्माकुमारी संतोष दीदी जींच्या शुभहस्ते भेटवस्तू व प्रसाद वितरण करण्यात आला.

# मानवी जीवन, सृष्टीच्या संरक्षणासाठी व्याघ्र संवर्धन गरजेचे : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

## तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचे थाटात उद्घाटन



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'वाघ तिथे वन आहे....वन तिथे जल आहे....जल तिथे मानव सृष्टी आहे.' पर्यावरणाच्या जीवनचक्राचा महत्वाचा घटक असलेला वाघ वाचला तरच जंगल आणि जीवनसृष्टी वाचेल. त्यामुळे मानवी जीवन आणि सृष्टीच्या संरक्षणासाठी आपण सर्व जण एकत्र येऊन वाघ वाचविण्याचा संकल्प करूया, असा संदेश राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

महाराष्ट्र शासन आणि वन विभागाच्यावतीने चंद्रपूर येथे तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा वनबलप्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक विरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण चव्हाण, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आदी उपस्थित होते.

देश-विदेशातील पर्यटकांमध्ये सर्वात लोकप्रिय असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातर्फे वन्यजीव संरक्षण, शाश्वत पर्यटन आणि स्थानिक वारसा यांना चालना देण्यासाठी तीन दिवसीय 'ताडोबा महोत्सव 2024'चे आयोजन करण्यात आले आहे, असे सांगून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'ताडोबा महोत्सव' शाश्वत विकासाला चालना देत आपला नैसर्गिक वारसा जतन करण्यासोबतच वन्यजीव संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. सर्वांना संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सहभागी करून घेत आम्ही केवळ आमच्या मौल्यवान जैवविविधतेचे रक्षणच करीत नाही तर स्थानिकांसाठी आर्थिक प्रगतीच्या संधीही निर्माण करतो. दोन दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे कौतुक केले. चंद्रपूर जिल्ह्याला आंतरराष्ट्रीय शोकेसमध्ये नेण्याचा हा प्रयत्न आहे. पुढे वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले, सिंगापूरच्या धर्तीवर आता चंद्रपुरात सफारी सुरू करण्यात येईल. यात न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियाचे प्राणी बघायला मिळतील. विशेष म्हणजे सफारी करताना आपण पिंजऱ्यात तर आपल्या आजुबाजूला मोकळ्या वातावरणात वन्यजीव राहतील, असे नियोजन करण्यात आले आहे. ताडोबा हे जगातील सर्वात उत्तम व्हावे, असा प्रयत्न आहे. गत काळात वृक्षलागवडीतून राज्यात 2 हजार 550 चौरस किलोमीटर हरित आच्छादन वाढले आहे. याचा सर्वांना अभिमान आहे. ताडोबा महोत्सवात तीन दिवस विविध महत्वाच्या विषयांवर चर्चासत्र, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी आहे, नागरिकांनी या उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही वनमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

तत्पूर्वी दीप प्रज्वलन आणि आदिवासी नृत्याने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी बल्लारपूर येथील जयशिवराय ग्रुपने वाघ नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी ताडोबा प्रकल्पाविषयी तसेच या आयोजनामागची भूमिका विशद केली.

# ॲडव्हांटेज चंद्रपूर 'इंडस्ट्रिअल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे 4 मार्च रोजी उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा प्रशासन आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'ॲडव्हांटेज चंद्रपूर 2024 - इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे उद्घाटन सोमवार दि. 4 मार्च रोजी होणार आहे.

चंद्रपूर वन अकादमी येथे सकाळी 11 वाजता होणा-या या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे व राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार राहतील. पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या 'ॲडव्हांटेज चंद्रपूर 2024' ला उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र सरकार आणि एमएसएमई मंत्रालय, भारत सरकारचे सहकार्य लाभले आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचे सामर्थ्य प्रदर्शित करतानाच या जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती देणे, पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळाच्या बाबतीत चंद्रपूर आणि आसपासच्या प्रदेशाच्या मागासलेपणाबद्दलचे गैरसमज दूर करणे आणि उद्योग तज्ञांचे मार्गदर्शन देऊन स्थानिक व्यवसाय, उद्योजक, गट यांना सहाय्य करणे ही या आयोजनामागची प्रमुख उद्दिष्टे आहे.

विविध सत्रांचे आयोजन : दि.4 मार्च रोजी वन अकादमी येथील प्रभा सभागृहात दुपारी 2.30 वाजता 'आर्यन अँड स्टील' विषयावर तर दुपारी 4.30 वाजता 'मायनिंग अँड कोल' विषयावर तसेच सिद्धांत हॉलमध्ये दुपारी 2.30 वाजता 'अल्टरनेटीव्ह एनर्जी सोर्सेस' या विषयावर आणि दुपारी 4.30 वाजता होणा-या 'ॲग्रीकल्चर अँड अलाइड सेक्टर्स' या विषयावर चर्चासत्र आयोजित आहे.

5 तारखेला प्रभा हॉलमध्ये सकाळी 10.30 वाजता 'एफआयडीसी अँड बांबू' व दुपारी 12.30 वाजताच्या 'बांबू इंडस्ट्री' या विषयावर, दुपारी 3.00 वाजता 'एज्युकेशन अँड स्कील डेव्हलपमेंट' या विषयावर, सिद्धांत हॉलमध्ये सकाळी 10.30 वाजता 'फायनान्स अँड स्टार्टअप' दुपारी 12.30 वाजता 'सर्क्युलर इकॉनॉमी' वर तर दुपारी 3.00 वाजता होणा-या 'सिमेंट अँड लाईमस्टोन' या विषयावर चर्चासत्र होणार आहे. सायंकाळी 6.30 वाजता विपिन पालिवाल यांचे मोटिव्हेशनल टॉक होईल.

या मेगा एक्स्पोला महाराष्ट्र आणि उर्वरित भारतातून तसेच परदेशातील व्यापारी, उद्योगपती, उद्योजक, नोकरी-उत्सुक, एमएसएमई, व्यवसाय, उद्योग तज्ञ आदींची उपस्थती राहणार आहे.

# नक्कल करणारे दोन जण पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता दहावीच्या परीक्षेला शुक्रवारपासून सुरवात झाली. पहिल्याच दिवशी मातृभाषा असलेल्या मराठीची प्रश्नपत्रिका सोडवताना नाशिक विभागात नक्कल करताना दोन जणांना पकडण्यात आले. नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील ही प्रकरणे आहेत. विभागातून दहावीच्या परीक्षेसाठी एक लाख ६० हजार विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. नाशिक जिल्ह्यात ५९ परीक्षा केंद्र असून दोन हजार ८०२ शाळांमध्ये परीक्षा सुरू आहे. परीक्षा काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा केंद्राजवळ असलेल्या पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली असून गस्ती पथकांनाही आवश्यक सूचना करण्यात आल्या आहेत. शुक्रवारी सकाळी परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांसह पालकांनी गर्दी केली होती. मराठी विषय असल्याने लिखाणासाठी वेळेचे नियोजन व्यवस्थित करा, प्रवेशपत्र आणले का, एकापेक्षा जास्त पेन बरोबर ठेवा, अक्षर चांगले काढा, यासह अन्य सूचनांचा मारा पालकांकडून विद्यार्थ्यांवर करण्यात येत होता. दरम्यान, नाशिक तसेच जळगाव जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे नक्कल करण्याची दोन प्रकरणे घडली. मंडळाच्या वतीने सातत्याने कॉपीमुक्त परीक्षा, गैरमार्गाशी लढा अशा विविध माध्यमातून मुलांच्या मनातील परीक्षेविषयी असणारी भीती कमी करण्याचा प्रयत्न होत असला तरी गुणांच्या शर्यतीत टिकाव लागण्यासाठी विद्यार्थ्यांकडून नक्कल करण्याचा मार्ग पत्करला जात असल्याचे मराठी विषयाची प्रश्नपत्रिका सोडवितानाही दिसून आले.

# कृष्ण तारा इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कृष्ण तारा इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा योगीराज सोमवंशी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी भूषण पुरस्कार विजेते डॉ सिताराम जाधव मा.नगराध्यक्ष संतोषजी कोल्हे व जिजामाता परिवाराचे सचिव श्री सागर जाधव सर यांची प्रमुख उपस्थिती होती, मान्यवरांच्या हस्ते विद्येचे आराध्य दैवत माता सरस्वती व शिक्षण महर्षी स्व के के जाधव सर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आपले मनोगत व्यक्त करताना सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिजामाता परिवार सदैव तत्पर असल्याचे सांगितले यावेळी जिजामाता परिवाराच्या वतीने कृषी भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.सीताराम जाधव सर तसेच जिल्हा परिषद शिक्षिका म्हणून नियुक्ती मिळाल्याबद्दल श्रीम. स्वाती अहिरे प्रीती चव्हाण यांचा तसेच विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसहित सचिव सागर जाधव सर व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्या श्रीमती स्वाती विशाल सोनवणे मॅडम यांच्या मार्गदर्शनानुसार शालेय विद्यार्थ्यांनी जुनं ते सोनं या विषयानुसार सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक एका पेक्षा एक सुंदर नृत्यांचे प्रदर्शन करून उपस्थित मान्यवरांचे पालकांचे मने जिंकली कार्यक्रमासाठी डॉ सदाशिव पाटील, उद्योजक संजय भारुका उमेश नटानी, धीरज अग्रवाल, आबेद अली संदीप चव्हाण, अविनाश भोसले, नितीन येवले, योगेश लांडगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगिता गांगुर्डे संगीता गिरी सीमा राठोड प्रियंका हेकडे प्रियंका देवरे दिपाली पवार प्रियंका राठोड सुभाष जाधव संतोष आग्रे यांनी अनमोल अशी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला कोलते व दुर्गा गिरी मॅडम यांनी केले व प्रीती मोरे मॅडम यांनी सर्व उपस्थित मान्यवर व पालकांचे आभार व्यक्त केले.



# प्रदर्शनातून दिसून येते विद्यार्थ्यांची गुणवत्ता

## गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर

आधुनिक केसरी न्यूज

**भद्रावती :** विद्यार्थी कसे आहेत,वर्षभर त्यांनी काय केलं, त्यांना कसा सराव देण्यात आला हे विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून दिसून येतो आणि खरोखर विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली किंवा नाही हे त्यांच्या प्रदर्शनीतून दिसून येते असे उदगार पंचायत समिती भद्रावतीचे गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर यांनी केले. ते आज नंदोरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थी प्रदर्शनात बोलत होते.

या प्रदर्शनात गणित विषयांत अपूर्णांकांचे वेगवेगळे मॉडेल आणि भाषा विषयात आपल्या स्वतःच्या अनुभवातील छोट्या छोट्या गोष्टी लिहून विद्यार्थ्यांनी त्याचे पुस्तक तयार केले आणि त्या पुस्तकातील गोष्टीमधील पात्र, स्थळ, काळ, समस्या आणि उपाययोजना क्रमवार पद्धतीने प्रदर्शनी पाहायला आलेल्या पाहुण्यांसमोर निर्भीडपणे सांगितल्या, हा कौतुकास्पद प्रदर्शन सोहळा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नंदोरी बु. येथे सिखे मुंबईच्या माध्यमातून टीचर इनोव्हेटर कार्यक्रमांतर्गत घेण्यात आला. भद्रावती तालुक्यात सिखे इंडिया उत्सव कार्यक्रम जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू आहे. यात भाषा आणि गणित विषयांचे मॉडेल विद्यार्थी तयार करून त्याचे प्रदर्शन भरवीत असतात. नंदोरी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी भाषा विषयात विविध गोष्टी लिहून स्वहस्ताक्षरात पुस्तक तयार केले. त्याचे प्रदर्शन भरवले आणि प्रदर्शन पाहणाऱ्या गावकरी आणि पालकवर्गाला तयार केलेल्या आपल्या कथा गोष्टी स्वतःच्या भाषेत सांगितल्या. सीखे इंडिया अंतर्गत असलेल्या TIP कार्यक्रम प्रदर्शनाचा शुभारंभ गट शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. त्यानंतर प्रदर्शनात गट शिक्षणाधिकारी, सहभागी पालक तसेच गावकरी मंडळींना विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पुस्तकातील गोष्टी निर्भीडपणे सांगितल्या. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी गणिताचे मॉडेल व भाषा विषयाचे स्वहस्ताक्षरित पुस्तके तयार केली.गावातील माता पालक समिती शाळा व्यवस्थापन समिती आणि सर्व पाहुण्यांनी शाळेत येऊन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गोष्टीचे पुस्तक पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी पालकवर्गानी विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारले आणि विद्यार्थ्यांनी त्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. आपल्या मुलांचा आत्मविश्वास बघून सर्व पाहुण्यांना आनंद झाला. मागील तीन वर्षापासून भद्रावती तालुक्यात टीचर इनोव्हेटर कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत शिक्षकांना भाषा आणि गणित विषयाच्या विविध पद्धतींचे सिखे संस्थेमार्फत प्रशिक्षण दिल्या जाते. आणि त्यानंतर वर्षभर या शिक्षकांना कोचिंग केले जाते. विद्यार्थी या सर्व पद्धतीचा सराव त्यांना दिलेल्या कार्यपुस्तिकेत करत असतात. वर्षाच्या शेवटच्या सत्रात शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत घेतलेल्या या पद्धतींचे वेगवेगळे मॉडेल बनवून प्रदर्शित करतात. याच आधारावर आज नंदोरी शाळेत प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद आत्राम यांनी केले. प्रदर्शनात सीखे जिल्हा व्यवस्थापक हर्षवर्धन डांगे यांनी टीआयपी कार्यक्रमाचे महत्व प्रास्ताविकात सांगीतले तसेच कार्यक्रमास उद्घाटक म्हणून लाभलेले गट शिक्षणाधिकारी यांनी शाळेत सुरू असलेला TIP कार्यक्रम अतिशय प्रभावी आहे आणि विद्यार्थ्यांस अतिशय उपयुक्त आहे, असे बोलून दाखवले. या कार्यक्रमात विद्यार्थी माता पालक, गावकरी, उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्या. मनोहर राजगिरे, सहाय्यक शिक्षिका विद्या विरमलवार, चंद्रकला गायकवाड, माधुरी चौधरी, किशोर नगराळे,विनोद आत्राम तसेच नंदोरी केंद्रांचे कोच शिवशंकर बांदुरकर, कोच पल्लवी वाळके यांनी विशेष सहकार्य केले.





# सोबलगाव येथे रस्ता कामाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथे रस्ता कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मा आमदार अंबादास पाटील दानवे यांच्या कडे अजिनाथ साळुंके, संतोष साळुंके, ज्ञानेश्वर आघाडे यांनी रस्त्यांच्या कामाची मागणी केली होती.

यात आमदार दानवे यांनी पाच लक्ष रुपये निधी देण्याचे कबुल केले व त्या निधीतून प्रत्यक्षरित्य जेसीबी द्वारे काम सुरू करण्यात आले असल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी कचरु आघाडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# तहानलेल्या बिबट्याने हंड्यात घातली मान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भक्ष्य आणि पाण्याच्या शोधात तो एका गोठ्यात शिरला. हंड्यात तोंड टाकताच मान अडकल्याने बिथरला सैरभैर झाला. मध्यरात्री भांड्याचा खडखडाट ऐकायला आल्याने शेतकरी घराबाहेर आला. पाहतो तर काय, समोर बिबट्या साक्री तालुक्यातील कोंडाईबारी या जंगल क्षेत्रातील घुकसेवड- जयरामनगर शिवारात रात्री हा प्रकार घडला. पावसाअभावी जंगल क्षेत्रातील वन्यप्राणी पाणी व अन्नाच्या शोधार्थ शेतीशिवाराकडे धाव घेत आहेत. साक्री तालुक्यातील जयरामनगर शिवारात कृष्णा चौरे यांनी त्यांच्या शेतातील गोठ्यात नेहमीप्रमाणे जनावरे बांधली आणि ते झोपी गेले.मध्यरात्री बारा ते दोन वाजेच्या दरम्यान तहानलेल्या बिबट्याने गोठ्यात प्रवेश केला. समोरील तांब्याच्या हंड्यात मान टाकली. हंड्यात होते तेवढे पाणी प्यायल्यावर बिबट्याची मान हंड्यातून निघेचना. यामुळे त्याने मानेला झटके दिले. तथापि त्याची मान हंड्यात पूर्णतः फसली. यामुळे बिबट्या अधिकच बिथरला. दिसत नसल्याने त्याला पळण्याचा अंदाजही घेता येईना.तोवर हंड्याचा आवाज शेतकरी कृष्णा चौरे यांना आला. त्यांनी गोठ्यात जाऊन पाहिले तर बिबट्याची मान हंड्यात अडकल्याचे त्यांना दिसले. त्यांनी सरपंच कमलाकर साबळे यांना ही माहिती दिली. सरपंच साबळे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने ही माहीती दिली. कोंडाईबारीच्या वन परिक्षेत्राधिकारी सविता सोनवणे,वनपाल एस.जे. पाटील, एस.आर. देसले, कोंडाईबारीच्या वनपाल नीता म्हस्के, वनरक्षक गणेश बोरसे यांच्यासह वन खात्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वन विभागाचे उपवनसंरक्षक नितीन कुमार सिंग, सहायक वनसंरक्षक अडकिने यांचे मार्गदर्शन घेत वन विभागाने अखेर सुटकेसाठी कारवाई सुरु केली. दहिवेल (ता.साक्री) येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून बिबट्याला भुलीचे इंजेक्शन देऊन बेशुद्ध करण्यात आले. यानंतर वन कर्मचाऱ्यांनी तांब्याच्या हंड्यातून बिबट्याची मान बाहेर काढली आणि त्याची रवानगी नैसर्गिक अधिवासात केली.

# सकाळच्या सत्रात शाळा भरवण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** मार्च उजाडताच जिल्ह्यात उन्हाळ्याच्या झळा सुरू झाल्या आहेत. अनेक ठिकाणांहून टँकर मागणीचा प्रस्तावही पुढे येत आहे. जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही तर काही ठिकाणी पाणीच उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. यामुळे ग्रामीण भागात तर दुपारनंतर विद्यार्थ्यांना शाळेत बसणे कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या जिल्हा शाखेने मार्च व एप्रिल महिन्यात दोन सत्रांत भरणाऱ्या शाळा सकाळ सत्रात भरविण्यात याव्यात तसेच याबाबतचे आदेश दरवर्षीप्रमाणे काढण्यात यावेत अशा मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेच्या प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी सलगर यांना देण्यात आले आहे.

# बसला अपघात, चार विद्यार्थी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातील पाथर्डी-वडनेर रस्त्यावर शालेय विद्यार्थी वाहतुकीच्या बस अपघातात चार विद्यार्थी जखमी झाले. दुसऱ्या मोटारीचे टायर फुटून हा अपघात झाल्याचे स्थानिकांकडून सांगितले जाते. शालेय बस थेट रस्ता सोडून लगतच्या शेतात गेली. इस्पॅलियर स्कूलची ही बस असून इयत्ता चवथी व दुसरीत शिक्षण घेणारे हे विद्यार्थी आहेत. अपघातावेळी मोठा आवाज झाल्याने स्थानिकांनी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले.

गुरुवारी दुपारी साडेतीन ते चार या वेळेत हा अपघात झाला. शाळा सुटल्यानंतर चालक विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी निघाला होता. वाटेत काही विद्यार्थ्यांना सोडल्यानंतर चार विद्यार्थ्यांना घेऊन बस पाथर्डी, वडनेरच्या दिशेने निघाली होती. त्यावेळी भरधाव येणाऱ्या मोटारीचे टायर फुटल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जाते. अकस्मात टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती समोरून येणाऱ्या बसकडे गेली. यावेळी रस्त्याच्या कडेला जाण्याच्या प्रयत्नात बस रस्त्यावरून उतरून शेतात गेली. अपघातात मोटार चालक जखमी झाला.

तर बसमधील चार विद्यार्थ्यांना डोक्याला, तोंडाला किरकोळ जखमा झाल्या. स्वराज वाघमारे, ईश्वरी निमसे, आयुरा जोशी व सिग्ना चव्हाण अशी या विद्यार्थ्यांची नावे असल्याचे शाळेकडून सांगण्यात आले. अपघातावेळी मोठा आवाज झाल्याने स्थानिकांनी धाव घेतली. याच वेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख या मार्गावरून जात होते. त्यांनी थांबून मदतीसंदर्भात सूचना केल्या. घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, बसमधील चारही विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.



# पिशोर येथे एकावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला

## पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे पाटील यांनी संबंधित आरोपीवर केला गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर येथिल शाहूबानगर भागात राहणारे शेख शकील शेख नूर यांच्या वर पाठीमागुन येऊन एका इसमाने कुरहाडीच्या सहय्याने जीवघेणा हल्ला करून चांगलेच वार करुण घायळ केले व घटना स्थळ वरुण आरोपीने काढला पळ.



या बाबत पिशोर पोलिस ठाण्या कडून मिळालेली माहिती अशी आहे की, पिशोर येथील शेख शकील शेख नूर हे पिशोर येथे शाहुबा नगर येथे राहतात , त्यांचा पूर्वी पासून येथे विट भट्टीचा व्यवसाय आहे, हा व्यवसाय करुण ते आपल्या कुटुंबाचे उदरर्निर्वाह करतात, मात्र दी 26 रोजी रात्रि 9 वाजेच्या सुमारास पिशोर येथील सोनगिरी टेकड़ी जवळ राहनारा दत्तू तुकाराम मोकासे याने पाठीमागुन अचानक पने कुरहाडी ने हल्ला चडवला. यात शेख शकील हा गंभीर स्वरूपात जख्मी झाला होता, तसेच शेख शकील यांचा पत्राचा शेड ही दत्तूच्या घरासमोर आहे,त्या शेड मध्ये विट भट्टिला लागणारे साहित्य त्यात ठेवले आहे तसेच स्वतःचा शेड असल्याने शेख शकील हे आपले ट्रैक्टर ही या ठिकाणी उभे करतात, मागील वर्षी या ठीकाना वरुण त्यांच्या ट्रैक्टर ची बेट्रिक चोरीला गेली होती, त्यांना संशय दत्तू वर होता त्यांनी या संदर्भात दत्तू ला प्रमाणिक पने विचारले तू ट्रैक्टर ची बेट्रिक काढली का? त्याच्या काही दिवसानी त्याला पोलिसांनी एका चोरीच्या प्रकरनात त्याला पडकले मी या संदर्भात पोलिसांन कड़े तक्रार केली होती ही नाही, मात्र त्यांच्या मनात तो राग होता त्याने अचानक पने मागुन येऊन वार केला शिविगाळ करित जीवे मारन्याचा प्रयत्न केला, त्याच्या हातात कुरहाडी असल्याने त्याचा पूर्ण उद्देश मला संपविन्याचा होता, मात्र मि स्वताला कसा ,बसा त्याच्या तवड़ीतुन सोडविले मात्र दत्तू अजुन म्हणत होता तुला मारल्या शिवा शांत बसणार नाही ,तुझा जीव घेईल , घाव जबर लागल्याने रक्तस्त्राव जास्त होता शकील याने पिशोर पोलिस ठाने येथे जाउन घड़लेला प्रकार सांगितला पोलिसांनी त्याला तत्काळ ग्रामीण रुग्णालय पिशोर येथे मेडिकल मेमो साठी पाठवले येथील डॉक्टरने पुढील उपचार साठी घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे पाठवले उपचार घेऊन आल्यानंतर पोलिसांनी शेख शकील यांच्या तक्रारारी वरुण आरोपी दत्तू तुकाराम मोकासे, राहणार पिशोर याच्या वर कलम 307,504,506 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे, तसेच या आरोपी वर अजुन अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळत आहे संबंधित आरोपिला जिल्हा हद्दपार करवा अशी मांगनी परिसरातिल नागरिक करित आहे, पोलिस उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड. यांच्या मार्गदर्शन खाली पोलिस निरीक्षक शिवाजी पाटील, उपनिरीक्षक बालाजी डगारे,बिट जमादार विलास सोनवने पुढील तपास करित आहे, ग्रामीण पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी पिशोर पोलिस ठाण्याला दिला सक्षम अधिकारी...

**पोलिस उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांची घटना स्थळी भेट** : या संदर्भातिल माहिती पोलिस उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांना मिळताच त्यांनी घटना स्थळी समक्ष जाउन पहणी करून पंचनामा केला,परिसरात या संदर्भात माहिती ही घेण्यात आहे, संबंधित आरोपीवर पिशोर पोलिस ठाण्यात गुह्याची नोंद झाली आहे . आरोपीला तत्काळ अटक करून न्यायालयात हजर करण्यात येईल, अशी माहिती मिळाली आहे .

कन्नड तालुक्यात पिशोर हा गाव लोकसंख्याच्या बाबतीत सर्वात मोठा गाव आहे, तसेच या गावत 86 खेड़े गांव जोड़लेले आहे परिसरातील नागरिकंना शासकीय काम काज साठी पिशोर गाव गाठावे लागते, मात्र मागील काही दिवसा पूर्वी या गावात अवैध धंदे,चोरया, डकोत्या, तसेच अवैध धंद्या वाल्याचा माहेर घरच बनला होता "जिसकी लाठी उसकी भेस" गरीब का कोई वाली नाही अशी अस्थिति झाली होती, मात्र पोलिस निरीक्षक शिवाजी पाटिल जसे पिशोर पोलिस ठाण्यात रूजू झाले त्या दिवसी पासून सर्वप्रथम पोलिस ठाण्यातुन दलाल गयाब झाले, धड़ाकेबाज कार्यवाही चा डंका सुरु केल्यामुळे अवैध धंद्या वाल्याचे ढाबे दनानले, परिसरात दलाल गायब झाल्यामुळे गोर गरीबांना न्याय मिळन्यास सुरवात झाली पिशोर पोलिस ठाण्याला अभ्यासु, कुशल नेतृत्व वरिष्ठ अधिकारी यांचा मार्गदर्शन घेणारा अधिकारी मिळाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# १५ ते १७ मार्चला राज्यस्तरीय सेवांकुर प्रेरणा शिबिर पुण्यात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जीवनात वेगळं काहीतरी करण्यासाठी अनेक जण धडपडत असतात; पण वेगळं काहीतरी म्हणजे नक्की काय? आपल्या आयुष्याचा उद्देश काय आहे व तो कसा शोधावा ? यश म्हणजे काय? मैत्री, करियर, प्रेम यांसह व्यावसायिक आणि सामाजिक जीवनातील समतोल कसा साधावा ? अशा विविध प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी मदतरूप ठरू शकणारे २३ वे सेवांकुर प्रेरणा शिबीर यंदा १५ ते १७ मार्च दरम्यान पुणे येथील पानशेत धरणाजवळच्या जनसेवा फाऊंडेशन परिसरात आयोजित करण्यात आले असून सहभागासाठी ६ मार्च पर्यंत नावनोंदणी सुरु आहे. सेवांकुरची सुरुवात पु. बाबा आमटे यांच्या आशीर्वादाने २००७ मध्ये तीन दिवसांच्या २५० युवकांचा सहभाग असलेल्या युवा प्रेरणा शिबीराने आनंदवन येथून झाली. युवकांमध्ये सामाजिक जाणिवा विकसित व्हाव्यात, व्यक्तिमत्वाची जडणघडण व्हावी, मनाने युवा असलेल्या सर्वांचे जगणे अर्थपूर्ण व्हावे, समविचारी मित्रांची एक साखळी तयार व्हावी या उद्देशाने हा मंच कार्यरत आहे. अमरावती येथील प्रयास संस्थेकडून शेकडो युवकांचा सहभाग असलेली तीन दिवसांची निवासी युवा प्रेरणा शिबिरे आनंदवन, सेवाग्राम आश्रम, जळगाव, मुंबई, औरंगाबाद, अंबेजोगाई, अहमदनगर, अकोला, अमरावती इ. अनेक ठिकाणी झालेली आहेत. त्याद्वारे ७००० पेक्षाही जास्त महत्वाकांक्षी युवक जोडले गेले. यातील अनेक युवक राज्यात आणि राज्याबाहेरसुद्धा विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवत आहेत. अनेकांनी सामाजिक क्षेत्रात देखील आपल्या सेवाकार्याचा ठसा उमटविलेला आहे. शिबिरामध्ये विविध स्तरांमधून समाजातील प्रेरणादायी व्यक्ती शिबिरार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. यासोबतच विविध उपक्रम, खेळ यांच्या माध्यमातून स्वतःचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु होऊ शकणार आहे. कोविडनंतर सेवांकुर प्रेरणा शिबीराचे आयोजन झालेले नव्हते. त्यामुळे पुणे येथे प्रथमच होत असलेल्या सेवांकुर प्रेरणा शिबिराची प्रचंड उत्सुकता आहे. कोणतेही निश्चित प्रवेश शुल्क नसून आपापल्या क्षमतेप्रमाणे सहभाग राशी ठेवण्यात आली आहे. विदर्भ, मराठवाडा, उ. महाराष्ट्रासह प. महाराष्ट्रातील प. महाराष्ट्रातुन वेगाने नोंदणी सुरु असून २५० शिबिरार्थी सहभागी होणार आहेत. इच्छुकांनी ६ मार्च पर्यंत नावनोंदणी करावी असे आवाहन डॉ. अविनाश सावजी यांनी केले आहे.

# पोषण आहार शिजवणाऱ्यांची वेळ व मानधन निश्चित

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** शासन निर्णयानुसार स्वयंपाकी तथा मदतनिसांनी प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गतची सर्व कामे करणे आवश्यक आहेत, पोषण आहाराचे काम संपल्यानंतर त्यांना विनाकारण शाळेत थांबवून ठेवण्यात येऊ नये, अशा सूचना प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिल्या आहेत. या निर्णयामुळे स्वयंपाकी तथा मदतनीस महिलांना दिलासा मिळाला आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील शाळांमध्ये मानधन तत्त्वावर स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत आहेत. सदर स्वयंपाकी तथा मदतनिसांची नियुक्ती शाळा व्यवस्थापन समितीद्वारे केली जाते. त्यांना शासनाकडून दरमहा अडीच हजार रुपये मानधन देण्यात येते, २०११ च्या शासन निर्णयामध्ये मदतनिसांच्या कामकाजामध्ये शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे ही बाब नमूद आहे. याबाबत मदतनीस संघटनांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती, या शिवाय योजनेव्यतिरिक्त अन्य कामे न देणे व विनाकारण कामावरून काढून टाकू नये अशी मागणी स्वयंपाकी तथा मदतनिसाच्या संघटनेने केली होती. त्यानुसार सोमवारी शासनाने स्वयंपाकी तथा मदतनीसांच्या कामकाजाबाबत सुधारित निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार स्वयंपाकी, मदतनिसांना त्यांच्या दैनंदिन कामकाजाची मर्यादा चार तासांची करण्यात आली आहे. या चार तासांत स्वयंपाकी, मदतनिसांनी शासन निर्णयानुसार विहित करून दिलेली सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. दि. ८ जानेवारीच्या शासन आदेशानुसार या मदतनिसांना पोषण आहार योजनेंतर्गतची सर्व कामे करणे आवश्यक आहे.

पाक कृतीनुसार विहित वेळेत आहार शिजवणे, तांदूळ व धान्याची साफसफाई करणे, शाळेत विद्यार्थ्यांना जेवणाच्या जागेवर आहार वाटप करणे, विद्यार्थ्यांच्या आहार सेवनानंतर जेवणाची जागा, स्वयंपाकगृहाची साफसफाई करून सांडलेल्या जेवणाची विल्हेवाट लावणे, पोषण आहारासाठी आवश्यक पाणी भरणे तसेच जेवताना विद्यार्थ्यांना पाणी पुरवणे, शाळास्तरावरील परसबागेची निर्मिती व देखभा- लीसाठी सहकार्य, अन्न शिजवताना वापरलेल्या भाजीपाल्याची नोंदी ठेवणे आदी कामे त्यांच्याकडे सोपविली आहेत.



# सुभाष लोखंडे उज्ज्वल पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** शहरातील देगावचाळ येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना उज्वल पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त शिवानंद निमगिरी, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघ, डॉ. सोनाली खंडेलोटे, डॉ. चेतनकुमार खंडेलोटे, डॉ. हेमंत सोनकांबळे, अशोक धुतराज, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रा. विलास वाठोरे, एस. एन. गोडबोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, कार्यालयीन सचिव मारोती कदम, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, प्रशांत गवळे, उज्ज्वल प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश ढवळे नागलगांवकर, आप्पाराव नरवाडे, अनिता नरवाडे, सुरेखा नरवाडे, सागर नरवाडे आदींची उपस्थिती होती.

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या पौर्णिमोत्सव कार्यक्रमात उज्वल प्रतिष्ठान कंधारच्या वतीने देण्यात येणारे विविध क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना मानचिन्ह, पदक, मानाचा फेटा, पुष्पहार, सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच आंध्रप्रदेशातील विजयवाडा धम्मसहलीवरुन परतलेल्या आंबेडकरी अनुयायांचा सत्कार सोहळाही संपन्न झाला. यावेळी नंदूराम लोखंडे विजय प्रभाकरराव हिंगोले, वसंत अंबाजी हाटकर, आनंद लक्ष्मणराव थोरात, माणिकराव हिंगोले, मिलिंद किशनराव थोरात, प्रकाश गंगाराम गोडबोले, किरणकुमार भीमराव कोकरे, प्रकाश रंगनाथ ढगे, भगवानराव मल्हारी कोल्हे, दीपक पाईकराव शोभाबाई लोखंडे लक्ष्मीबाई विश्वनाथ नवघडे, लक्ष्मीबाई बाबुराव गोडबोले, पुष्पलता वसंत हाटकर, पदमीनबाई नामदेव गोडबोले, अनिताबाई प्रकाश गोडबोले, रुक्मीनबाई आनंद थोरात जयश्रीबाई किशोर दुधमल, सुरेखाबाई दत्ता शेळके, शोभाबाई रंजनाबाई विजय हिंगोले, सत्वशीला दीपक खिल्लारे, प्रतिभा संघपाल गोडबोले, स्वाती यशोदीप गोडबोले यांच्यासह ६५ जणांचा सहभाग होता. तसेच बौद्ध उपासिका शोभाबाई भगवानराव नरवाडे, सुशीलाबाई भगवान कोल्हे, रेणुकाबाई लक्ष्मणराव लोखंडे, छायाबाई प्रल्हादराव जोंधळे, संघमित्रा विनोद लोखंडे यशोधरा प्रकाश ढगे, उज्वला शंकराव लोखंडे, सुमेधा शुभम साबणे, शिल्पा सुभाष लोखंडे, ललिताबाई भिमराव लोखंडे, निर्मला भीमराव सातोरे, जयश्रीबाई किशोर दुधमल, मायाबाई गोविंद भावे, जनाबाई शामराव गोधने, भागीरिथाबाई रामा नरवाडे, शेवंताबाई रामा नरवाडे, मीनाक्षीबाई राजेश नरवाडे, नंदाबाई मधुकर नरवाडे, हर्षदा नवल नरवाडे, गयाबाई लक्ष्मण महाबळे, केसराबाई गंगाधर कोकरे, चांगुनाबाई यादव कापुरे, आदित्य चंद्रकांत महाबळे, पार्वती मानोहर थोरात उषाबाई शेषराव रणवीर, शितल सुभाष लोखंडे, हर्षदीप सुभाष लोखंडे, आरो प्रकाश ढगे, आदर्श प्रकाश ढगे, सृष्टी दीपक खिलारे, पानेरी दीपक खिलारे यांचीही उपस्थिती होती.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# विजयकुमार पांचाळ लोकसाहित्यिक पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** मराठबोली एक आदर्श साहित्यिक सामाजिक संस्था मागील एकोणीस वर्षांपासून निःस्वार्थीपणे कार्य करत आहे. समाजाप्रती बांधिलकी असणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक क्षेत्रात विशेष प्राविण्यासह प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वालाच हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील एकुण ५१ मान्यवरांना वेगवेगळ्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये साहित्यिक क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा, सन्मानाचा मानला जाणारा लोकसाहित्यिक पुरस्कार कवी विजयकुमार रामराव पांचाळ यांना देवून सन्मानित करण्यात आले. उद्योग महर्षी मंगेश आमले सर, प्राचार्य भाऊसाहेब जाधव सर , जयंत येलुरकर , परमेश्वर उमरदंड, शिवाजी भापकर, रजनी घोंगडे, साहेबराव पवळे, योगिता पाखले, तेजस्विनी आमले, हेमंत परब, म. भा. चव्हाण, धनंजय सोलंकर, शरद अत्रे, शिवाजी उराडे, श्रीपाद टेंबे, नरेंद्र पोतदार या मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.

कवी विजयकुमार रामराव पांचाळ आपल्या कवितेतून सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य करत आहेत. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक, पर्यावरण सर्व क्षेत्रात त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे.

बेल राईज इंडस्ट्रीज मध्ये मागील बावीस वर्षांपासून उत्पादन विभागात कार्यरत आहेत. यामुळे नातेवाईक, मित्रमंडळी सामाजिक राजकीय, औद्योगिक, साहित्यिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शांत, संयमी, मित्तभाषी, शिस्तप्रिय, प्रामाणिक, निःस्वार्थीपणे समाजहिताचे कार्य विजयकुमार पांचाळ यांचे अखंडितपणे चालू आहे. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे मा. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार त्यांना मिळाला आहे. आत्ता पर्यंत ३१ पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. आम्हा पत्रकार बांधवांकडून कवी विजयकुमार रामराव पांचाळ यांना त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे अभिनंदन व भविष्यातील प्रेरणादायी कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा.



# गरवारेतर्फे आयोजित विज्ञान प्रकल्पाला प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मुलांच्या गुणांना वाव मिळावा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात भर पडावी यासाठी गरवारे कम्युनिटी सेंटरतर्फे सातत्याने विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून गरवारे कम्युनिटी सेंटर तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन व सादरीकरण स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रदर्शनाचे उदघाटन पोलीस निरीक्षक अतुल येरमे, परीक्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ च्या प्रियंका घुगे, उद्योजक संजय उगीले, संचालक सुनिल सुतवने यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी विद्यार्थ्यांनी वर्मी कंपोस्ट, डोअर सिक्युरिटी अलार्म, हायड्रो इलेक्ट्रीक पावर, लायटिंग कंडक्टर, चंद्रायन लँडर रोवर, इलेक्ट्रीसीटी सेविंग वॉटर ट्रीटमेंट प्लांट बेकिंग सोडा वल्कयोनो हार्ट पंप, कॉटन कँडी मशीन ,वीज निर्मिती, हवेचे प्रेशर, चंद्रायण, जलशुद्ध प्रकल्प पोटॅटो बॅटरी इत्यादी प्रकल्प विविध शाळेच्या संघांनी नाविन्यपूर्ण प्रयोग सादर करत या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी प्रमुख अतिथी पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रकल्पाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना मोबाईलचा कमीत कमी उपयोग करण्याचे आवाहन करत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या या स्पर्धेचे परीक्षण प्रियंका घुगे व सुनिल सुतवने यांनी केले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले या स्पर्धेत पायोनियर सेकंडरी स्कूल, अनंत भालेराव विद्या मंदिर, मुकुल मंदिर शाळा, बळीराम पाटील विद्यालय, सोनामत बालक मंदिर, वेणूताई चव्हाण प्रशाला, सेंट लॉरेन्स स्कुल, इत्यादी शाळा सहभागी झाल्या होत्या. या प्रदर्शनात पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वनरक्षक चाचणीत धावला 'डमी' उमेदवार

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** वनविभागाच्या वतीने वनरक्षक (गट क) पदासाठी घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत धाव चाचणीत चक्क 'डमी' उमेदवार धावल्याची बाब उघडकीस आली आहे. वनरक्षकाच्या पदासाठी पात्र ठरल्यावर दस्तऐवज तपासणी करण्यात आली. त्यात 'सीसीटीव्ही'मुळे ही तोतयागिरी उघड झाली. याप्रकरणी गुरुवारी रात्री अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

या तक्रारीनंतर वनरक्षक पदासाठी अर्ज करणारा मूळ उमेदवार रवींद्र सोमनाथ पायगव्हाण (२८, रा. पळाशी, जि. छत्रपती संभाजीनगर) आणि डमी उमेदवार प्रदीप राजपूत (२६, रा. जालना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यापैकी रवींद्र पायगव्हाण याला अटक करण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यात वनरक्षकाच्या ५५ जागांसाठी राज्यभरातून ११ हजारापेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज केले होते. नोकरी बळकावण्यासाठी रवींद्र सोमनाथ पायगव्हाण याने पाच किलोमीटर धावण्याच्या चाचणीत प्रदीप राजपूत याला डमी उमेदवार म्हणून उभे केले.वनविभागातील वनरक्षकपदासाठी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा टीसीएसआयओएनमार्फत २ ते ११ ऑगस्ट २०२३ या कालावधीत घेण्यात आली. ५ जानेवारी २०२४ रोजी वनविभागाच्या संकेतस्थळावर निकाल प्रसिद्ध करण्यात आला. पुढील टप्प्याची प्रक्रिया राबवण्यासाठी वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी प्रादेशिक निवड समितीचे सचिव म्हणून यवतमाळ वनसंरक्षकांना प्राधिकृत केले. ऑनलाईन परीक्षेत १२० पैकी ४५ टक्के गुण प्राप्त असणाऱ्या उमेदवारांची २२ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत दस्तऐवज तपासणी, शारीरिक मोजमाप तपासणी तसेच धाव चाचणी घेण्यात आली. परीक्षेतील गुण व धावचाचणीमधील वेळेनुसार प्राप्त गुणांची एकत्रित बेरीज करून सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली. निवड व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची २१ फेब्रुवारी रोजी चाचणी घेण्यात आली. पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा शल्यचिकीत्सकांकडे पाठवण्यात आले. रवींद्र पायगव्हाण याचा भरती प्रक्रियेतील गुणवत्तेनुसार निवड यादीतील सर्वसाधारण प्रवर्गात समावेश करण्यात आला होता. दस्तऐवज तपासणी व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पाच किलोमीटर धावणारा उमेदवार हा डमी निघाला. खोटे कागदपत्र तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचे निवड समितीच्या लक्षात आले. त्यावरून वनपरिक्षेत्र अधिकारी अमर नरेंद्र सिडाम (रा. यवतमाळ) यांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून रवींद्र पायघन व त्याचा मित्र प्रदीप राजपूत या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला.

# लोकसभा निवडणुकीसाठी आवश्यक मतदान केंद्रांसाठी इमारत, खोल्यांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील लोकसभेच्या आगामी निवडणुकीसाठी आवश्यक मतदान केंद्रांसाठी इमारत व खोल्यांची पाहणी यासाठी तालुका तहसीलदार स्वरूप कंकाळ यांनी जिल्हा परिषद हायस्कूल इमारत व तेथील खोल्या अन्य सुविधा याबाबत पूर्व पाहणी दौरा केला बाजार सावंगी येथे मतदानासाठी तीन केंद्र असून शेखपुर वाडी साठी स्वतंत्र एक असे चार मतदान केंद्रांच्या व्यवस्थेची व सुविधांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. मंडळ अधिकारी संजय परदेशी तलाठी नारायण पठ्ठे सहाय्यक सुधाकर नलावडे यांची उपस्थिती होती.

शांता राई माध्यमिक विद्यालय ताजनापुर (ता: खुलताबाद) येथील दहावी परीक्षा केंद्र क्रमांक 1419 वर 151 विद्यार्थ्यांपैकी 139 विद्यार्थी उपस्थित होते. 12 विद्यार्थी गैरहजर होते. केंद्र संचालक पीआर वेताळ हे होते. बैठे पथक प्रमुख श्री महालकर होते संचालक गणेश काळे रनर पी व्ही वाघ यांनी परीक्षा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य केले ताजनापूर सह पद्मावती विद्यालय महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल दरेगाव या शाळांचा समावेश होता.

# बाजार सावंगी जिल्हा परिषद प्रशालेत परीक्षा केंद्रावर दहावीची परीक्षा शांततेत व सुरळीत

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्रशालेत परीक्षा केंद्र १३१५ वर इयत्ता दहावी च्या मराठी विषयाची परीक्षा शांततेत व सुरळीत पार पडली. एकूण 326 विद्यार्थ्यांपैकी 320 विद्यार्थी उपस्थित होते सहा विद्यार्थी गैरहजर होते केंद्र संचालक मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे होते 13 परीक्षा दालना त बैठक व्यवस्था होती. परीक्षा सुरू असताना तालुका तहसीलदार स्वरूप कंकाळ यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले. या केंद्रात जिल्हा परिषद प्रशालेसह ज्ञानकुंज विद्यालय स्वामी विवेकानंद स्कूल कैलास विद्यालय बोडखा व झरी येथील शाळेचे विद्यार्थ्यांचा सहभाग होता बैठे पथक ए एस पवार व त्यांचे तीन सहकारी गृह रक्षक दलाचे चार जवान बंदोबस्तासाठी हजर होते.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर